|| जय माता जी ||



|| माता बारोंडादेवी प्रसन्न ||


गुन्हेगारीचा कर्दनकाळ

# क्राईम संध्या

Tread Mark

संपादक : लक्ष्मणराव पाटोळे

वर्ष : १३ | अंक : ४४ | सोमवार दि. १० नोव्हेंबर २०२५ ते रविवार दि. १६ नोव्हेंबर २०२५ | पाने : ८ | किंमत : ५/- रुपये

www.crimesandhya.com | महाराष्ट्रातील १४ जिल्ह्यांत वितरीत होणारे साप्ताहीक | crimesandhyavasai@gmail.com

ठाणे ■ पालघर ■ मुंबई ■ जळगाव ■ नाशिक ■ धुळे ■ बिड ■ परभणी ■ पुणे ■ संभाजीनगर ■ लातूर ■ धाराशिव ■ सोलापूर ■ नांदेड


## दीर-भावजयच्या संबंधामुळे कुणाल चिडला अखेर रागाच्या भरात काकाचा मुडदा पाडला

नागपूर : क्राईम रिपोर्टर

कौटुंबिक वाद मिटले नाहीत, तर त्यातून केंव्हा तरी नात्याचा खून होतो. नागपूरच्या पारडी जवळ अशीच एक घटना घडली आहे. दीर-भावजय यांच्यातील अनैतिक संबंधाचा त्या महिलेच्या मुलावर असा काही परिणाम झाला होता की अनेक वर्षांपासून त्याच्या मनात आपल्या काका विषयी राग होता आणि याच रागातून पुतण्याने कामाची हत्या केली. या प्रकरणी पोलिसांनी आरोपी काकाला अटक केली आहे. ...पान २ वर

# दारूमुळे कुटुंबातील रक्ताचे नाते रक्तरंजित ठरले आईला छळणाऱ्या बापाला मुलानेच ठार मारले

परभणी : क्राईम रिपोर्टर

आई वडिलांच्या वागण्याचा मुलांवर नेहमीच परिणाम होत असतो. त्यामुळे मुलांसमोर पालकांनी आपले वर्तन चांगले ठेवायला हवे. कारण कधी कधी आई वडिलांमधील सततच्या भांडणामुळे मुले वैतागतात. लहान असतील तर त्यांच्या अभ्यासावर  तसेच बालमनावर याचा परिणाम होतो आणि मुले मोठी असतील तर त्यांच्या हातून कोणताही भयंकर गुन्हा घडू शकतो किंवा मग मुले आई-वडिलांना सोडून वेगळे राहतात. तसे पाहता मुलगा असो अथवा मुलगी मुलांचा कल शक्यतो आईकडे अधिक असतो. कारण मुलांना सर्वात जास्त प्रेम आईकडून मिळत असते. कारण आई मुलांच्या लहानपणापासून त्यांच्यावर मायेची बरसात करीत असते. तिच्या पदराखालीच मुले अधिक सुरक्षित असतात. मुलांना काही हवे असल्यास मुले प्रथम आईकडे ती वस्तू मागतात आणि आई सुद्धा आपल्या मुलाने मागितलेली वस्तू तात्काळ देते त्याचे हट्ट पुरवते त्याच्या चुकांवर पांघरून घालून प्रत्येक वेळी त्याची पाठराखण करीत असते. त्यामुळे आई आणि मुलांचं एक घट्ट असं न तुटणार नात बनलेले असते. आणि सर्वात महत्वाचं म्हणजे दिवसभर मुले आईच्या संपर्कात असतात. वडील कामावर जातात आणि कामावरून दमून घरी आल्यावर त्यांना आरामाची गरज असते. त्यामुळे सुट्टी वगळता इतर वेळा वडिलांचा मुलांशी फारसा संपर्क नसतो, मुलांना जे काही हवे असेल ते आईच्या माध्यमातून वडिलांना कळते. थोडक्यात मुले वडिलांपेक्षा आईच्या अगदी जवळ असतात आणि आईकडून त्यांना सतत मायेची उब मिळत असते. त्यामुळे मुलांचे आईवर अधिक प्रेम असते. अशावेळी आईला कुणी काही बोलले तर मुलांना सहन होत नाही. आई आणि वडिलांच्या भांडणात मुले नेहमीच आईची बाजू घेत असतात. आईला कुणी काही बोलले तरी मुलांना सहन होत नाही. परभणी जिल्ह्याच्या इसाद येथे दारू पिऊन पत्नीचा छळ करणाऱ्या एका इसमाची त्याच्या मुलानेच हत्या केली. आईसाठी बापाचा जीव घेताना त्याला जराही वाईट वाटले नाही. या प्रकरणी पोलिसांनी आरोपीला अटक केली आहे.






परभणी शहरात धक्कादायक घटना समोर आली आहे. वडील दररोज दारू पिऊन घरी यायचा आणि पत्नी आणि मुलाला त्रास देत होता. कधी-कधी पत्नीला मारहाण देखील करत होता. दररोज दारू पिऊन येऊन घरी धिंगाणा करत असल्यामुळे घरातील वातावरण पूर्णतः बिघडले होते. वडिलांच्या या कृत्यामुळे आई आणि मुलगा प्रचंड तणावामध्ये आपलं जीवन जगत होते. त्रासाला कंटाळलेल्या अल्पवयीन मुलाने दारू पिऊन आलेल्या बापाला चाकूने भोसकून त्यांची हत्या केली. परभणीच्या गंगाखेड तालुक्यातील इसाद या गावात ४ नोव्हेंबर मंगळवार रोजी रात्रीच्या सुमारास घडली आहे. परभणीच्या गंगाखेड तालुक्यातील इसाद येथील रहिवासी गणेश अंकुशराव भोसले, वय ४० वर्षीय, हे दररोज रात्री दारू पिऊन आपल्या पत्नी आणि मुलाला त्रास देत होते. मुलाला आणि पत्नीला शिवीगाळ करून मारहाण देखील करत होते. त्यामुळे त्यांच्या त्रासाला कुटुंबातील सर्व जण वैतागले होते. ४ नोव्हेंबर रोजी रात्री नेहमीप्रमाणे वडील गणेश भोसले दारू पिऊन घरी आले, घरी आल्यानंतर त्यांनी पत्नी आणि मुलासोबत वाद घालण्यास सुरुवात केली. यावेळी पत्नीला मारहाण देखील केली. त्यामुळे गणेशच्या चिडलेल्या अल्पवयीन मुलाने घरामध्ये असलेला चाकूच घेतला आणि आपल्या वडिलांच्या डोक्यात, मानेवर, डाव्या बरगडीच्या बाजूने आणि पोटात चाकूचे वार केले. त्यामुळे गणेश भोसले गंभीर जखमी झाले आणि त्यांचा जागीच मृत्यू झाला. हत्या झाल्याची बातमी गंगाखेड पोलिसांना ५ नोव्हेंबर रोजी ...पान २ वर

# पैशांसाठी नात्याला डांबर फासले बापाला मारून आईचे कुंकू पुसले

जळगाव : ललित खरे



आजकाल माणूस इतका स्वार्थी झाला आहे की आपल्याला काहीतरी मिळावे यासाठी तो कोणत्याही थराला जाऊ शकतो. त्याला नात्यागोत्याची सुद्धा पर्वा नसते आणि त्यातूनच रक्ताच्या नात्यातही रक्ताचे पाट वाहतात आणि त्यात नाती वाहून जातात. धन संपत्ती आणि शेतीच्या वादातून आजवर बापाने, मुलाची भावाने भावाची मुलाने बापाची हत्या केल्याच्या अनेक घटना घडल्या आहेत. जळगाव जिल्ह्याच्या अंतुर्ली गावात जमीन विकावी यासाठी मुलाने बापाच्या मागे तगादा लावला होता. पण बाप जमीन विकायला तयार नव्हता. त्यामुळे चिडलेल्या मुलाने बापाची हत्या केली. या प्रकरणी पोलिसाने आरोपी मुलाला अटक केली आहे.



भारतीय समाजात अनेक पिढ्यांपासून चालत आलेली मालमत्ता म्हणजे वडिलोपार्जित जमीन. या जमीनीवर कुटुंबातील सदस्यांची एकत्रित मालकी असते. मात्र या जमीनीच्या मालकी हक्कावरुन अनेकदा वाद होतात. वडिलोपार्जीत जमीन आपापल्या नावावर करुन मिळावी यासाठी एखाद्या पिढीत हे वाद निर्माण होतात. हे वाद कधीकधी एवढे पराकोटीला जातात की त्यातून एखादा गुन्हा घडतो. लोभाला बळी पडून कित्येकदा खोटे कागदपत्र तयार करुन जमीन बळकावली जाते. कोणाला किती हिस्सा मिळावा, कोणत्या भागावर कोणाचा ताबा असावा या बाबतीत मतभेद निर्माण झाल्याने वाद होतात. जमीनीच्या वादातून, आर्थिक लोभामुळे भावंडे, नातेवाईक यांच्यात फूट पडते. जमीनीच्या वादामुळे कुटूंबातील सदस्यांचा संवाद कमी होतो आणि छोट्या गोष्टींचे मोठ्या वादात रुपांतर होते. एखादी पिढी वडीलोपार्जीत मालमत्तेचे रक्षण करुन त्यात भर घालते. एखादी पिढी त्या मालमत्तेच्या बळावर स्वत:चे साम्राज्य निर्माण करते. मात्र एखादी पिढी त्या मालमत्तेवरुन वाद घालते आणि सर्व जमापुंजी न्यायालयीन संघर्षात घालवून बसते. अशा प्रसंगात एखादा गुन्हा देखील घडतो. जळगाव जिल्ह्याच्या मुक्ताईनगर तालुक्यातील अंतुर्ली या गावी जमीनीच्या वादातून खूनाची घटना घडली. मुलाने आपल्या बापाची लाथाबुक्क्यांनी, कुऱ्हाडीच्या दांड्याने व विटेने मारहाण करुन हत्या केली. या घटनेमुळे मुक्ताईनगर तालुक्यात हळहळ आणि संताप देखील व्यक्त करण्यात आला. ...पान २ वर

## लग्नाचा तगादा प्राणावर बेतला प्रियकराने प्रेयसीचा जीव घेतला

बार्शी (सोलापुर) : क्राईम रिपोर्टर



अनैतिक संबंध फार काळ टिकून राहत नाही. कारण ते गरजेपोटी निर्माण झालेले असतात एखाद्या महिलेला तिच्या पतीकडून सुख मिळत नसेल तर ती दुसऱ्याला आणि त्यातून विवाहबाह्य अनैतिक संबंध सुरु होतात. बार्शी मधील पूनम निरफळ हिला पतीकडून मनासारखे सुख मिळत नव्हते म्हणून तिने केतनला जवळ केले. पण दिवसा केतनचे मन भरले. त्यामुळे तो तिला टाळू लागला. त्यातच तिने त्याच्या मागे लग्नाचा तगादा लावला, पण तिला २ मुले होती. त्यामुळे केतन तिच्याशी लग्न करू शकत नव्हता. त्यावरून दोघांची भांडणे होऊ लागली आणि एके दिवशी याच भांडणाला कंटाळून केतनने पुनांची हत्या केली आणि स्वतःच स्वाधीन झाला.

बार्शी शहरातील उफळाई रोडवरील शेंडगे प्लॉट येथे बालाजी निरफळ हे पत्नी पुनम आणि दोन मुलासह राहयला आहेत. बार्शी येथील बालाजी निरफळ याचा विवाह गेल्या दहा वर्षापूर्वी पुनम बरोबर झाला. त्यांना दोन मुले ही झाली. यथा अवकाश त्याचा संसार सुखा समाधानाचा चालू होता. याच दरम्यान त्याचे पुनम बरोबर सारखे कोणत्या ना कोणत्या कारणातून भांडणे होऊ लागली. ...पान २ वर

# जमिनीच्या वादातून हत्याकांड घडले शेतातच पिता आणि पुत्राचे मुडदे पडले







अहमदपूर : फिरोज शेख

ग्रामीण भागात शेती हेच प्रामुख्याने उत्पनाचे साधन असल्याने शेतीवरून वाद होत असतात आणि हे वाद वर्षनुवर्ष धुमसत असतात. त्यात गावकर्यानी मध्यस्थी केली किंवा हे वाद न्यायालयात गेले अरी मिटत नाहीत. मात्र हे वाद वाढत जात असल्याने यातून कधीतरी मोठा रक्तपात घडतो. लातूर जिल्ह्याच्याअहमद्पुर तालुक्यातील वृद्धा गावात राहणारे शिवराज सुरणात आणि नांदेड जिल्ह्यातील करेवाडी येथील नर्सिंग शिंदे यांच्यात जमिनीचा वाद होता. काही वर्षापूर्वी सुरणर यांनी शिंदेंची जमीन विकत घेतली होती. मात्र त्यानंतर ती जमीन त्यांना परत घ्यायची होती, पण जमिनीचे भाव  सुरनर जमीन परत करीत नव्हता. याच वादातून नर्सिंग शिंदे याने शिवराज सुरणर आणि त्याचा मुलगा विश्वनाथ सुरनर या पिता पुत्राची हत्या केली. या प्रकरणी पोलिसांनी आरोपीना अटक केली आहे.

अहमदपूर पोलीस ठाणे हद्दीतील मौजे रुद्धा गावात असलेल्या पाण्याच्या टाकी शेजारी याच गावातील शिवराज निवृत्ती सुरनर (वय ७०) आणि त्यांचा मुलगा विश्वनाथ शिवराज सुरनर (वय १९) हे बाप लेक रक्ताच्या थारोळ्यात पडल्याची वार्ता ४ नोंहेबर रोजी सकाळी अहमदपूर पोलीस ठाण्यात येऊन धडकली. अहमदपूर पोलीस ठाण्याच्या ठाणे अंमलदारांनी घटनेची रीतसर माहिती घेत वरिष्ठांना खबर दिली. अहमदपूर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक विनोद मेत्रेवार यांनी घटनेचे गांभीर्य ओळखून तात्काळ पोलिस ...पान २ वर

## संसारातील वाद विकोपाला गेला अखेर पतीनेच पत्नीचा खून केला

धुळे : क्राईम रिपोर्टर



पती-पत्नी मधील नाते समन्वयाचे असायला हवे. त्यासाठी दोघांनी एकमेकांना समजून घ्यायला हवे, पण कधी कधी दोघांकडून एकमेकांच्या गरजा जेव्हा पूर्ण होत नाहीत. तेव्हा दोघांमधील नात्यात दुरावा येतो. नंदुरबार जिल्ह्यातील काळटोकमी गावात राहणाऱ्या रामा आणि विठाबाई या गांगुर्डे दांपत्यात असाच वाद होता. रामा विठ्ठल दारू पिऊन मारहाण करायचा. त्यामुळे दोघांची भांडणे व्हायची याच भांडणात एक दिवशी विठाबाईने रामाला शिव्या दिल्याने तो चिडला आणि त्याने पत्नीचा गळा आवळून तिची हत्या केली. या प्रकरणी पोलिसांनी आरोपीला अटक केली आहे.

पती-पत्नीतील सामंजस्य, प्रेम, आदर यावर संसार उभा रहातो. अन्यथा संसाराची वाताहत व्हायला वेळ लागत नाही. दोघातच ताळमेळ नसेल तर त्यांच्यातील भांडण मिटवणार कोण? हाच मोठा प्रश्न असतो. या भांडणाचा शेवट वाईटच होतो. नंदुरबार जिल्ह्यातील नंदुरबार तालुक्यामध्ये काळटोकमी गावामध्ये विटाबाई रामा गांगुर्डे आणि रामा उत्तम गांगुर्डे या दोघांचा संसार दोघांमध्ये समन्वय नसल्याने उद्ध्वस्त झाला. आदिवासी समाजातील लग्न समारंभालाही खूप महत्त्व आहे. आर्थिक परिस्थिती हलाखीची असली तरी ...पान २ वर

# अनैतिक संबंध अखेर जीवघेणे ठरले प्रियकराने प्रेयसीला गळा दाबून मारले

ईश्वरपुर : क्राईम रिपोर्टर





माणूस एकवेळ पोटाची भूक मारू शकतो, पण शरीराची भूक मारता येत नाही. अशातच जर एखादी बाई विधवा असेल किंवा नवऱ्याने सोडलेली असेल तर ती सहजपणे कुठल्याही पुरुषाच्या जाळ्यात अडकते. ईश्वरपूर येथील रसिकांचेही तसेच झाले. दोन मुले असतानाही तिचे नवऱ्याबरोबर पटत नसल्याने ती वेगळी राहू लागली. याच दरम्यान तिची तुकाराम वाटेगावकर याच्याशी अनैतिक संबंध जुळले. वाटेगावकर तिला पैसे देऊन शरीरसुख लुटत होता. दरम्यान तिला घर घेण्यासाठी पैसे हवे होते. सुरुवातीला तुकारामाने पैसे देतो असे सांगितले. पण नंतर टाळाटाळ करू लागला. त्यामुळे दोघांची भांडणे होऊ लागली आणि याच भांडणामुळे एकेदिवशी तुकारामाने रसिकाची गळा दाबून हत्या केली. या प्रकरणी पोलिसांनी तुकारामाला अटक केली आहे.



जत येथील मल्लेश कदम याचे ईश्वरपुर येथील रसिका हिच्याबरोबर गेल्या बारा वर्षापूर्वी समाजाच्या रिती रिवाजानुसार लग्न झाले. त्यांना दोन मुले झाली. लग्नानंतर काही वर्षातच रसिका हिचे नवरा मल्लेश याच्याशी वाद विवाद होऊ लागल्याने त्या आपल्या मुलाला घेऊन माहेरी निघून आल्या. माहेरी त्या बहे नाका परिसरात भाडयाने खोली करून राहू लागल्या. आपल्या उदरनिर्वाहासाठी त्या सुरूवातीला त्या खानावळीत आणि धुणी भांडयाचे काम करीत होत्या. मुलगा मोठा झाल्यानंतर त्या एका दवाखान्यात नर्स म्हणून काम करू लागल्या. नर्स म्हणून काम करीत असताना त्याची ओळख वाळवा तालुक्यातील ...पान ६ वर

## अनैतिक संबंधात पत्नीने साधला नेम प्रियकराच्या मदतीने पतीचा केला गेम

बदलापूर : क्राईम रिपोर्टर

आजकाल माणसाने सावध असायला हवे खास करून आपल्या कुटुंबातील लोकांच्या बाबतीत ही सावधगिरी बाळगणे गरजेचे असते. कुटुंबातील माणसांवर किंवा शेजारी पाजारी लोकांवर किती जरी विश्वास ठेवला तरी कोण कधी केसाने गळा कापिल याचा नेम नाही. बदलापूरमध्ये अशाच एका घटनेत एका विवाहित महिलेचे शेजाऱ्यांशी अनैतिक संबंध होते. मात्र हि गोष्ट पाटील समजताच त्याच्या कडून आपल्याला त्रास होऊ नये किंवा आपल्या अनैतिक संबंधात पतीचा अडथळा येऊ नये म्हणून त्या महिलेने प्रियकराच्या मदतीने पतीची हत्या केली. पोलिसांनी या प्रकरणी आरोपींना अटक केली आहे.

बदलापूर येथील ४४ वर्षीय व्यक्तीची त्याची पत्नी आणि तिचा प्रियकर या दोघांनी मिळून गळा दाबून हत्या केली आहे. हत्येनंतर पतीचा मृतदेह नदीत फेकण्यात आला. शनिवारी पोलिसांना याची माहिती मिळाल्यानंतर त्यांनी तपास सुरू केला. या दोन्ही आरोपींचा पोलिसांकडून शोध सुरू आहे. आरोपी मनीषा परमार आणि लक्ष्मण भोईर दोघेही शेजारी होते. या दोघांमध्ये अनैतिक संबंध होते. ही बाब पती किशन परमार यांना कळली तेव्हा पत्नी मनीषाला त्यांनी जाब विचारला. त्यातूनच दोघांमध्ये वाद झाला. याबाबत पोलीस अधिकारी म्हणाले की, या दोन्ही आरोपींनी किशन परमार यांचा रस्सीने गळा दाबला. ज्यात त्यांचा मृत्यू झाला. ...पान २ वर

# जेवण न देणे चोराला नाही रुचले वृद्ध दांपत्याला त्याने दगडाने ठेचले

कोल्हापुर (शाहुवाडी) : क्राईम रिपोर्टर



वृद्ध दांपत्याची सुरक्षा हा दिवसेंदिवस चिंतेचा विषय बनत चालला आहे. खास करून गावच्या ठिकाणी मुलाबाळांपासून वेगळे राहणाऱ्या वृद्धांना आधाराची गरज असते. पण मुले मोठी झाल्यावर नोकरी धंद्या निमित्त शहरात जातात आणि आई वडील एकाकी पडतात. अशा वेळी त्यांना स्वतःच्या सुरक्षेसाठी सावध राहावे लागते. चोरी किंवा लूटमार करून जगणाऱ्या गुन्हेगारी प्रवृत्तीच्या लोकांना सहसा कुणी जवळ करीत नाही. शेतात झोपडे बांधून राहणाऱ्या निनू व रुक्माई कंक या वृद्ध दांपत्याने जेलमधून पळालेल्या विजय गुरव या चोराला जेवण दिले नाही. तसेच त्याला झोपायला जागा दिली नाही. याचा विजयला इतका राग आला कि त्याने रागाच्या भरात या वृद्ध दांपत्याच्या डोक्यात दगड घालून त्यांची हत्या केली. या प्रकरणी पोलिसांनी विजयला अटक केली आहे.



शाहुवाडी तालुक्यातील परळे निनाईपैकी गोलीवणे गावातील निनु यशवंत कंक आणि त्याच्या पत्नी रखुबाई कंक हे वृध्द जोडपे कडवी धरणालगत असणाऱ्या आपल्या शेतात पत्र्याचे शेड मारून राहयला होते. परळे निनाई येथील निनु कंक यांची कडवी धरणा जवळ थोडी फार शेती आहे. ते आणि त्याची पत्नी या उतरत्या वयात शेती सांभाळत शेती बरोबरच शेळ्या ही पाळत होते. शेळ्या पाळत असल्याने ते दोघे ही जंगली जनावरापासून आपल्या शेळ्याचे संरक्षण करण्यासाठी म्हणून अलिकडेच ते दोघे ही शेतात पत्र्याचे शेड मारून तेथेच राहयला होते. त्याचा मुलगा मुंबईला कामाला असल्याने ...पान ६ वर

पान १ वरून...

## दीर भावजईच्या संबंधामुळे कुणाल...

नात्यांना काळीमा फासणारी एक थरारक घटना नागपूरमधील पारडी पोलीस स्टेशनच्या हद्दीत घडली आहे. बालपणापासून मनात साचलेल्या द्वेषातून पुतण्याने त्याच्या दोन साथीदारांच्या मदतीने काकाची निर्घृण हत्या केल्याची धक्कादायक घटना घडली आहे. कुणाल कुंभारे असे आरोपीचे नाव आहे. तर डोमा कुंभारे हे काकाचे नाव आहे. कौटुंबिक वैर आणि जुन्या वादातून ही घटना घडल्याची माहिती समोर आली आहे. डोमा कुंभारे यांनी सुमारे दहा वर्षापूर्वी कुणाल कुंभारेच्या आईला पळवून नेले होते. ते पती-पत्नीप्रमाणे एकत्र राहत होते. यामुळे कुणाल कुंभारे यांच्या मनात लहानपणापासून राग होता. तसेच दुसरीकडे यावरुन कौटुंबिक कलह देखील सुरु होता. कुणालची आजी त्याचा सांभाळ करत होती. यामुळे कुणालने मोठा झाल्यावर काकाला संपवण्याचा निर्णय घेतला होता. यानंतर गुरुवारी रात्री ८ वाजताच्या सुमारास डोमा कुंभारे हे आपल्या मोपेड दुचाकीवरून पारडी भागातील तळमळे वाडी परिसरातून घरी परतत होते. याचवेळी दबा धरून बसलेल्या आरोपी कुणालने आपल्या दोन साथीदारांसह त्यांना अडवले. या हत्येनंतर तिन्ही आरोपी लगेच घटनास्थळावरून पसार झाले. या घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली आहे. गंभीर जखमी झालेल्या डोमा यांना स्थानिकांनी तातडीने रुग्णालयात नेले. मात्र, डॉक्टरांनी तपासल्यावर त्यांना मृत घोषित केले. डोमा कुंभारे हे मोलमजुरी करून पोट भरत होते. याप्रकरणी पारडी पोलिसांनी या प्रकरणी खुनाचा गुन्हा दाखल केला आहे. मुख्य आरोपी कुणाल कुंभारे आणि त्याचे दोन साथीदार सध्या फरार असून, त्यांचा शोध घेण्यासाठी पोलीस पथके सक्रिय झाली आहेत. यामुळे संपूर्ण परिसरात खळबळ उडाली आहे. दरम्यान डोमा कुंभारे यांच्या निर्घृण हत्येमुळे नागपूरच्या पारडी परिसरात दहशतीचे वातावरण पसरले आहे. पारडी पोलिसांची पोलिसांनी आरोपींची माहिती देण्याचे आवाहनही केले आहे. या प्रकरणाचा जलदगती तपास करून पीडित कुटुंबाला लवकरात लवकर न्याय मिळावा यासाठी सर्वतोपरी प्रयत्न सुरू आहेत. मात्र अशा कौटुंबिक वादातून झालेल्या गुन्ह्यांमुळे समाजात वाढत चाललेला हिंसाचार हा एक गंभीर सामाजिक प्रश्न बनला आहे.

## दारूमुळे कुटुंबातील रक्ताचे नाते ...

सकाळी नऊच्या दरम्यान मिळाली. यानंतर गंगाखेड पोलीस तात्काळ घटनास्थळी दाखल झाले. पोलीस निरीक्षक श्रीकांत डोंगरे, सहाय्यक पोलीस निरीक्षक आदित्य लोणीकर, शिवाजी शिंगणवाड राम गीते, पोलीस उपनिरीक्षक व्यंकट गंगलवाड यांनी घटनास्थळाची पाहणी केली. त्यानंतर फॉरेन्सिक पथकाला देखील त्या ठिकाणी बोलवण्यात आलं. पंचनामा करून मृतदेह गंगाखेड उपजिल्हा रुग्णालयात आणण्यात आला. त्यानंतर रात्री उशिरा मृताच्या मुलाविरोधात हत्येचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दरम्यान, ग्रामीण भागात दारुमुळे घरं उध्वस्त होताना दिसत आहेत. सध्या ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणावर अवैध दारू विक्री वाढली आहे. त्याचबरोबर व्यसनाधीनतेचं प्रमाण देखील वाढल्याने ग्रामीण भागातील कुटुंब व्यवस्था पूर्णतः विस्कळीत होताना दिसत आहे. त्यामुळे राज्य सरकारने आता तरी दारूबंदी संदर्भात योग्य तो विचार करावा, अशीच मागणी ग्रामीण भागातून करण्यात येत आहे.

## पैशांसाठी नात्याला डांबर फसले...

जळगाव जिल्ह्याच्या मुक्ताईनगर तालुक्यातील अंतुर्ली या गावी तायडे परिवार वास्तव्याला आहे. मुळचा रावेर तालुक्यातील आंदलवाडी येथील तायडे परिवार सुमारे तिस वर्षापासून मुक्ताईनगर तालुक्यातील अंतुर्ली येथे कामधंद्यानिमित्त स्थायिक झाला आहे. या तायडे परिवाराची रावेर तालुक्यातील आंदलवाडी येथे वडीलोपार्जीत शेतजमीन आहे. रमेश तायडे, जगदीश तायडे, देविदास तायडे, रघु तायडे, मधुकर तायडे आणि हरी तायडे अशा सहा भावांचे हे कुटूंब काळाच्या ओघात विस्तारत गेले. रमेश, जगदीश, देविदास आणि रघु हे चौघे भाऊ अंतुर्ली येथे राहण्यास आले. हरी तायडे हे पुणे येथे कामधंद्यानिमीत्त स्थायिक झाले. मधुकर मात्र रावेर तालुक्यातील आंदलवाडी येथे राहून वडिलोपार्जीत शेती सांभाळू लागला. जगदीश तायडे व त्यांची पत्नी कौशल्याबाई हे पती पत्नी शेळीपालनासह मजुरी करुन आपला चरितार्थ भागवत होते. शेळ्या विकून त्यांचा उदरनिर्वाह सुरु होता. जगदीश तायडे यांना देवेंद्र आणि गणेश अशी दोन मुले. दोघांना मद्यपानाचे व्यसन जडले होते. मजुरी करणा-या देवेंद्र आणि गणेश या दोघा मद्यपी भावांपैकी गणेशची नजर आंदलवाडी येथील वडीलोपार्जीत शेतीच्या हिश्श्यावर होती. गणेश हा दिवसभर दुस-याच्या शेतात मजुरीसाठी जात असे. सायंकाळी घरी येण्यापुर्वी मद्यपान करुनच तो घरी येत असे. घरी आल्यावर तो आई कौशल्याबाई आणि मोठा भाऊ देवेंद्र यांच्याशी काही ना काही कारणावरुन वाद घालत असे. तो त्याची आई कौशल्याबाईकडे मद्यपानासाठी पैशांची मागणी करत असे. वेळप्रसंगी शेळी विकून आलेल्या पैशांची देखील तो मद्यपानासाठी मागणी करत होता. आंदलवाडी येथील वडिलोपार्जीत शेतीमधे आपल्याला हिस्सा मिळावा यासाठी तो वडील जगदीश तायडे यांच्याशी वाद घालत असे. त्यातून घरातील वातावरण दुषित झाले होते. सुमारे तिन वर्षापुर्वी अंतुर्ली येथील तायडे परिवार त्यांच्या मुळ गावी रावेर तालुक्यातील आंदलवाडी येथे गेला होता. प्रत्येकाला आपल्या हिश्श्याची शेतजमीन वाटणी करुन मिळावी अशी त्यांनी जमीन कसणाऱ्या मधुकर तायडे यांच्याकडे मागणी केली होती. वाटणी शक्य नसेल तर शेतीतून मिळणारा नफा प्रत्येकाला मिळावा अशी समांतर मागणी सर्वांनी केली होती. त्यावर मधुकर तायडे यांनी सर्वांना स्पष्ट सांगितले होते की मी तुमची शेती कसतच नाही. त्यामुळे मी तुम्हाला नफा देण्याचा अथवा वाटणी करुन देण्याचा प्रश्नच येत नाही. अशा प्रकारे मधुकर तायडे यांनी शेतीच्या वाटणी हिश्श्याच्या प्रश्नातून आपली सुटका करुन घेतली. जगदीश तायडे यांचा लहान मुलगा गणेश याला मद्यपानाचे भारी व्यसन जडले होते. त्यासाठी तो त्याचे वडील जगदीश आणि आई कौशल्याबाई या दोघांना पैशांची मागणी करत असे. आंदलवाडी येथे असलेल्या शेतजमीनीत हिस्सा मिळावा, शेळी विकून आलेले पैसे मद्यपानासाठी मिळावे अशी तो मागणी करत असे. त्याला कितीही पैसे दिले तरी तो मद्यपानात उडवून देईन हे जगदीश तायडे यांना समजत होते. त्यामुळे ते त्याच्या मागणीला नकार देत होते. एकंदरीत त्याच्यामुळे घरातील वातावरण बिघडले होते. दिनांक १ नोव्हेंबर २०२५ रोजी नेहमीप्रमाणे गणेश कामावरुन घरी परतला. घरी आल्या आल्या त्याने त्याच्या आईकडे पैसे मागण्यास सुरुवात केली. त्याच्या नेहमीच्या वादाला त्याची आई वैतागली होती. तिने त्याला शेळ्यांच्या गोठ्यात त्याच्या वडीलांकडे जेवणाचा डबा घेऊन रवाना केले. तो गोठ्याकडे जात असतांना त्याला त्याचा चुलत भाऊ रविंद्र तायडे याने पाहिले होते. गोठ्यात गेल्यानंतर त्याने त्याचे वडील जगदीश तायडे यांच्याशी आंदलवाडी येथे असलेल्या वडीलोपार्जीत शेतीत हिस्सा मिळावा म्हणून वाद घालण्यास सुरुवात केली. काही वेळाने रात्री दहा ते साडे दहा वाजेच्या दरम्यान गणेश हा शेळ्यांच्या गोठ्यातून पुन्हा घराकडे जाऊ लागला. त्यावेळी रात्री दहा ते साडे दहा वाजेचा सुमार होता. वाटेत त्याचा चुलत भाऊ रविंद्र तायडे हा मोबाईलवर व्हिडिओ बघत बसला होता. त्याने गणेशकडे निरखून पाहिले असता तो भांबावलेला होता. भांबावलेला गणेश चुलत भाऊ रविंद्रला बघून म्हणाला की मी माझ्या बापाला मारले आहे, त्याला मी विहीरीत टाकून देणार आहे. भांबावलेल्या गणेशचे शब्द ऐकून रविंद्र सतर्क झाला. त्याच्या हातून काहीतरी विपरीत झाले असेल याची त्याला खात्री झाली. गणेशने त्याचे वडील जगदीश तायडे यांना किती मारले हे बघण्यास जाण्यापुर्वी त्याने त्याच्या काही मित्रांना तसेच गणेशचा पुतण्या रोहीत अशा सर्वांना फोन करुन आपल्या घरी बोलावून घेतले. जमलेले चौघे जण गोठ्याकडे गेले. तत्पुर्वी गणेशचा पुतण्या रोशन हा घटनास्थळी पोहोचलेला होता. गोठ्यात गणेशचे वडील जगदीश तायडे हे जखमी अवस्थेत बाजेवर निजले होते. त्यांच्या अंगावर कांबळ टाकलेली होती. त्यांना कुणी मारले? कसे मारले? का मारले? याची विचारणा होत असतांना राहुलने त्याच्या मोबाईलमधे थेट चित्रीकरण सुरु केले. घटनास्थळी आलेल्या राहुल शिरतुरे याने जखमी जगदीश तायडे यांना विचारलेल्या प्रश्नाचे उत्तर देतांना त्यांनी सांगितले की मला गणेशने मारले आहे. गणेश व्यतिरिक्त अजून कुणी मारले का या प्रश्नावर त्यांनी मान हलवून नकारार्थी उत्तर दिले. पोटचा मुलगा गणेश याने जन्मदात्या बापाला लाथाबुक्क्यांसह कुऱ्हाडीचा दांडा आणि विटेने जबर मारहाण केली होती. या सर्व घटनेची हकीकत जखमी जगदीश तायडे यांनी सांगितली. त्यांनी सांगितलेल्या हकीकतीचा व्हिडीओ करुन घेण्यात आला. जखमी जगदीश तायडे यांना सर्वांनी उचलण्याचा प्रयत्न केला असता त्यांना मोठ्या प्रमाणात वेदना होत होत्या. त्यांचा चेहरा रक्तबंबाळ झाला होता. त्यांचा डावा हात कोपरातून मोडलेला दिसत होता. त्यांची अवस्था बघून रुग्णवाहिकेतून त्यांना जळगाव येथे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयात नेण्यात आले. उपचारादरम्यान दुस-या दिवशी सकाळी पाच वाजेच्या सुमारास जगदीश तायडे यांचे निधन झाले. या घटनेची माहिती मिळताच डिवायएसपी सुभाष ढवळे आणि पोलिस निरीक्षक आशिष अडसुळ यांनी आपापल्या सहकाऱ्यांसह घटनास्थळी धाव घेत पुढील कारवाईला सुरुवात केली. या घटने प्रकरणी रविंद्र रमेश तायडे याने दिलेल्या फिर्यादीनुसार मुक्ताईनगर पोलिस स्टेशनला गणेश तायडे याच्याविरुद्ध खूनाचा गुन्हा दाखल करण्यात आला. गु.र.नं. ३३३/२०२५ भारतीय न्याय संहिता १०३(१) नुसार हा गुन्हा दाखल करण्यात आला. गणेश तायडे याला ताब्यात घेत त्याच्याविरुद्ध अटकेची कारवाई करण्यात आली. मुक्ताईनगर उप विभागीय पोलिस अधिकारी सुभाष ढवळे आणि पोलिस निरीक्षक आशिष अडसुळ यांच्या मार्गदर्शनाखाली या गुन्ह्याचा अधिक तपास सहायक पोलिस निरीक्षक राजेंद्र उत्तम चाटे आणि त्यांचे सहकारी हेड कॉन्स्टेबल सतिषकुमार प्रभाकर भारुळे करत आहेत. या गुन्ह्याच्या तपासकामी हेड कॉन्स्टेबल राजेश महाजन, मुकेश महाजन, राजकुमार चव्हाण, पोलिस नाईक सुरेश मेढे आदींचे सहकार्य लाभले. वडिलोपार्जित जमिनीचे वाद हे अनेकदा नात्यांमधील तणावाचे कारण ठरतात. संवाद, सामंजस्य, पारदर्शकता आणि कायदेशीर ज्ञान यांच्या माध्यमातून हे वाद टाळता येतात. मात्र संवाद आणि सामंजस्याच्या अभावातून हे वाद पराकोटीला जातात. वडिलोपार्जीत शेतजमीनीत वाढ होण्याऐवजी वादातून तिचे प्रत्येक पिढीत तुकडे पडतात. वाड वडिलांनी स्वकष्टाने मिळवलेल्या शेतीमुळे वाद होतात. याउलट काही जण आपल्या मुलांना चांगले शिक्षण आणि संस्काराचा वारसा देतात. शिक्षण आणि संस्काराच्या शिदोरीवर मुले जग जिंकतात. ती शिदोरी कुणी हिसकावू शकत नाही. वडीलोपार्जीत शेतजमीन अथवा मालमत्तेच्या वादातून कुटूंबात फुट पडते.

## लग्नाचा तगादा प्राणावर बेतला...

त्यातून त्याचे संसाराकडे नीट लक्ष लागत नव्हते. ते सकाळी कामावर गेले की रात्री उशिरा घरी परतत होते. त्याची दोन्ही मुले ही सकाळी शाळेला गेली की, ती संध्याकाळी परत येत होती. तीचे शिक्षण झाले असल्याने ती एका मेडिकल कंपनीमध्ये रिप्रेझेंटेटिव्ह म्हणून काम करू लागली याच दरम्यान तिची ओळख ही केतन प्रकाश जैन नावाच्या तरूणासोबत सोशल मिडियावरून ओळख झाली. ते दोघे ही फोनवरून एकमेकांशी चॅटिंग करू लागली. तसेच एकमेकांच्या विचारांची देवाण घेवाण करीत असताना एकमेकांना मेसेज ही करीत होते. खरे तर पुनम ही केतन प्रकाश जैन याच्या प्रेमात पडलेली होती. ते दोघे ही बाहेर हॉटेलमध्ये भेटत होते. हॉटेलच्या बंद रुममध्ये त्या दोघांची मजा चालत होती मात्र ही गोष्ट पुनम हिचा नवरा बालाजी निरफळ याच्यापासून लपून राहिलेली होती. तिचा नवरा बालाजी हा सरळ साधा होता तो आपण भले आणि आपले काम भले या वृत्तीचा होता. तो सकाळी कामाला गेला की रात्री घरी परतत असल्याने पुनमला प्रियकर केतन बरोबर मजा मारायला वेळ मिळत होता. परंतु म्हणतात ना विवाह बाहय संबंध हे फार काळ टिकत नाहीत तसेच त्या दोघांच्या संबंधा बाबत ही झाले.हल्ली केतन हा पुनम हिच्या घराकडे ही तिचा नवरा नसताना येत होता. पुनमने आपल्या दोन्ही मुलांना केतनची ओळख ही काका म्हणून करून दिलेली होती. तिची दोन्ही मुले केतनला काका म्हणून बोलावित होते. पुनम ही मुलांना बाहेर खेळायला पाठवून प्रियकर केतन याला आपल्या अंगावर खेळवित होती. पुनमची जवानी केतन हा ओरबडत असल्याने तो तिला काय पाहिजे काय नको ते ही पाहत होता. पुनम ही त्याच्याकडून पैसे घेऊन त्याला शरीर सुख देत असल्याने तो ही हल्ली दुपारच्या वेळेस तिच्या घरी दारू पिऊन यायचा. दारूच्या नशेत तो पुनम बरोबर भांडण करून तिला शिव्या देवून मारहाण ही करायचा. हे तिच्या दोन्ही मुलांनी बघितले होते. परंतु पुनमने आपल्या दोन्ही मुलांना ताकीद देवून त्याच्या पप्पांना ही गोष्ट सांगू नका म्हणून सांगितले होते. त्यामुळे मुले ही गप्प राहत होती. पुनम ही दिसायला देखणी सुंदर असल्याने प्रियकर केतनला ती आपल्या सौंदर्याच्या जाळ्यात ओढून त्याच्याकडून पाहिजे तसे शरीरसुख घेत होती. तिच्या मते तिचा नवरा रात्रीच्या खेळात कमी पडत असल्याने ती प्रियकराला चिकटून होती. काही झाले तरी प्रियकर केतनला सोडायचे नाही असे तिने ठरविले होते. परंतु गेल्या पाच सहा वर्षापसून त्याचे संबंध असल्याने केतनला तिच्या बरोबरचे संबंध तोडायचे होते. त्यामुळे हल्ली त्या दोघात कोणत्या ना कोणत्या कारणातून वाद विवाद होत असायचा. त्यातून तो तिला दारूच्या नशेत मारहाण करीत शिव्या ही दयायचा. हल्ली तर ती त्याच्या मागे तु माझ्याशी लग्न कर म्हणून तगादा लावू लागली होती. त्यामुळे तो तिच्यावर चिडून होता. खरे तर केतनचे मन भरलेले होते. त्यामुळे तो तिला डावलत होता. यातून त्या दोघांची भांडणे ही वाढलेली होती. तसेच त्याने तिला बरीच आर्थिक मदत ही केली असल्याने तो तिच्याकडे पैसे ही परत मागत होता. गेल्या पाच सहा वर्षापासून आपली पत्नी कोणाबरोबर काय करते याची साधी भणक देखील बालाजी याला लागली नव्हती. त्यामुळे दोघांच्या संबंधाची माहिती ही त्याला नव्हती. तो दिवसभर कामावरून थकून घरी आला की रात्री लवकर झोपत होता. त्यामुळे पुनमला कशाची गरज आहे हे त्याला माहित असून देखील तो तिची इच्छा पुर्ण करू शकत नव्हता. दोघांचा संसार तसा बरा चालू असल्याने त्याला त्याचे काही वाटत नव्हते. परंतु अलिकडे बालाजी घरी नसताना दुपारच्या वेळेस कुणी तरी घरी येतो आणि त्यावेळी पुनमच्या घराचा दरवाजा बंद होत असल्याने या बंद दरवाज्या आड काय घडत आहे याची चर्चा शेजारी राहणाऱ्या लोकात होत होती, परंतु ही चर्चा बालाजीच्या कानापर्यत पुनमने येऊ दिली नव्हती. इकडे प्रियकर तिच्याशी वाद घालत भांडण काढत मारहाण करीत होता तरी ही त्याचा त्रास सहन करीत नवऱ्याला काही समजु दिले नव्हते. परंतु विवाहबाहय संबंध हे जोपर्यत झाकली मुठ असते तोपर्यत ते चांगले असतात. परंतु ज्यावेळी हे संबध उघड होतात त्यावेळी त्याचा गवागवा होत असतो तसेच यात ही झाले होते.ती नवरा घरी नसताना त्याला बोलावून घेत होती परंतु तो घरी आला त्याने तिच्याकडून शरीरसुख घेतले की, ती त्याच्याशी भांडण काढत माझ्याशी लग्न कर म्हणून त्याच्या मागे तगादा लावीत होती. हिच्यापासून आपले मन भरले आहे कशाला हिच्या नादाला लागायचे असे तो विचार करीत होता. त्यामुळे तो तिला डावलत होता. तो आपल्याला डावलत आहे पुर्वी सारखे तो आपल्याला साथ देत नाही हे पुनमने ओळखले होते. हिची आपल्या मागची कायमची कटकट मिटवायची याचा तो विचार करीत होता. तशा संधीच्या शोधात तो होता. याच दरम्यान त्याला ती संधी मिळाली. सोमवार दि.३ नोव्हेंबर २०२५ रोजी बालाजी निरफळ हे कामानिमित्य धाराशिव येथे गेले. त्यावेळी दुपारच्या दरम्यान पुनला प्रियकरला भेटण्याची इच्छा झाले. तिने त्याला फोन करून घरी येण्यास सांगितले. तिने घराकडे आपल्याला कशाला बोलाविले आहे हे केतनने ओळखले होते. पुनमने त्याला फोनवरून पती बालाजी हे धाराशिव येथे गेले आहेत तसेच ते संध्याकाळ पर्यत परत येतील अशी माहिती दिली असल्याने केतनने हिच संधी साधत आज तिची गेम करायची तिची आपल्या मागची कायमची कटकट मिटवायची असा प्लॅन केला.याच दरम्यान पुनमने धाराशिव येथे गेलेल्या पती बालाजी याला फोन करून सांगितले की,आज तुलशी विवाह आहे. घरी येताना तुलशी विवाहासाठी ऊस घेऊन या. तसा निरोप आल्याने बालाजी यांनी पत्नी पुनम हिला संध्याकाळी मी ऊस घेऊन घरी येतो तु तुलशी विवाहाची तयारी कर असे सांगितले. इकडे दुपारी ३ वाजणेच्या सुमारास केतन हा प्रियेसी पुनम हिच्या घराकडे आला. त्यावेळी तो दारू पिऊनच घरी आला होता. केतन घरी आल्यानंतर पुनमने आपल्या दोन्ही मुलांना घराबाहेर खेळण्यासाठी पाठविले. घराचा दरवाजा बंद करून घेतला. या बंद दरवाज्या आड तिने प्रियकरा बरोबर शरीरसुख घेतले. त्यानंतर त्या दोघात वाद सुरू झाला. त्याला ही तेच पाहिजे होते. तो तिला अर्वाच्य भाषेत बोलत होता. ती त्याला लग्न करूया म्हणून तगादा लावित होती. भांडणात तो तिला तु माझी रखेल आहेस आणि तशीच तुला ठेवणार आहे असे म्हणाला. दोघात वाद होऊ लागला. तिने त्याच्या कानाखाली लावली. याचा राग त्याला आला. त्याने तिच्या गळयातील ओढणीने गळा आवळून धरला. ती त्याच्या तावडीतून सुटण्याचा आटोकाट प्रयत्न करीत होती. कसे तर करून तिने त्याच्या तावडीतून सुटका केली, परंतु ओढणीने तिचा गळा आवळ्याने तिचा श्वास गुदमरला होता. त्याच वेळी केतनने तिच्या शरीरावर आणि पाठीवर आपल्या कडील चाकुने सपासप असे १७ वार केले. ती ओरडत रक्ताच्या थारोळ्यात बेडवर पडली. तिची हालचाल मंदावली. जागीच तिचा मृत्यु झाला. तिचा आपल्या हातून खून झाला आहे हे लक्षात आल्यावर केतनने तिला तेथेच सोडून तिच्या घरातून पळून गेला. जाताना त्याने घराला बाहेरून कुलूप लावले. त्यामुळे काही वेळ कोणाला कसलीच शंका आली नाही. इकडे धाराशिवला गेलेला बालाजी निरफळ हे चार वाजणेच्या सुमारास ऊस घेऊन घराकडे आले. त्यावेळी त्यांना आपल्या घराला बाहेरून कुलूप लावले असल्याचे दिसले. त्यांनी पत्नी पुनम हिच्या मोबाईलवर कॉल केला, परंतु ती काही फोन उचलत नव्हती याने आपल्या मुलांना बोलावून घेतले असता मुलांनी मम्मी घरीच होती असे त्यांना सांगितले. बालाजी यांना शंका आल्याने त्यांनी घराचे कुलूप काही लोकांच्या मदतीने तोडले. कुलूप तोडून ते आत गेले असता त्यांना पत्नी ही बेडवर रक्ताच्या थारोळ्यात पडली असल्याचे तसेच तिच्या गळ्या भोवती तिची ओढणी ही असल्याचे दिसले. तिच्या शरीरावर गंभीर स्वरूपाचे वार ही झाल्याचे दिसत होते. तिच्या बाजुलाच रक्ताने माखलेला चाकू ही पडलेला होता. सुरूवातीला त्यांना ही घटना चोरीच्या उद्देशाने घडल्याचे वाटले. त्यांनी स्वतःला सावरत या घटनेची माहिती बार्शी पोलिसांना दिली. पण त्यापुर्वीच या घटनेतील संशयीत आरोपी केतन जैन हा बार्शी पोलीसात स्वतःहून हजर होऊन त्याने या घटनेची माहिती पोलीसांना दिली होती. पोलिसांनी त्याला ताब्यात घेऊन घटनास्थळ गाठले. घटनास्थळा वरील प्रसंग हा धडकी भरणवणारा होता मयत पुनम निरफळ हिच्या शरीरावर आणि पाठीवर १७ वार केल्याचे दिसत होते. पोलिसांनी घटनास्थळाचा पंचनामा करून मृतदेह शवविच्छेदनासाठी बार्शी येथील सरकारी रुग्णालयात पाठवून दिला. पोलीसांनी पंचनामा केल्यावर ही घटना अनैतिक संबंधातून घडल्याचे मयत पुनम हिचे पती बालाजी यांना समजले. तसेच आपली पत्नी केतन जैन याच्या संपर्कात गेल्या पाच सहा वर्षापासून असून दोघे ही एकमेकाशी मोबाईलवरून चॅटिग तसेच मेसेज करीत असल्याचे पुनम हिचा मोबाईल तपासल्यानंतर त्याच्या लक्षात आले. त्याच्या मुलांनी ही केतन काका तुम्ही घरी नसताना येत होते. तसेच ते मम्मीला शिवीगाळ करीत मारहाण करीत असल्याने त्यांना सांगितले. परंतु पुनम हिने आपल्या मुलांना याची माहिती कोणाला देवू नकोस अशी तंबी दिल्याचे ही मुलांनी सांगितले. या घटनेची फिर्याद बालाजी निरफळ याच्याकडून पोलीसांनी घेतली. त्यांनी दिलेल्या फिर्यादीवरून बार्शी पोलीसांनी पुनम बालजी निरफळ (वय ३५) हिच्या खुन प्रकरणी केतन प्रकाश जैन (वय ३५) याच्या विरोधात भा.दं.वी. कलम १०३(१) प्रमाणे गुन्हा दाखल केला. त्याला बार्शी येथील कोर्टात पोलीसांनी उभे केले असता मा.कोर्टाने त्याला सात दिवसाची पोलीस कोठडी सुनावली. पोलीस कोठडी दरम्यान पोलीसांनी त्याच्याकडून गुन्हयात वापरलेला चाकु आणि पुनम हिच्या गळ्यातील ओढणी जप्त केले. या घटनेचा पुढील तपास बार्शी पोलीस करीत आहेत.

## जमिनीच्या वादातून हत्याकांड घडले ...

ठाण्यातील काही पोलिस कर्मचाऱ्यांना सोबत घेवून घटनास्थळाकडे धाव घेतली. रुद्धा गावात जाणाऱ्या मेन रस्त्याच्या बाजूला असलेल्या सार्वजनिक पाणीपुरवठा करणाऱ्या पाण्याच्या टाकीजवळ गावातील लोकांनी एकच गर्दी केली होती. या दुहेरी हत्याकांडामुळे गावात भितीचे वातावरण तयार झाले होते. लोकामधून वेगवेगळे तर्क व्यक्त केले जात होते. अंदाजे ७० वर्ष आणि एक २५ वर्षीय तरुण रक्ताच्या थारोळ्यात निपचित पडले होते. त्यांच्या मृतदेहावर मोटरसायकल पडलेली दिसत होती. यावरून बरेच जण हा आपघात आसावा असा अंदाज व्यक्त करत होते. बहुतेक या दोघांचा अपघाती अंत झाला असावा असाच अंदाज घटनास्थळावरून व्यक्त करण्यात येत होता. रूध्दा गावातील पाण्याच्या टाकीजवळ मयताचे नातेवाईक जोरजोरात विलाप करत होते. काहीतरी विपरीत घडले असावे असे तर्क लोकातून व्यक्त केले जात होते. काही तासातच अहमदपूर पोलीस ठाण्याचे पोलीस अधिकारी आणि कर्मचारी घटनास्थळावर दाखल झाले. पोलिसांना पाहताच गर्दी केलेल्या लोकांनी पोलिसांना वाट करून दिली. अहमदपूर पोलिस ठाण्याचे पालिस निरीक्षक विनोद मेत्रेवार यांनी घटनास्थळावर उपस्थित लोकांकडून घटनेची प्राथमिक माहती जाणून घेतली असता मयत शिवराज निवृत्ती सुरनर व त्यांचा मुलगा विश्र्वनाथ सुरनर हे दोघे याच गावातील मूळ रहिवाशी असून ते दररोज रात्री आपल्या शेताची राखण करण्यासाठी जात होते व सकाळी गावात परत येत होते अशी माहिती पोलिसांना मिळाली. अहमदपूर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक विनोद मेहत्रेवार यांनी या प्रकरणातील बरीच माहिती हस्तगत केली. दरम्यान अहमदपूर उपविभागीय पोलीस अधिकारी अरविंद रायबोले यांनी घटनास्थळाला भेट दिली. त्यांनी अहमदपूर पोलीस ठाण्याचे पोलीस अधिकारी आणि कर्मचारी यांना पंचनामा करण्याच्या सूचना दिल्या. अहमदपूर पोलिसांनी पंचनामाला सुरुवात केली. मयताच्या अंगावर धारदार शास्त्राने वार केल्याच्या खुणा दिसत होत्या. प्रथमदर्शनी अपघात वाटणारा हा घातपाताचा डाव असल्याचा संशय पोलिसांच्या मनात निर्माण झाला होता. अहमदपूर पोलीसांनी पंचनामा आटोपून प्रेत उत्तरणीय तपासणीसाठी शासकीय रुग्णालयात पाठवण्याची तजबीज केली. दरम्यान अहमदपूर पोलिसांनी घटनास्थळाचा सर्व परिसर पिंजून काढला. दरम्यान फॉरेन्सिक लॅब आणि श्वान पथक देखील घटनास्थळावर दाखल झाले. मात्र श्वान पथकाला म्हणावा तसा माग काढता आला नाही. पोलिसांनी पंचनामा आटोपून तपासाची पुढील दिशा ठरवली. कोणीतरी अज्ञात हल्लेखोरांनी या दोन बाप लेकांना धारदार शस्त्रानी वार करून ठार केल्याचा प्राथमिक अंदाज पोलिसांकडून वर्तविण्यात येत होता. तसेच त्यांना इतरत्र ठार मारून त्यांना पाण्याच्या टाकीजवळ आणून त्यांच्यावर मोटर सायकल टाकून अपघात झाल्याचा बनवा रचण्यात आल्याची गोष्ट पोलिसांच्या नजरेतून सुटली नाही. मयत शिवराज यांची मुलगी यांनी दिलेल्या फिर्यादीवरून अहमदपूर पोलीस ठाण्यात अज्ञात व्यक्तीने अज्ञात कारणासाठी खून केल्याचा गुन्हा गुरनं ७२४ / २०२५ कलम १०३ ,(१) २३८ भारतीय न्याय संहिता प्रमाणे दखल करण्यात आला. दरम्यान जिल्हा पोलिस अधीक्षक अमोल तांबे अप्पर पोलीस अधीक्षक मंगेश चव्हाण यांच्यासह स्थानिक गुन्हे अन्वेषण विभागाचे पोलीस निरीक्षक सुधाकर बावकर यांनी देखील घटनास्थळाला भेट दिली. जिल्हा पोलिस अधिक्षकांनी सर्वच पोलिस ठाण्याला समांतर तपासाचे आदेश दिले. लातूर जिल्हा पोलीस अधीक्षक अमोल तांबे, अप्पर पोलीस अधीक्षक मंगेश चव्हाण, अहमदपूर उपविभागीय पोलीस अधिकारी अरविंद रायबोले यांच्या मार्गदर्शनाखाली तपासाचे सर्व सूत्र अहमदपूर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक विनोद मेत्रेवार यांच्या हाती देण्यात आले. या दुहेरी हत्याकांडाचा तपास करण्यासाठी अहमदपूर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक विनोद मेहत्रेवार यांनी पोलिसांचे दोन पथके तयार केली. या पोलिस पथकात पोहेकॉ. तानाजी आरदवाड, हरी कांबळवाड, विशाल सारोळे, मारोती शिंदे, बाळू पांचाळ, पोनि रायटर हनुमंत आरदवाड, दिंडगे वैजेनाथ, बबन चपडे यांचा समावेश करण्यात आला. दरम्यान स्थानिक गुन्हे अन्वेषण विभागाचे पोलीस निरीक्षक सुधाकर बावकर यांनी देखील या दुहेरी हत्याकांडाचा तपास करण्यासाठी पोलिसांची तीन पथके संशयीत आरोपीच्या मागावर रवाना केले होते. अहमदपूर पोलीस ठाण्याच्या पोलीस पथकांनी या खून खटल्यातील प्राथमिक माहिती घेण्यासाठी सर्वप्रथम मयताच्या नातेवाईकांची भेट घेतली. मयत बाप लेकाची कोणाविरुद्ध दुश्मनी होती का याचाही तपास करण्यात आला. तसेच त्यांचे काही आर्थिक व्यवहार होते का त्यातून हा प्रकार घडला असावा असा संशय बांधून अधिक माहिती जाणून घेण्याचा प्रयत्न केला. तेव्हा मयताच्या जमीनीचा नर्सिंग भाऊराव शिंदे यांच्या सोबत काहीतरी वाद चालू आसल्याची खात्रीलायक माहीती पोलिसांच्या हाती लागली. तसेच नर्सिंग भाऊराव शिंदे (वय ६० वर्षे) हा मुळ रूध्दा गावचा रहिवाशी असून तो आता नांदेड जिल्ह्यातील लोहा तालुक्यातील करेवाडी येथे राहत आसल्याची माहीती पोलिसांनी हास्तगत केली. यावरून अहमदपुर पोलिसांनी तपासाची दिशा ठरवून संशयीत आरोपीच्या मागावर पोलिसांचे पथक पाठविले. दरम्यान याच मागावर एलसीबी चे एक पथक रवाना झाली होते. या पथकाने सर्वप्रथम नांदेड जिल्ह्यातील लोहा तालुक्यातील करेवाडी हे गाव गाठले. या गावात सदरील संशयित व्यक्ती विषयी अधिक माहिती घेतली असता गेल्या दोन दिवसापासून गावातून बेपत्ता असल्याची माहिती समोर आली. पोलिसांनी माहीती आणी तत्रज्ञाचा आधार घेत माहिती घेतली असता या प्रकरणातील संशयीत आरोपी नर्सिंग भाऊराव शिंदे हा करेवाडी शिवारातील एका शेतात लपून बसल्याची माहिती पोलिसांच्या हाती आली. यावरून पोलिसांनी करेवाडी शिवारातील शेतात आसलेल्या घरावर छापा मारून या प्रकरणातील संशयीत आरोपी नर्सिंग भाऊराव शिंदे याला ताब्यात घेतले. त्याला अहमदपूर पोलीस ठाण्यात हजर करून अधिक विचारपूस केली असता त्यांनी सुरुवातीला पोलिसांना समाधानकारक उत्तरे दिली. पोलिसांनी त्या दोघांना अधिक विश्र्वासात घेऊन विचारपूस केली असता त्यांनी आपल्या गुन्ह्याची कबुली हा गुन्हा त्याची मुलगा केरबा नरसिंग शिंदे (वय २१) (दोघे रा. रुधा, ह.मू. करेवाडी ता. लोहा जि. नांदेड) याच्या मदतीने केला आसल्याची माहीती समोर आली. पोलिसांनी तात्काळ तपासाचे चक्र गतिमान करून या खून प्रकरणातील दुसरा आरोपी केरबा नरसिंग शिंदे याच्या मुस्क्या आवळल्या. त्यांच्याकडे अधिक विचारपुस केली असता त्यांनी सांगण्यास सुरूवात केली. अहमदपूर तालुक्यातील मौजे रुद्धा गावचे मूळ रहिवासी असलेले नरसिंग भाऊराव शिंदे यांना रूद्धा गावच्या शिवारात शेत जमीन होती. तीस वर्षांपूर्वी त्यांना आर्थिक अडचण आल्यामुळे त्यांनी ही जमीन रुद्धा गावातील त्यांचे मित्र शिवराज निवृत्ती सुरनर यांच्याकडे गहाण ठेवून पैसं घेतले होते. दरम्यान नरसिंग भाऊराव शिंदे यांना पैसे परत करण्यासाठी वेळ लागत आसल्याने शिवराज सुरनर यांनी ती जमीन खरेदी केली होती. गेल्या काही वर्षांपूर्वी नरसिंग शिंदे हे आपल्या कुटुंबासह नांदेड जिल्ह्यातील लोहा तालुक्यातील करेवाडी येथे राहण्यास गेले होते. तेथे त्यांची आर्थिक स्थिती चांगली झाल्याने ते काही दिवसापूर्वी शिवाजी सुरनर यांच्याकडे येऊन माझी जमीन मला परत द्या म्हणुन विनवनी करत होते. मात्र जमीनीचे भाव वाढल्याने शिवराज सुरनर जमीन परत करण्यास तयार नव्हता. त्याच्यामुळे नरसिंग शिंदे याला राग आला होता. व्याजसह पैसे परत करूनही शिवराज आपली जमीन परत देत नाही याचा राग मनात धरून नरसिंग भाऊराव शिंदे यांने शिवराज सुरनर याचा कायमचा काटा काढण्याचा बेत आखला. शिवराज सुरनर याच्या हालचालीवर लक्ष ठेवले. तो दररोज रात्री शेतात झोपण्यासाठी जात आसल्याची खात्रीलायक माहीती मिळवली. दि ३ नोंहेंबर रोजी रात्री नरसिंग भाऊराव शिंदे त्याचा मुलगा केरबा नरसिंग शिंदे हे दोघे शेंतात दबा धरून बासले. नित्य नियमाप्रमाणे शिवराज सुरनर व त्याचा मुलगा विश्वनाथ शिवराज सुरनर रात्री आठ वाजण्याच्या सुमारास शेतात आले. रात्री शिवराज सुरनर व त्याचा मुलगा गाढ झोपी गेले असता. नरसिंग शिंदे व ज्याच्या मुलाने शस्त्राने बाप-लेकावर प्राणघातक हल्ला केला, ज्यात त्यांचा जागीच मृत्यू झाला. त्यानंतर आरोपींनी पुरावे मिटवण्यासाठी मृतदेह ओढून शेताजवळ आणले व त्यांच्यावर दुचाकी टाकून अपघाताचा बनाव करण्याचा अयशस्वी प्रयत्न केला. पोलीस पथकांनी सीसीटीव्ही फुटेज, मोबाईल सीडीआर विश्र्लेषण आणि गोपनिय माहितीच्या आधारे अचूक आणि समन्वित कारवाई केली. या प्रभावी नेतृत्वामुळे आणि तांत्रिक तपासाच्या बळावर, अवघ्या १२ तासांचे आत गुन्ह्यातील दोन आरोपींना ताब्यात घेण्यात पोलिसांना यश आले. पोलिसांनी तपासदरम्यान आरोपीने गुन्हा करताना वापरलेले हत्यार, रक्ताने माखलेले कपडे जप्त केले असून या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस निरीक्षक विनोद मेत्रेवार करीत आहेत. सदरील कामगिरी जिल्हा पोलीस अधीक्षक अमोल तांबे, अपर पोलीस अधीक्षक मंगेश चव्हाण, अहमदपुर उपविभागीय पोलीस अधिकारी अरविंद रायबोले , स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक सुधाकर बावकर, अहमदपूर पोलिस ठाण्याचे पोलीस निरीक्षक विनोद म्हेत्रेवार, यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक सदानंद भुजबळ, संतोष केदासे, पो.उ.नि. राजेश घाडगे, प्रमोद देशमुख, तसेच पोलीस अंमलदार संजय कांबळे, रामलिंग शिंदे, साहेबराव हाके, अर्जुन राजपुत, दिनानाथ देवकते, युवराज गिरी, माधव बिलापटटे, नवनाथ हासबे, राजेश कचे, तुराब पठाण, मुन्ना मदने, जमीर शेख, पाराजी पुठठेवाड, तुळशीराम बरुरे, राहुल काबळे, शैलेश सुडे, गणेश साठे, व्यंकटेश निदुरे, श्रीनिवास जांभळे तसेच पोलीस ठाणे अहमदपूर येथील तानाजी आरदवाड, विशाल सारुळे, कांबळवाड, महिला पोलीस अंमलदार अंजली गायकवाड, मारोती शिंदे, बाळू पांचाळ, पोनि रायटर हनुमंत आरदवाड, दिंडगे वैजेनाथ, बबन चपडे यांनी केली.

## संसारातील वाद विकोपाला गेला...

वयात आलेल्या मुला मुलीचं लग्न थाटामाटात करण्यासाठी आई-वडीलांचा आटापिटा असतो. कष्टाळू जमात म्हणून आदिवासी जमातीकडे बघितले जाते. आपल्या बायकोबद्दल आणि मुलीबद्दल या जमातीतील पुरूषाला जाज्वल्य अभिमान असतो. आपल्या मुलीकडे किंवा बायकोकडे वाकड्या नजरेने पाहिलेलं या जमातीतील पुरुषाला अजिबात सहन होत नाही. आपल्या स्वतः च्या जीवाची पर्वा न करता ही पुरूषमंडळी दोषी व्यक्तीला यमसदनी पाठवण्यात समाधान मानतात. विटाबाई गरीब घरातील होती, पण रूपानं आखीव-रेखीव, आकर्षक चेहऱ्याची आणि देहयष्टीची होती. रामा गांगुर्डे हा सुद्धा जेमतेम आर्थिक परिस्थितीतील, पण कष्टाळू, वयात आल्यानंतर कुटुंबीयांच्या मदतीने लग्नासाठी या दोघांनी एकमेकांना पहाताच पसंत केले आणि धुमधडाक्यात दोघांचा विवाह झाला. रामा आणि विटाबाई दोघं एकमेकांवर जीवापाड प्रेम करायचे. एकमेकांची काळजी घ्यायचे. एकमेकांना काय हवं नको बघायचे, तसेच ते कुटुंबातील इतरांचीसुद्धा काळजीत घेत असत. परिस्थिती गरीबीची असली तरी एकमेकांना जाणून घेण्यामुळे त्यांचा संसार सुरळीत चालू होता. अशा या संसाराला कुणाची तरी नजर लागली आणि संसाराला ग्रहण लागले. त्याला कारण असे घडले की रामा गांगुर्डे मित्रांच्या संगतीने दारूच्या आहारी गेला. रामा जोपर्यत मर्यादेत दारू पित होता तोपर्यत कसलीच अडचण नव्हती, पण तो अतिरेक करू लागल्यावर विटाबाई बिनसली. संसारात मानसिक शांततेबरोबरच शारिरीक भूक भागणंही गरजेचं असतं. येथेच रामा गांगुर्डे कमी पडू लागला. नवऱ्याकडून शारिरीक भूक भागवली जात नाही म्हटल्यावर विटाबाईचं रामाकडं दुर्लक्ष होवू लागलं. तीही त्याला दाद देईना झाली म्हटल्यावर रामा गांगुर्डे इतर महिलांबद्दल आकर्षण वाटू लागलं, पण त्याचाही अतिरेक होवू लागला. कुठल्याही बाईला नवऱ्याचा असा बाहेरख्यालीपणा आवडत नाही, तसंच विटाबाईचं झालं. आपला नवरा इतर बाईच्या नादी लागल्याचे कळल्यावर विटाबाई बिथरली. तिला आता त्याचा तिटकारा येवू लागला. तो दिसताच तिच्या कपाळावर आठ्या पडू लागल्या. घरात आदळाआपट सुरू व्हायची, शिव्यांची लाखोली पण दिली जायची. दररोजच हा प्रकार सुरू झाल्याने रामाही वैतागला. बायकोची आदळआपट सुरू होताच तो घराबाहेर निघून जायचा आणि दारू पिवून घरी यायचा. रामा. घरी आला की दोघांमध्ये शिव्यांचं तुंबळ युद्ध व्हायचं. एकूण दारूमुळे आणि रामाच्या बाहेरख्यालीपणामुळे घरातील वातावरण बिघडू लागलं होतं. रामा आता ५४ वर्षाचा होता, तर विटाबाई ५० वर्षाची होती. विवाह होवून प्रदीर्घ काळ लोटला होता. दोघांना २४ वर्षाचा संतोष नावाचा मुलगा होता. तो आपल्या आई-वडीलांना शांत करण्याचा प्रयत्न करायचा, पण परिस्थिती त्याच्याही हातात राहिली नव्हती. सणाच्या निमिताने विटाबाईने गोडा-धोडाचं जेवण केलं होतं. दुपारी दोन वाजता रामा घरी आला तो झुलतच. सणाच्या दिवशीही रामाने दारू ढोसल्याने विटाबाई त्याला बोलू लागली. दोघांमध्येभांडण सुरू झाले. दोघे जण एकमेकांवर तुटून पडले. मुलाने दोघांनाही समजावण्याचा प्रयत्न केला, पण ते ऐकत नव्हते. नाईलाजाने संतोष उपाशीपोटीच घराबाहेर पडला. आपला मुलगा उपाशीपोटी बाहेर गेल्याचे दोघांनाही भान नव्हते, उलट ते जिद्दीलाच पेटले होते. रामाबरोबर विटाबाईही शिव्या देत होती. हे रामाला सहन झाले नाही. ज्या गळ्यातून शिव्या बाहेर पडत होत्या तोच गळा रामाने करकचून आवळला. दोन्ही हातांनी विटाबाईचा गळा करकचून आवळल्याने विटाबाईचा श्वास रोखला गेला आणि ती धाडकन जमिनीवर कोसळली. ती खाली कोसळताच घरातील लोकांची घाबरगुंडी उडाली. घराबाहेर गेलेल्या संतोषला आपल्या आईचा आपल्या बापाने गळा आवळल्याचे समजताच तो धावतच घरीआला. बेशुद्धावस्थेतील आईला घेवून तो रूग्णालयात गेला, पण प्राथमिक तपासणीतच डॉक्टरांनी विटाबाईला मृत घोषीत केले.या घटनेची माहिती मिळताच नंदुरबार तालुका -पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक सुनिल भाबड, पोलीस उपनिरीक्षक अमोल गुंजाळ हे तात्काळ घटनास्थळी पोहोचले. आपल्या सहकाऱ्यांच्या मदतीने घटनास्थळाचा आणि मृतदेहाचा पंचनामा केला आणि मृतदेह पोस्टमार्टमसाठी शासकीय रूग्णालयात पाठवला. त्यानंतर शोकाकुल वातावरणात विटाबाईवर अंत्यसंस्कार करण्यात आले. गळा आवळल्याने मृत्यू असा अहवाल मिळाल्याने नंदुरबार तालुका पोलीस ठाण्यात संतोष गांगुर्डे याच्या फिर्यादीवरून रामा गांगुर्डे याच्याविरूद्ध गुन्हा रजि. क्र. २७०/२०२५ भारतीय न्यायसंहिता २०२३ चे कलम १०३ (१) अंतर्गत खुनाचा गुन्हा दाखल करून रामा गांगुर्डे याला अटक करून गजाआड करण्यात आले.

## अनैतिक संबंधात पत्नीने साधला नेम...

त्यानंतर दोघांनी मृतदेह एका चादरीत गुंडाळून बदलापूर येथे नदीत फेकून दिला आणि तिथून फरार झाले. गुरुवारी रात्री किशन यांचा मृतदेह पोलिसांनी ताब्यात घेतला, जो पोस्टमोर्टमसाठी पाठवला होता. या घटनेबाबत आरोपींविरोधात भारतीय न्याय दंड संहिता कलम १०३(१) हत्या आणि २३८ अंतर्गत पुरावे मिटवण्याचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. परंतु अद्याप यात कुठलाही सुगावा हाती लागला नाही.

# ‘गुरुलिंगेश्वर विरक्त मठा’च्या सुशोभीकरण व विकासासाठी एक कोटी रुपयांचा निधी मंजूर



**देवणी : वार्ताहर**

देवणी येथील गुरुलिंगेश्वर विरक्त मठाच्या सुशोभीकरण व विकासासाठी विद्यमान आमदार संभाजीराव पाटील निलंगेकर यांनी एक कोटी रुपये मंजूर केले असून सदर या मठाला भारतीय जनता पार्टीचे महाराष्ट्र प्रदेश सचिव अरविंद पाटील निलंगेकर यांनी भेट दिली व मठाची पाहणी केली. यावेळी मठाचे अध्यक्ष महास्वामी सिद्धलिंग शिवाचार्य महाराज व महास्वामीजी वीरूपाक्ष शिवाचार्य महाराज मुखेडकर यांचे आशीर्वाद घेऊन त्यांच्या उपस्थितीत मठामध्ये आरती करण्यात आली. या प्रसंगी मठामध्ये आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमामध्ये भाग घेऊन सर्व भाविक भक्तांना अरविंद पाटील निलंगेकर यांनी संवाद साधला मठ व्यवस्थापना कडून आलेल्या मान्यवराचा सत्कार करण्यात आला. त्यावेळी विकास कामाची पाहणी करण्यात आली. या प्रसंगी गुरुलिंगेश्वर विरक्त मठाचे सचिव मल्लिकार्जुन मानकरी, चेअरमन दगडूजी सोळुंके, जिल्हा उपापाध्यक्ष शेषराव ममाळे, जिल्हा परिषदेचे माजी बांधकाम सभापती नागेश जीवणे, भाजपा देवणी तालुकाध्यक्ष शिवराज बिरादार, वैजनाथ अष्टुरे, मनोहर पटणे, माजी तालुकाध्यक्ष काशिनाथ गरीबे, माजी जिल्हा परिषद सदस्य प्रशांत पाटील जवळगेकर देवणी कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती सदाशिवराव पाटील तळेगावकर, उपसभापती दिलीप मजगे, शहराध्यक्ष अमर पाटील, रमेश मनसुरे, अटल धनुरे, अविराज पाटील, नगरसेवक किशोर निडवंचे, यशवंतराव पाटील, ओम धनुरे, पवन बिरादार, राज गुणाले, राजकुमार पाटील, सोमनाथ स्वामी हणमंत बिरादार बालाजी सूर्यवंशी इत्यादी कार्यकर्ते उपस्थित होते.

# सोलापूरातील आरटीओ कार्यालयजवळील ज्वेलर्स दुकानावर दरोडा टाकणारी टोळी जेरबंद

**सोलापूर : इरप्पा बोरीकरजगी**

सोलापूर शहरातील आरटीओ कार्यालयाजवळील बस स्टॉप शेजारी गणेशनगर समर्थ ज्वेलर्स दुकानावर धाडसी दरोडा टाकणाऱ्या टोळीला जेरबंद करण्यात सोलापूर शहर गुन्हे शाखेला यश आल्याची माहिती सोलापूर शहर पोलीस आयुक्त एम राजकुमार यांनी पत्रकार परिषदेत दिली आहे. साहिल दशरथ गायकवाड (२०), समर्थ समीर गायकवाड, सार्थक दशरथ गायकवाड, अजिंक्य चव्हाण, विशाल जाधव व एक विधी संघर्षित बालक असे या दरोड्यात सहभागी असलेल्या आरोपींची नावे आहेत. १ नोव्हेंबर २०२५ रोजी सायंकाळी ७:४५ वाजता शहरातील गणेश नगर बस स्टॉप जवळील दीपक वेदपाठक यांच्या समर्थ ज्वेलर्स दुकानावर पिस्टलचा धाक दाखवून दागिने लुटण्याच्या अयशस्वी प्रयत्न झाला होता.

यापरकरणी विजापूर नाका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला होता. या दरोड्याची घटना गंभीर स्वरूपाची असल्याने तो गुन्हा उघडकीस आणण्याबाबत पोलिस आयुक्तांनी गुन्हे शाखेचे सर्व पोलीस अधिकारी व पोलिस अंमलदार यांना मार्गदर्शनपर सूचना दिल्या होत्या. गुन्हे शाखेतील पोलीस अधिकारी व अंमलदार यांची सात तपास पथके तयार करून त्यांना मार्गदर्शन करून या घटनेच्या अनुषंगाने घटनास्थळापासून वेगवेगळ्या ठिकाणचे सुमारे १२५ सीसीटीव्ही फुटेजची बारकाईने पाहणी करण्यात आली. सीसीटीव्ही कॅमेऱ्याची तपासणी करून आरोपींची ओळख पटवत असताना गुन्हे शाखेकडील पोलीस अधिकाऱ्यांना गोपनिय माहिती मिळाली की आरटीओ ऑफिस जवळील रोडवरील समर्थ ज्वेलर्स या दुकानात



जबरी चोरी करणारे तिघेजण हे बजाज प्लटिना कंपनीची मोटरसायकल (एमएच-१३ ईए २५७८ ) घेऊन यतीम खाना जवळील मोकळ्या मैदानात थांबले आहेत, तात्काळ गुन्हे शाखेकडे पथक त्या ठिकाणी सापळा रचून बजाज प्लेटिना मोटरसायकल वरील त्या तिघांना शिपातीने ताब्यात घेतले. निळ्या रंगाच्या एक्टिवा गाडीवर अजिंक्य चव्हाण, विशाल जाधव व साहिल गायकवाड हे तसेच समर्थ गायकवाड, सार्थक गायकवाड व विधी संघर्षीत बालक असे प्लॅटिना मोटरसायकल वरून आरटीओ रोड येथील समर्थ ज्वेलर्स शॉपजवळ आले. त्यावेळी अजिंक्य चव्हाण व साहिल गायकवाड हे तोंडावर मास्क बांधून समर्थ ज्वेलर्स दुकानात शिरले व विशाल जाधव हा दुकानाचे बाहेर गाडीवरच थांबून राहिला तसेच उर्वरित हे तिघे सोन्याचे दागिने लुटताना काही गडबड झाल्यास त्यांना मदत करण्यासाठी समर्थ ज्वेलर्स दुकानाचे आसपास थांबून होते. या दरोड्यात वापरलेले सर्व साहित्य पोलिसांनी जप्त केले आहेत. यातील आरोपी समर्थ गायकवाड व अजिंक्य चव्हाण यांनी यापूर्वी होटगी रोडवरील चौधरी फिलिंग सेंटर पेट्रोल पंप येथे पिस्टल व चाकूचा धाक दाखवून चाळीस हजार रुपये चोरून नेले होते हा गुन्हाही उघडकीस आणण्यात आला आहे. ही सदरची कारवाई सोलापूर शहर पोलीस आयुक्त एम. राजकुमार, पोलीस उपायुक्त डॉ अश्विनी पाटील, सहाय्यक पोलीस आयुक्त राजन माने यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक अरविंद माने, सहाय्यक पोलीस निरीक्षक शैलेश खेडकर, शंकर धायगुडे, विजय पाटील, मुकेश गायकवाड, निलेश पाटील, तुकाराम घाडगे व दत्तात्रय काळे यांच्या पथकाने केली आहे.

# घोलवड समुद्रकिनारा परिसरात अंमली पदार्थ विक्री करणाऱ्यावर कारवाई

**डहाणू : वार्ताहर**

पालघर जिल्ह्यातील अंमली पदार्थ विक्रीवर अंकुश ठेवण्यासाठी जिल्हा पोलीस अधीक्षक यतिश देशमुख यांनी दिलेल्या कठोर सूचनांच्या पार्श्वभूमीवर तलासरी व घोलवड पोलीस ठाण्यांनी संयुक्त कारवाई करत चरस विक्री करणार्या एका इसमाला अटक केली आहे. या कारवाईत पोलिसांनी १२ लाख ५७ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. ६ नोव्हेंबर रोजी मध्यरात्री तलासरी पोलिसांना गुप्त माहिती मिळाली की, घोलवड पोलीस ठाणे हद्दीतील चिखला बीच येथे एक इसम चरस विक्रीसाठी येणार आहे. मिळालेल्या माहितीच्या आधारे पोलिसांनी सापळा रचला. पहाटे सुमारास काळ्या रंगाच्या मोटारसायकलवरून आलेल्या इसमास पोलिसांनी ताब्यात घेतले. चौकशीत त्याने आपले नाव सायमन जेत्या वळवी (वय ४०, रा. कैनाड कडुपाडा, डहाणू) असे सांगितले.



त्याच्या मोटारसायकलची झडती घेतली असता, हँडलला लावलेल्या प्लास्टिक पिशवीत ६०० ग्रॅम वजनाचा, १२ लाख रुपये किंमतीचा चरस हा अंमली पदार्थ सापडला. तसेच त्याच्याकडून मोबाईल फोन आणि मोटारसायकलसह एकूण १२,५७,००० रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. या प्रकरणी घोलवड पोलीस ठाणे गुन्हा क्र. १४४/२०२५ अंतर्गत एन.डी.पी.एस. कायदा कलम ८ (क), २० (ब) प्रमाणे गुन्हा दाखल करून आरोपीस अटक करण्यात आली आहे. या गुन्ह्याचा पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक साहेबराव कचरे करत आहेत. ही कारवाई पोलीस अधीक्षक यतिश देशमुख, अपर पोलीस अधीक्षक विनायक नरळे, तसेच उपविभागीय पोलीस अधिकारी अंकिता कणसे (डहाणू विभाग) यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. या पथकात पोलीस निरीक्षक अजय गोरड (प्रभारी अधिकारी तलासरी पोलीस ठाणे), पोलीस उपनिरीक्षक विकास दरगुडे, हिरामण खोटरे, योगेश मुंडे (तलासरी) तसेच पोलीस उपनिरीक्षक परमेश्वर जाधव, अविनाश पाटील, जितेश घाटाळ आणि राजेश धारणे (घोलवड) यांनी सहभाग घेतला. या कारवाईत पोलिसांनी १२ लाख ५७ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

# देवणीत विविध विकास कामाची अरविंद पाटील यांच्या कडून पाहणी

**देवणी : वार्ताहर**

निलंगा मतदार संघाचे आमदार संभाजीराव पाटील निलंगेकर यांनी देवर्जन देवणी कायम स्वरूपी पाणी पुरवठा योजनेसाठी ४२ कोटी रुपये मंजूर करुन त्या कामाला प्रत्यक्षात सुरुवात झाली आहे. सदर काम प्रगती पथावर आहे. यासह खंडोबा मंदिर सभागृह २५ लाख रुपये तसेच बोरोळ चौक ते नागेश जीवणे यांचे घर या रस्त्यासाठी ३.५ साडेतीन कोटी रुपये मंजूर केले आहेत. शंकराप्पा मंदिर सभागृह बारा लाख रुपये असे अनेक देवणी शहरात विकास कामे सुरु झाली आहेत, तर काही पूर्ण झाली आहेत. या सर्व कामाची पाहणी भारतीय जनता पक्षाचे महाराष्ट्र प्रदेश सचिव अरविंद पाटील निलंगेकर यांनी केले व होत असलेल्या कामाविषयी समाधान व्यक्त केले. देवणीच्या सर्वांगीण विकासासाठी निधी कमी पडू देणार नाही असे मत व्यक्त केले. यावेळी



यांच्या सोबत लातूर जिल्हा परिषदेचे माजी बांधकाम सभापती नागेश अण्णा जीवणे, भारतीय जनता पक्षाचे देवणी तालुकाध्यक्ष शिवराज बिरादार, सदाशिव पाटील, वैजनाथ अष्टुरे, भारतीय जनता पक्ष शहराध्यक्ष अमर पाटील, माजी तालुकाध्यक्ष मनोहर पटणे, माजी जि.प. सदस्य प्रशांत पाटील जवळगेकर, रमेश मन्सूरे, भाजपा युवा शहराध्यक्ष बालाजी सूर्यवंशी, सोमनाथ लद्दे, धनराज सूरवसे, गोविंद मेहत्रे, ओम धनुरे, ठेकेदार सोमनाथ स्वामी, दयानंद स्वामी नगरसेवक किशोर निडवंचे, हणमंत बिरादार, प्रमोद पाटील, सुनील शेंडगे, राज गुणाले, माधव बालुरे, व्यंकटराव देवने, राजकुमार पाटील, मयूर पटणे माधव घोडके, महेश धनुरे अनेक कार्यकर्ते उपस्थित होते.

# वसई तहसील कार्यालयाचा जनरेटर बंद अवस्थेत!

**वसई : वार्ताहर**

वसई तहसीलदार कार्यालयातील जनरेटर मागील काही महिन्यांपासून बंद अवस्थेत आहे. दोन वर्षांपूर्वी सदरचा जनरेटर चोरीस गेला होता. प्रसारमाध्यमे व राजकीय पक्षाच्या पदाधिकाऱ्यांनी याबाबत पाठपुरावा केल्यानंतर चोरी गेलेल्या जनरेटरच्या जागी वेगळा जनरेटर आणून ठेवण्यात आला. परंतु सदरचा जनरेटर निकामी असल्यामुळे तहसील कार्यालयात विजे अभावी नागरिकांना त्रास सहन करावा लागत आहे. एप्रिल २०२३ मध्ये वसई तहसीलदार कार्यालयाच्या प्रांगणा मधून एक भला मोठा जनरेटर रातोरात गायब झाला होता. तात्कालीन तहसीलदार उज्वला भगत यांच्या बदलीच्या आदेशानंतर दुसऱ्याच दिवशी हा प्रकार घडला होता. त्यानंतर तहसीलदार अविनाश कोष्टी यांनी कार्यभार स्वीकारल्यानंतर वसईतील काही सजग नागरिकांनी हा झालेला प्रकार उघडकीस आणला होता. शिवाय प्रसार माध्यमांनी याबाबत बातम्या प्रसिद्ध केल्या होत्या. याबाबत तहसीलदारांकडे लेखी तक्रारी व माहिती अधिकाराचा वापर करून शिवसेनेचे कोट नाका प्रमुख दत्ता जाधव




यांनी या प्रकरणाला तड लावली होती. सध्या आणून ठेवलेला जनरेटर हा भंगार स्वरूपाचा असून हा जनरेटर शोभेसाठी आणून ठेवला आहे. सदरचा जनरेटर मागील काही महिन्यापासून बंद अवस्थेत आहे. याबाबत प्रशासनाला अनेक वेळा सूचना देऊनही हा जनरेटर सुरू करण्यात आलेला नाही. सध्या या कार्यालयात वीज गेल्यानंतर नागरिकांना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागत आहे. याची कल्पना वरिष्ठ अधिकाऱ्यांना असूनही सदरचा जनरेटर कार्यान्वयीत करण्यात जाणीवपूर्वक चालढकल केली जात आहे. सदर बाबत शिवसेनेचे पदाधिकारी दत्ता जाधव यांनी जनरेटर कार्यान्वित न झाल्यास येत्या दिवसात तहसीलदार कार्यालयासमोर आंदोलन करणार असल्याचे सांगितले.

# अखेर नागरिकांनी स्वखर्चाने बुजवले चिंचोटी ते कामण रस्त्यावरील खड्डे!

**वसई : वार्ताहर**

गेल्या अनेक वर्षांपासून चिंचोटी कामण रस्त्याची अक्षरशः दुरावस्था झाली आहे. वारंवार तक्रारी, आंदोलने करूनही प्रशासन ढिम्मच असल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे संतप्त झालेल्या नागरिकांनी चिंचोटी ते कामण हा खड्डेमय रस्ता स्वखर्चाने बुजविण्याचा निर्णय घेऊन कामाला सुरुवात केली आहे. वसई पूर्वेच्या भागातून चिंचोटी- कामण- भिवंडी राज्य मार्ग गेला आहे. या रस्त्याची मागील अनेक वर्षांपासून अतिशय दयनीय अवस्था झाली आहे. रस्त्यावर पडलेले खड्डे यामुळे अपघात ही घडतात. पावसाळा सुरू झाल्यानंतर रस्त्याची आणखीनच बिकट अवस्था बनते. या रस्त्यावर दीड ते दोन फूट इतके खोल खड्डे तयार झाले आहेत. त्यामुळे येथून ये जा करताना शाळकरी विद्यार्थी, कामगार वर्ग, मालवाहतूकदार यांना मोठ्या अडचणींना तोंड द्यावे लागत आहे. पावसाळ्यात जेव्हा खड्डे पाण्याने भरतात तेव्हा त्याचा अंदाज येत नाही. त्यामुळे अपघाताच्या घटना घडत आहेत. तर उंच सखल असा रस्ता असल्याने काही वेळा अवजड मालाचे वाहने कोसळण्याच्या घटना ही समोर येत आहेत. या रस्त्याचा प्रश्न मार्गी लागावा यासाठी





सातत्याने मोठं मोठी आंदोलने झाली आहेत तर दुसरीकडे सार्वजनिक बांधकाम विभागाकडे वारंवार तक्रारी केल्या आहेत. परंतु या रस्त्याच्या दुरुस्तीकडे लक्ष दिले जात नसल्याने दिवसेंदिवस ही समस्या अधिक बिकट बनली आहे. रस्त्यावरील खड्डे आणि त्यातून प्रवास करताना फारच कसरत करावी लागत आहे. अन्य वाहन चालक व दैनंदिन प्रवासी वाहतूक करणारे रिक्षा चालक यांचे तरच हाल होत आहे. प्रशासन जागे होत नसल्याने संतप्त झालेल्या नागरिकांनी आता स्वतः रस्त्यावरून उतरून खड्डे दुरुस्त करण्याचा निर्णय घेतला आहे. युवा ग्रुप कामण यांच्या मार्फत हे काम केले जात आहे. खड्डे बुजविण्यासाठी लागणारे आवश्यक साहित्य व यंत्रणा सोबत घेऊन स्व खर्चाने ही कामे केली जात आहे. आम्ही सतत सांगतो की रस्त्यावरील खड्डे बुजवा नागरिकांचे जीव जात आहेत. परंतु प्रशासन काही आमच्याकडे लक्ष देण्यास तयारच नाही. त्यामुळे आम्हाला कोणी वालीच उरला नाही. म्हणून आम्ही सर्व तरुणांनी एकत्र येत आपणच काही तरी केलं पाहिजे या हेतूने स्व खर्चाने खड्डे बुजविण्याचा निर्णय घेतला आहे. चिंचोटी ते कामण आणि नागले इथपर्यंत खड्डे दुरूस्त करण्याचे नियोजन आहे असे सामाजिक कार्यकर्ते रजनीकांत म्हात्रे यांनी सांगितले आहे.

# वसई-विरार महापालिकेकडून अनधिकृत बांधकामविरोधी मोहीम तीव्र




**विरार : वार्ताहर**

वसई विरार शहरात गेल्या काही काळात उभारण्यात आलेली अनधिकृत बांधकामे गुन्हेगारी कृत्यांचे केंद्र ठरत आहेत. त्यामुळे महापालिकेने अशा बांधकामांविरोधात कारवाई तीव्र केली असून गुरुवारी २४ हजार चौरस फुटाचे अनधिकृत बांधकाम जमीनदोस्त करण्यात आले आहे. वसई विरार शहरात विविध ठिकाणी तसेच मुंबई अहमदाबाद महामार्गालगत मोठ्या प्रमाणावर दुकानांचे गाळे, पत्र्याचे मोठे शेड, इमारती, दुमजली चाळी अशा स्वरूपाचे अनधिकृत बांधकाम करण्यात येत आहे. कोणत्याही अधिकृत परवानगीशिवाय उभारण्यात आलेल्या या इमारती अमली पदार्थ निर्मिती आणि तस्करीचे केंद्र बनली असून यामुळे शहरातील गुन्हेगारी कृत्यांना चालना मिळू लागली आहे. शहरातील वाढत्या गुन्हेगारीला आळा घालण्यासाठी महापालिकेकडून अनधिकृत बांधकामविरोधी मोहीम तीव्र करण्यात आली आहे. या मोहिमेंतर्गत गुरुवारी महापालिकेकडून नेमण्यात आलेल्या अतिक्रमण विरोधी पथकाद्वारे शहरात प्रभागनिहाय तोडक कारवाई करण्यात आली. यात प्रभाग समिती ‘ए’ मधील श्री गणेश इमारत डोंगरपाडा येथील ३०० चौरस फूट, प्रभाग समिती ‘बी’ मधील साई पूजा, प्रगती नगर येथील ६०० चौरस फूट, प्रभाग समिती ‘सी’ मधील विरार येथील मनोहर इंडस्ट्रीज पाचपायरी येथील ८ हजार ७०० चौरस फूट आणि प्रभाग समिती ‘डी’ आचोळे स्मशानभूमी समोरील ६ हजार ५०० चौरस फूट अनधिकृत बांधकाम तोडण्यात आले आहे. तसेच प्रभाग समिती ‘ई’ मधील नालासोपारा येथील डाबरे अपार्टमेंट, मुर्गी बाजार व मनोज अपार्टमेंट येथील ३ हजार ९०० चौरस फूट, प्रभाग समिती ‘एफ’ मधील धानीव येथील ९०० चौरस फूट बांधकामावर कारवाई करण्यात आली आहे. तर प्रभाग समिती ‘जी’ मधील ससूनवघर, वॉल्टन हॉटेल ते किनारा ढाबा येथील ३ हजार ३०० चौरस फूट, प्रभाग समिती ‘एच’ मधील माणिकपूर सर्वे क्रमांक ९० येथील २४० चौरस फूट असे एकूण २४ हजार ४४० चौरस फूट बांधकाम एका दिवसाच्या कालावधीत अतिक्रमणविरोधी पथकाकडून जमीनदोस्त करण्यात आले आहे.

# अर्नाळा फॅक्टरी पाडा अंगणवाडी येथे डोळे तपासणी शिबिराचे आयोजन



**विरार : वार्ताहर**

मार्क्सवादी लेनिनवादी लाल बावटा पक्ष आणि लायन्स क्लब यांच्या संयुक्त विद्यमाने विरार पश्चिमेला अर्नाळा फॅक्टरी पाडा अंगणवाडी येथे मोफत डोळे तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. स्थानिक आरोग्य केंद्राच्या आवारात सकाळपासूनच नागरिकांची मोठी गर्दी उसळली होती. या शिबिरात एकूण १५५ नागरिकांची नेत्रतपासणी करण्यात आली. विशेष म्हणजे, १०० हून अधिक नागरिकांना तातडीने मोफत चष्मे वाटप करण्यात आले. शिबिरासाठी अनुभवी नेत्र तज्ज्ञांनी सेवा बजावली. कार्यक्रमाचे उद्घाटन पक्षाच्या जेष्ट कार्यकर्ता कॉ. सुचिता चव्हाण ह्याच्या हस्ते झाले. ह्या शिबिराचे आयोजनासाठी पक्षाचे तालुका सहसचिव कॉ. प्रशांत धोंडे, जिल्हा सहसेक्रेटरी कॉ. शेरू वाघ ह्यांनी केले होते. सामान्य जनतेच्या आरोग्याशी संबंधित उपक्रम हे आमच्या सामाजिक बांधिलकीचा भाग आहेत. अशा उपक्रमांद्वारे नागरिकांचे आरोग्य जपणे आमचे उद्दिष्ट असल्याचे आयोजकांनी सांगितले.

लायन्स क्लबचे एक पदाधिकारी म्हणाले की, नेत्र तपासणीसारख्या शिबिरांची गरज ग्रामीण आणि शहरी भागात सातत्याने आहे. भविष्यातही लाल बावटा पक्षाच्या सहयोगाने अशा उपक्रमांचे आयोजन भावी काळात केले जाईल. या उपक्रमामुळे स्थानिक नागरिकांनी आनंद आणि समाधान व्यक्त केले आहे. आयोजकांनी पुढील काही दिवसांनी पुन्हा दुसरे नेत्र तपासणी शिबिर याच ठिकाणी आयोजित करण्याची घोषणाही केली आहे.

10 TO 16 NOVEMBER 2025 - Page 4 (CRIME SANDHYA):Layout 1 11/8/2025 8:11 PM Page 1



# निवडणूक आयोगाची 'हिटलरशाही'

मागील लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीत कशा प्रकारे घोळ झाले. किती लोकांनी कुठे आणि कसे दुबार तीबार मतदान केले याची विरोधकांनी आकडेवारी दाखवूनही निवडणूक आयोग त्यात सुधारणा न करताच निवडणुका घेणार आहे.ही अक्षरश हिटलरशाही आहे.म्हणजे सदोष असलेल्या मतदार याद्या न सुधारता निवडणूक आयोगाला निवडणूक घ्यायची असेल तर लोकांनी अशा निवडणुकीवर बहिष्कार घालावा.वास्तविक निवडणुका हा लोकशाहीचा महत्वाचा पाया आहे .त्यामुळे निवडणुका व्हायलाच हव्यात पण त्या पारदर्शक असाव्यात एवढेच लोकांचे म्हणणे आहे.लोकशाईत निवडणुकांचे महत्व खूप मोठे आहे.कारणमतदान हा आपला महत्त्वाचा हक्क, अधिकार आहे. त्यामुळे मिळालेल्या या अधिकाराचा वापर प्रत्येक भारतीय नागरिकाने प्राधान्याने करावा आणि मतदानाचे कर्तव्य पार पाडावे. आपल्या देशाने लोकशाही स्वीकारली आणि आपण ही पद्धती अजूनही टिकवून ठेवली आहे. लोकशाहीने अनेक सुविधा, अधिकार, हक्क आपल्याला दिले आहेत. दर पाच वर्षांनी होणाऱ्या लोकसभा निवडणुकीत मतदारांनी बजाविलेल्या मतदानाच्या अधिकारातून केंद्रात शासन स्थापन होते. येथे चांगली माणसे/राज्यकर्ते असावेत, असे एक सुजाण नागरिक म्हणून आपल्याला वाटत असेल, तर कोणतीही सबब न सांगता प्रत्येकाने मतदान करावे.चांगले राज्यकर्ते निवडून येण्यासाठी आपल्या प्रत्येकाचे एकेक मत महत्त्वाचे आहे. ते देशातील लोकशाहीच्या भवितव्यासाठी आणि आपल्या पुढील पिढीसाठीही खूप गरजेचे आहे. त्यामुळे मतदान टाळू नये. मतदानाच्या माध्यमातून देशातील नागरिकांना देशात कसा बदल हवा आहे, त्यांना कसे राज्यकर्ते हवे आहेत हे कळते. त्या दृष्टीनेही मतदान महत्त्वपूर्ण आहे. आपण कोण आहोत, आपल्याला जीवनात काय हवे आहे ते ठरविण्यासाठीही मतदानाची मदत होऊशकते, कारण मतदानाच्या माध्यमातून राज्यकर्ते निवडले जातातआणि योग्य व चांगले राज्यकर्ते निवडून दिले तर आपल्याला जे हवे आहे, त्या अपेक्षा ते पूर्ण करू शकतात, पण त्यासाठी प्रत्येकाने मतदान केलेच पाहिजे. निवडणूक आयोगाच्या वतीने करण्यात येणारा प्रशासकीय खर्च हा दिवसेंदिवस वाढतच चालला आहे. चौथ्या औद्योगिक क्रांतीच्या या युगात कागदविरहित प्रशासनाकडे वाटचाल करणे क्रमप्राप्त आहे आणि ते कालसुसंगतदेखील आहे. मात्र निवडणूक आयोगाचे पेपरलेस कारभाराकडे काहीसे दुर्लक्ष दिसून येते. आयोगाने ठरवले तर निवडणूक जाहीर केल्यापासून ते निकाल जाहीर करेपर्यंतच्या प्रत्येक टप्प्यावर पेपरलेस कारभार करता येऊ शकतो. पर्यावरणपूरक निवडणूक प्रक्रिया व तंत्रज्ञान वापराविषयीचा एक विस्तृत अहवाल दोन वर्षांपूर्वीच मी महाराष्ट्राच्या मुख्य निवडणूक आयुक्तांना सादर केला होता. याविषयीचे सादरीकरणदेखील करण्यात आले होते, मात्र दोन वर्षांनी यातील कोणत्याही बाबींवर आयोगाने सकारात्मक पावले उचलल्याचे दिसत नाही, हे खेदाने नमूद करावेसे वाटते. सेंटर फॉर मीडिया स्टडिजच्या अहवालानुसार सन २०१४ मध्ये लोकसभेच्या निवडणुकांच्या व्यवस्थापनाकरिता भारतीय निवडणूक आयोगाने तब्बल ३४२६ कोटी रुपये खर्च केले. सन २००९ मध्ये हा खर्च १४८३ कोटी इतका होता. प्रति मतदार खर्चाचा आढावा घेतला तर सन १९५२ साली केवळ ६० पैसे प्रति मतदार खर्च केला जात होता, तोच खर्च सन २००९ मध्ये १२ रुपयांवर पोहोचला आहे. महागाई निर्देशांकाचा आधार घेत हा खर्च वाढला आहे, असे समर्थन करता येईल. मात्र निवडणुकीच्या खर्चात काटकसर करण्याचे धोरण निवडणूक आयोग राबवत नाही, असे वारंवार दिसून आले आहे. मोठ्या मानाने आणि सढळ हाताने अनेक अनावश्यक बाबींवर निवडणूक आयोग वारेमाप खर्च करीत असल्याचे निरीक्षण ही प्रक्रिया पार पडणाऱ्या अधिकाऱ्यांनी नोंदवले आहे. तंत्रज्ञानाच्या वापराने प्रशासकीय खर्चात बचत होण्याऐवजी वाढ होत असल्याचे दिसून येत आहे. जनतेच्या पैशातून निवडणुका पार पाडल्या जात असताना वाढत्या खर्चासोबत मतदारांना दिल्या जाणाऱ्या सेवा आणि त्यांचा दर्जा यात तफावत आहे. आजही अनेक ठिकाणी मतदारांना आयोगाच्या वतीने दिली जाणारी मतदार स्लिप मिळत नसल्याच्या तक्रारी असतात तर मतदार यादीत नाव नोंदवूनदेखील अनेकांना मतदानापासून वंचित राहावे लागते. निवडणुकीवर एवढा खर्च करूनही निवडणुकीत पारदर्शकता नसेल आणि निवडणूक प्रक्रियेतील त्रुटी दाखवूनही निवडणूक आयोग त्याची दखल घेणार नसेल तर कशाला हव्यात निवडणुका? हे सर्व दिसत असल्यामुळेच लोक आजकाल मतदानात भाग घेत नाहीत. परिणामी मतदानाची टक्केवारी घसरत चालली आहे. आणि याला अर्थातच निवडणूक आयोग जबाबदार आहे. वास्तविक विरोधी पक्षांनी मागणी केल्या नुसार मतदार याद्या व्यवस्थित केल्याशिवाय निवडणुका घ्यायला नको होत्या .पण निवडणूक आयोगाने महाराष्ट्रातील काही स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका जाहीर करून सदोष मतदार याद्यांच्या आधारेच निवडणुका घ्यायचे निश्चित केले आहे. त्यानुसार ज्या मतदार याद्यांमध्ये एकच मतदाराची दोन दोन ठिकाणी नवे आहेत ते दोन्ही ठिकाणी मतदान करू शकतो. परिणामी मतदानाची टक्केवारी तर वाढेलच पण दोन ठिकाणी मतदान करणारा ज्या पक्षाचा असेल त्या पक्षाची मतेही वाढतील. त्यामुळे या निवडणुकांना काहीच अर्थ राहणार नाही.

# डॉ.बाबासाहेब आंबेडकर जगातील महान विद्यार्थी!

जागतिक विद्वान, महान कायदे पंडित, भारतीय घटनेचे एकमेव शिल्पकार, महान अर्थशास्त्रज्ञ, महान प्राध्यापक, महान बॅरिस्टर डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर हे जगातील महान विद्यार्थी होते ते जगातील सर्व विद्यार्थ्यांचे आदर्श आहेत तथागत बुद्ध, गुरु कबीर, महात्मा ज्योतिबा फुले हे बाबासाहेबांचे गुरु होते. डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांचा जन्म १४ एप्रिल १८९१ ला मध्य प्रदेशातील महू येथे झाला. त्यांचे वडील रामजी बाबा इंग्रजांच्या सैन्यात सुभेदार मेजर होते. त्या अगोदर रामजी बाबांचे वडील मालोजी हे इंग्रजाचया सैन्यातहोते ते पण इंग्रजी शिकलेले होते ते संस्कार संपन्न होते रामजी बाबांनी सैन्यात शिक्षण घेतले. शिक्षक व मुख्याध्यापक झाले त्यांचे इंग्रजी व गणित फार पक्के होते त्यांनीच बाबासाहेबांना इंग्रजी व्याकरण व गणित घरी सुद्धा शिकवले रामजी बाबा बाबासाहेबांना अनेक पुस्तके वाचायला आणून देत असत ते खरे बाबासाहेबांचे पहिले गुरु म्हणावे लागतील. बाबासाहेबांचे आजोबा मालोजी सुद्धा इंग्रजांच्या सैन्यात होते. रामजी बाबा सैन्यातून निवृत्ती झाल्यावर दापोलीस राहू लागले त्यानंतर ते मुंबईला गेले. रामजी बाबांना सातारा येथे पीडब्ल्यूडी खात्यात स्टोर कीर्ती आणि नोकरी मिळाली डॉक्टर बाबासाहेब सहा वर्षाचे झाल्यावर त्यांना साताऱ्याच्या कॅम्प स्कूलमध्ये नोव्हेंबर १८९६ ला मराठी शाळेत घातले. त्याच शाळेत आनंदराव शिकत होते. परंतु त्यांना लहानपणापासून जातीवाद सहन करावा लागला बाबासाहेबांच्या माता भिमाईचे बाबासाहेब लहान असतानाच सातारा येथे १८९६ मध्ये निधन झाले. त्यांची समाधी सातारा येथे आहे त्यांची आत्या मीराबाई होत्या. मीराबाईने त्यांना खूप जीव लावला त्यांचे आडनाव संकपाळ होते लहानपणी जातीयवादामुळे त्यांची कटिंग करून देत नव्हते बाबासाहेब व त्यांचा भाऊ आनंदराव यांना वर्गाच्या बाहेर बसून शिक्षण घ्यावे लागले. त्यांना शाळेत पाणी सुद्धा देत नव्हते त्यांनी पाणी पिले तर त्यांना मारले होते.

साताऱ्याच्या शाळेत त्यांना प्रवेश देण्यास जातीवाद्यांचा अडथळा होता. त्यांचे वडील रामजी बाबांनी बाबासाहेबांना शाळेच्या प्रवेशासाठी खूप प्रयत्न केले. कॅम्प स्कूल मधून बाबासाहेबांनी मराठीतून शिक्षण पूर्ण केले. त्यानंतर सातारा हायस्कूलमध्ये ७ नोव्हेंबर १९०० ला त्यांना इंग्रजीच्या पहिल्या वर्गात घालण्यात आले १९५१ ला त्यांचे शाळेचे नामकरण प्रताप सिंह हायस्कूल असे झाले. पूर्वी चे नाव गोरमेंट हायस्कूल होते त्यांना हायस्कूलमध्ये पेंडसे नावाचे शिक्षक होते रामजी बाबा यांची साताऱ्याची सरकारी नोकरी संपली त्यानंतर ते १९०४ ला मुंबईला आले. १९०५ ला बाबासाहेबांचे रमाईशी लग्न झाले रामजी बाबा घरी भीमरावांचा खूप अभ्यास करून घेत असत त्यांनी भीमरावांना हावर्डच्या इंग्रजी पुस्तकांचा आणि तरखडकरांच्या इंग्रजी पाठमालेचा अभ्यास शिकविला इंग्रजी भाषा शिकवली तसेच रामजींनी गणित सुद्धा भीमरावांना शिकवले (संदर्भ... महामानव डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर लेखक डॉक्टर ज्ञानराज काशिनाथ गायकवाड राजवंश) भारतातील वर्णभेद व जातीभेदामुळे मागास व बहुजन समाजाचा व महिलांचा खूप छळ झाला. पेशवाई तर फारच जातीवाद होता रामजी बाबा मुळे घरातील सर्वांना कबीरांचे दोहे व तुकारामांच्या गाथा पाठ कराव्या लागत. लहानपणी त्यांना क्रिकेट खेळताना जातीवाद सहन करावा लागला.

जिजाबाई त्यांच्या सावत्र आई होत्या बाबासाहेबांना संस्कृत शिकू दिले नाही पुढे त्यांनी स्वतः नंतर संस्कृत शिकली. बाबासाहेबांचे वडील रामजी बाबा मुंबईला आले तेथे येली पिस्टन हायस्कूलमध्ये भीमरावांचे नाव टाकले परंतु त्यांना शाळेत प्रवेश द्यावा की नाही यावर शाळेने तीन दिवस लावले. डॉक्टर बाबासाहेब लहानपणापासून खूपच बुद्धिमान होते. एलीफिस्टन मध्ये



एक उच्चवर्णीय शिक्षक त्यांना नेहमी जातीयवादी दृष्टीने पाहत असे बाबासाहेबांना ते शिक्षक एकदा म्हणाले की तू शिकून काय करणार?, तेव्हा बाबासाहेब म्हणाले की ते विचारणे तुमचे काम नाही त्या ठिकाणी खुदाबक्ष बेरामजी इराणी हे त्यांना पारशी भाषा शिकवीत असत इतर काही शिक्षक मात्र तिरसकरांनी वागवत असत बाबासाहेबांना इंग्रजीचे शिक्षक प्रोफेसर मयुललर हे होते बाबासाहेबांना इंग्रजी आणि पारशीयन भाषेत ७५ टक्के मार्क मिळत असत बाबासाहेबांनी खूप त्रास सहन केला जातीयवाद सहन केला.

सन १९०७ मध्ये डॉक्टर बाबासाहेब मॅट्रिक उत्तीर्ण झाले तेव्हा सर्वांना खूप आनंद झाला. सर्वांनी त्यांचा सत्कार करण्याचे ठरविले केळुस्कर (कदम,) गुरुजी हे कुणबी समाजाचे सत्यशोधक होते त्यांनी बाबासाहेबांना खूप मदत केली. त्यांच्यामुळे बडोद्याचे राजे सयाजीराव गायकवाड यांनी बाबासाहेबांना स्कॉलरशिप दिली. बाबासाहेब १९१२ ला बीए झाले ही अभूतपूर्व घटना होती. रामजी बाबा व इतरांना खूप आनंद झाला पुढे ते बडोदा येथे नोकरीसाठी गेले पण रामजी बाबा आजारी पडल्याने बडोद्यातून परत मुंबईस आले १९१३ ला रामजी बाबांचे निधन झाले. डॉक्टर बाबासाहेबांना रमा माता नी खूप साथ दिली. बाबासाहेबांना १९१२ ला यशवंत उर्फ भैय्यासाहेब हे पहिले सुपुत्र झाले सयाजी राजे गायकवाड खूप सुधारणावादी राजे होते त्यांनी बाबासाहेबांना अमेरिकेत उच्च शिक्षणासाठी १९१३ ला पाठविले. डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर तेथे नवलभतेंना नावाच्या पारशी धर्माच्या मित्राने खूप साथ दिली. डॉक्टर बाबासाहेबानी अमेरिकेत १८-१८ तास अभ्यास केला. एमए पीएचडी झाले. त्यांचा तेथे सत्कार झाला. बाबासाहेब अमेरिकेत असताना अनेक विषयाचा खूप अभ्यास करायचे प्रोफेसर सेलींगमनवयांना डॉक्टर बाबासाहेब बद्दल फार अभिमान होता डॉक्टर बाबासाहेब पुन्हा बडोद्याला नोकरीसाठी गेले असता त्यांना जातीयवादी लोकांनी फार त्रास दिला.अमेरिकेतील प्राध्यापक शेलिंग मन म्हणायचे की डॉक्टर भीमराव आंबेडकर सर्व विद्यार्थ्यांत हुशार आहेत डॉक्टर बाबासाहेब लंडनला शिक्षणासाठी एक वर्षापर्यंत होते कोलंबिया विद्यापीठात प्रोफेसर सिंगर होते त्यांनी असे म्हटले होते की भीमरावांची अर्थशास्त्रातील प्रगती एखाद्या प्रोफेसर पेक्षा जास्त आहे नंतर त्यांनी अर्थशास्त्रात एम एस सी डी एस सी केली व बॅरिस्टर चे शिक्षण परत लंडनला जाऊन पूर्ण केले बाबासाहेब ने १९१६ ला लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स मध्ये प्रवेश घेतला. तेथे एम एस सी व डी एस सी झाली त्याच वेळेस त्यांनी ग्रीन मध्ये प्रवेश घेतला व बॅरिस्टर झाले बाबासाहेब जर्मनीच्या बॉन विद्यापीठात शिकले त्यांना वाचनाची खूप आवड होती खूप पुस्तके विकत घेत असत. त्यांचे ग्रंथ असलेले जहाज युद्धात बॉम्ब पडल्याने बुडाले १० नोव्हेंबर १९१८ ला मुंबई कॉलेजात अर्थशास्त्राचे प्राध्यापक झाले. बाबासाहेब महान प्राध्यापक होते १९१९ ला कोल्हापूरचे राजे छत्रपती शाहू महाराज यांनी मुंबईला बाबासाहेबांची भेट घेतली आणि त्यांना मूकनायक नावाचे वर्तमानपत्र काढण्यासाठी आर्थिक मदत केली. त्यांचे भाऊ बाळाराम यांनी त्यांना साथ दिली नंतर ते लंडनला गेले जेवणासाठी पैसे नव्हते तरी त्यांनी २१-२१ तास अभ्यास केला १९२३ ला ते बॅरिस्टर झाले व भारतात आले १९२७ ला इंग्रजांनी बाबासाहेबांना आमदार नेमले १९२७ ला मनुस्मृति जाळली. लाला लजपत राय यांची इच्छा होती की बाबासाहेबांनी इंग्रजा विरुद्ध लढावे पण बाबासाहेबांना सामाजिक गुलामगिरी नष्ट करायची होती. सिडनेहमह्या कॉलेजमध्ये ते खूप चांगले शिकवायचे ते विद्यार्थ्यांमध्ये फार लोकप्रिय झाले होते. प्राध्यापक शेलिंग मन बद्दल डॉक्टर बाबासाहेब म्हणतात सेलिंग मन या माझ्या प्राध्यापकांचे माझ्यावरील ऋण अमाप आहे कारण राजस्व मधील पहिला धडा मी त्यांच्यापासून शिकलो, (संदर्भ महामानवास अमेरिकेत मानवंदना प्राध्यापक डॉक्टर व्ही बी तायडे) जगामध्ये कार्ल मार्क्स लेनिन अब्राहम लिंकन बुकर टी वॉशिंग्टन चर्चिल चीनचे माऊ हे सुद्धा शिकले पण तेथे सामाजिक विषमता जातीयवाद नव्हता तसेच भारतामध्ये न्यायमूर्ती रानडे नामदार गोखले गांधीजी नेहरूजी इत्यादी नेते झाले पण त्यांना शाळेत मुक्त प्रवेश होता. परंतु डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांनाउ मात्र शाळेत प्रवेश नव्हता वर्गाच्या बाहेर बसून शिकावे लागले बाबासाहेबांना सामाजिक विषमतेमुळे लहानपणापासून खूप त्रास झाला. अशा कठीण परिस्थिती बाबासाहेबांनी शिक्षण घेतले तसेच बाबासाहेबांनी अमेरिकेत १८-१८ तास अभ्यास केला तसेच इंग्लंडमध्ये २१-२१ तास अभ्यास केला त्यांच्या खाण्यापिण्याची काहीच सोय नव्हती तरी त्यांनी खूप अभ्यास केला. एकदा वर्गात शिक्षकाने एक गणित सोडविण्यासाठी विद्यार्थ्यांना दिले कोणीही उत्तर देऊ शकले नाही परंतु ते फक्त बाबासाहेबांनी सोडवले. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी कष्टाने व जिद्दीने शिक्षण घेऊन खूप पदव्यामिळवल्या त्यांना फारमोठ्या नोकऱ्या मिळाल्या असत्या पण त्यांनी भारतातील जनतेसाठी त्याग केला. त्यांनी समाजकार्यासाठी वकिली सुरू केली ते कायदे पंडित होते त्यांना १९३६ ला जिल्हा न्यायाधीश पद मिळणार होते पण त्यांना समाजकार्य करता यावे यासाठी त्यांनी ते नाकारल.

१९४२ ला त्यांना उच्च न्यायालयाचे न्यायाधीश पद मिळणार होते पण ते सुद्धा त्यांनी नाकारले पुढे त्यांनी सामाजिक आंदोलने केली पार्वती मंदिर सत्याग्रह, नाशिक काळाराम सत्याग्रह, महाड चवदार तळ्याचे सत्याग्रह केला ते भारताचे मजूर मंत्री झाले त्यांनी हिंदू कोड बिल तयार केले स्वतंत्र भारताचे कायदेमंत्री झाले भारतीय घटनेचे शिल्पकार झाले व भारतात व बुद्ध धम्मचे पुनर्जीवन केले कोलंबिया विद्यापीठाने बाबासाहेबांचा मोठा पुतळा उभारला असून त्यातील सिम्बॉल ऑफ नॉलेज असे लिहिले आहे. तसेच आमच्या विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांनी भारताची राज्यघटना लिहिली आहे याचा आम्हाला अभिमान वाटतो असे म्हटले आहे त्यामुळे बाबासाहेब जगातील महान विद्यार्थी आहेत त्यांचा आदर्श आजकालच्या भारतीय संपूर्ण विद्यार्थ्यांनी बाबासाहेबांचं ध्येय धोरण विद्यार्थी कसा असावा हे मूळ त्यांनी आत्मसात करून आपल्या जीवनाची वाटचाल पुढे करावी या अशा या जगातील आदर्श विद्यार्थी डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर अशा या विद्यार्थी दिनानिमित्त सर्वांना क्राईम संध्या परिवारातर्फे शुभेच्छा व त्यांनी बाबासाहेबांचे विद्यार्थी जीवन आत्मसात करावे हीच अपेक्षा.

– प्राचार्य शंकर सोनवणे

# ॲड.असीम सरोदे यांचे सनद निलंबन म्हणजे अभिव्यक्ती स्वातंत्र्यावर थेट हल्ला -एआयएलयू

ऑल इंडिया लॉयर्स युनियन (ILU) ख्यातनाम मानवाधिकार वकील ॲड. असीम सरोदे यांची सनद बार कौन्सिल ऑफ महाराष्ट्र अँड गोवा (BCMG) यांनी निलंबित केल्याच्या निर्णयाचा तीव्र निषेध करते. आरएसएस प्रणित भाजप सत्तेवर आल्यापासून आपल्या विरोधी सर्वच आवाजाची गळचेपी चालू आहे. राजकीय विरोधक, सामाजिक कार्यकर्ते, विचारवंत, लेखक, मानवाधिकार कार्यकर्ते, पत्रकार आणि वकील आदी लोकं सरकार लक्ष्य करत आहे. एआयएलयू या गोष्टीचा जाहीर निषेध करते आणि त्यांच्यावरील ही कारवाई रद्द करण्याची मागणी करते. हा तीन महिन्यांचा निलंबनाचा आदेश केवळ मार्च २०२४ मध्ये झालेल्या एका सार्वजनिक कार्यक्रमात ॲड.सरोदे यांनी केलेल्या टिप्पण्यांवर आधारित आहे, जिथे त्यांनी न्याय व्यवस्थेच्या कार्यपद्धती आणि संवैधानिक पदाधिकाऱ्यांच्या जबाबदारीवर भाष्य केले होते. भाजपाचे महाराष्ट्राचे माजी राज्यपाल यांच्यावर टीका केली तसेच भाजपाचे विधानसभा अध्यक्ष यांच्या निकालावर नापसंती व्यक्त केली या कथित कारणासाठी वकिलांच्या महाराष्ट्र आणि गोवा बार असोसिएशनच्या शिस्तभंग विषयक समितीने तीन महिन्याच्या निलंबनाची कारवाई केली आहे.

त्या कार्यक्रमात ॲड. सरोदे यांनी न्याय वितरण यंत्रणेतील प्रणालीगत विलंब, सामान्य नागरिकांना न्यायालयात प्रवेश मिळवण्यातील अडचणी आणि संवैधानिक पदाधिकाऱ्यांच्या अधिक जबाबदारीची गरज यावर बोलले होते. माध्यमांच्या अहवालानुसार त्यांनी काही संवैधानिक पदे – यात राज्यपालांचाही समावेश आहे – आपली कर्तव्ये पार पाडण्याच्या पद्धतीवर प्रश्न उपस्थित केले लोकशाहीत सर्व संवैधानिक पदाधिकारी जनतेप्रति जबाबदार राहिले पाहिजेत या आशयाचे विधान केले होते. त्यांची ही टिप्पणी रचनात्मक आणि लोकशाही भावनेने केलेली होती, ज्यात संवैधानिक चौकटीतील संस्थांनी पारदर्शक आणि जबाबदारीने कार्य करावे अशी अपेक्षा व्यक्त केली होती. शासन पुरस्कृत दिरंगाईत प्रणालीतील त्रुटी उजागर करणे कोणत्याही व्यक्तीची बदनामी करणे किंवा न्यायव्यवस्थेचा अपमान करणे नसते. त्यांनी जर एखाद्या पक्षाच्या अंतर्गत कार्यक्रमांमध्ये काही टिपणी केली असेल तर तो त्यांचा लोकशाही अधिकार आहे. त्यामुळे त्यांनी कोणत्याही पदाचा अनादर केलेला नाही. स्वतः भाजपाचे माजी राज्यपाल आणि विधानसभा अध्यक्ष यांनी सुद्धा त्याबद्दल कोणतीही वैयक्तिक तक्रार केलेली नाही. असे असताना एखाद्या त्रयस्थ आणि भाजपा कार्यकर्त्याच्या अर्जावर वकील बार कौन्सिलच्या शिस्तभंग विषयक समितीने निलंबनासारखी कठोर शिक्षा देणे अत्यंत अयोग्य, चुकीचे आणि दडपशाही करणारे आहे.

ॲड.सरोदे यांनी कोणताही शिस्तभंग किंवा वकील म्हणून कोणतेही अनैतिक वर्तन केलेले नाही परंतु त्याचा कोणताही विचार बार कौन्सिलने केल्याचे दिसत नाही. बार कौन्सिल सारख्या नियामक मंडळाने पक्षिय राजकारण्यापासून स्वतःला अलग ठेवत आपले निर्णय कायद्याच्या चौकटीनुसार घेणे अपेक्षित असते. भाजपच्या अथवा कुठल्याही राजकीय भूमिकांसाठी बार कौन्सिलचा गैरवापर होऊ न देणे ही बार कौन्सिलची जबाबदारी आहे प्रसिद्ध पर्यावरणवादी कार्यकर्ते सोनम वांगचूक यांच्यावर नुकतीच देशद्रोहासारख्या कलमाखाली



दडपशाही करणारी कारवाई भाजपा सरकारने केलेली आहे. अशाच प्रकारे देशामध्ये पत्रकार, लेखक, सामाजिक कार्यकर्ते, वकील यांच्यावर कारवाई आणि दडपशाही सुरू आहे. संविधानाने दिलेले जनतेचे अभिव्यक्ती स्वातंत्र्य अबाधित राखणे ही सर्व कायदेशीर संस्थांची महत्त्वाची जबाबदारी आहे.

या कार्यक्रमानंतर भाजप व आरएसएस संबंधित व्यक्तींनी महाराष्ट्र आणि गोवा बार असोसिएशनच्या (BCMG) कडे तक्रार दाखल केली. त्या तक्रारीवर कारवाई करत बार कौन्सिलने १२ ऑगस्ट २०२५ रोजी ॲड. सरोदे यांचा परवाना तीन महिन्यांसाठी निलंबित करण्याचा आदेश पारित केला. मात्र हा आदेश त्यांना ३ नोव्हेंबर २०२५ रोजी म्हणजे जवळपास तीन महिन्यांनंतर कळवला गेला. आदेश कळवण्यातील विलंब आणि आदेशाचे कारण स्पष्ट न करणे यामुळे प्रक्रियात्मक न्याय आणि नैसर्गिक न्यायाच्या तत्त्वांचे पालन याबाबत गंभीर शंका निर्माण झाल्या आहेत. कायदा व्यवसायातील सदस्यांनी चिंता व्यक्त केली आहे की अनुशासनात्मक प्रक्रिया बाह्य दबाव किंवा राजकीय विचारांमुळे प्रभावित झाल्याचे दिसते, कारण लोकशाही मत व्यक्त केल्याबद्दल दंडात्मक कारवाई ही ना न्याय्य आहे, ना संविधानात हमी असलेल्या अभिव्यक्ती स्वातंत्र्याशी सुसंगत आहे. निरोगी लोकशाही टिकवण्यासाठी वकील म्हणून न्याय व्यवस्था, सरकारी कृत्ये किंवा संवैधानिक पदाधिकाऱ्यांवर टीका करणे हे वकीलाचे हक्क आणि कर्तव्य आहेत, प्रश्न उपस्थित करणे आणि सुधारणा मागणे हे लोकशाही अधिकार असून नाही; अशा आवाजांना दडपणे हे दुष्कृत्य आहे. अनुशासनात्मक कार्यवाहीचा वापर करून वकीलांना गप्प करणे हे कायदा व्यवस्थेलाच अन्याय करणे आहे.

एआयएलयू मागणी करते की बार कौन्सिल ऑफ महाराष्ट्र अँड गोवा यांनी त्वरित निलंबन मागे घ्यावे आणि बार कौन्सिल ऑफ इंडिया (BCI) यांनी हस्तक्षेप करून अनुशासनात्मक यंत्रणा स्वतंत्र, पारदर्शक आणि राजकीय हस्तक्षेपाशिवाय कार्यरत राहील याची खात्री करावी. संवैधानिक मत व्यक्त केल्याबद्दल वकीलाला लक्ष्य करणे हे धोकादायक आहे व लोकशाही स्वातंत्र्यांच्या मूलभूत पायावरच आघात असल्याने कदापि सहन केले जाणार नाही. ॲड.असिम सरोदे यांना त्यांची सनद तत्काळ बहाल करण्यात यावी. एआयएलयू ॲड. असीम सरोदे यांच्यासोबत पूर्ण एकजूटीने उभी आहे.

हे साप्ताहिक वृत्तपत्र मालक, मुद्रक व संपादक **धनराज (लक्ष्मणराव) शंकरराव पाटोळे** यांनी एस.आर. पब्लिकेशन, मोहन अर्जुन कंम्पाऊंड, शॉप नंबर ८,९,१० घरटनपाडा, वैशालीनगर बस स्टॉप, दहिसर पुर्व, मुंबई-६८ महाराष्ट्र येथे छापून नव निशीगंधा अपार्टमेंट, मनवेलपाडा रोड, विरार (पूर्व), ता.वसई, जि.पालघर येथून प्रकाशित केले. आरएनआय नं. एमएएचएमएआर २०१२/४५५५२. न्यायकक्षा (वसई), वसई कार्यालय, साईद्वारा अपार्टमेंट, शॉप नं.४, विशालनगर, अंबाडी रोड, माणिकपूर पोलिस स्टेशन जवळ, ता.वसई (पश्चिम), जि.पालघर. फोन नंबर ०२५०-२३४५९५९, मोब.: ९८९०७१८८७३, **कार्यकारी संपादक : गणेश मार्तंड चव्हाण,** सहसंपादक (मराठवाडा): **राम पाटोळे,** कायदेशीर सल्लागार : **ॲड.रूपेश शिंदे.** न्यायकक्षा-वसई. E-mail : crimesandhyavasai@gmail.com, whatsapp No. 9890718873 Website: www.crimesandhya.com

# देवणीत स्मशानभूमी अभावी रस्त्याच्या कडेलाच करावे लागतात ‘अंत्यसंस्कार’

**• निवेदने देऊनही एनगेवाडी, आजणी येथील स्मशानभूमीच्या प्रश्नाकडे दुर्लक्ष**

**• देवणी तालुक्यात १४ गावांमध्ये नागरिकांची गैरसोय; जागा देण्याची मागणी**



**देवणी : शकील मनियार**

ग्रामविकासाच्या नावाखाली अनेक योजना राबवल्या जात असल्या तरी देवणी तालुक्यातील वास्तव अजूनही वेदनादायक आहे. तालुक्यातील ४५ गावांपैकी १४ गावांमध्ये आजही स्मशानभूमी व जागाही उपलब्ध नाही. परिणामी मृत व्यक्तींचे अंत्यसंस्कार उघड्यावर, नाल्याजवळ किंवा शेताच्या बांधावर करावे लागतात. याकडे प्रशासनाने लक्ष देण्याची मागणी होत आहे. अनेक ग्रामपंचायतीकडे स्मशानभूमीसाठी जमीन उपलब्ध नाही किंवा असली तरी मालकी हक्काचे वाद, सीमांकनाचे प्रश्न अशी आहे. देवणी तालुक्यातील ४३ गावांमध्ये स्मशानभूमी असून, स्मशानभूमी व जागे अभावी १४ गावांत अंत्यसंस्कार उघड्यावर होतात. शेडची सुविधा २५ गावांमध्ये असून ३२ गावामध्ये शेडच उपलब्ध नाहीत. ५७ गावामध्ये स्मशानभूमीत विद्युतीकरण, पिण्याच्या पाण्याची सोय अशा प्राथमिक सोयी सुविधांचा अभाव आढळून येतो. स्मशानभूमीकडे जाण्यासाठी ४० गावात रस्ता असून तर १७ गावामध्ये रस्ताच नसल्याने पावसाळ्यात मोठ्या अडचणीचा सामना करावा लागत आहे. फक्त २ गावात संरक्षण भिंत असून ५५ गावामध्ये स्मशानभूमीला संरक्षण भिंत नाही. आणि शासकीय मंजुरीचा अभाव हे मोठे अडथळे ठरत आहेत. काही गावांतील नागरिकांनी अनेकवेळा तहसीलदार, पंचायत समिती व जिल्हा परिषदेकडे लेखी मागणी केली असली तरी आजपर्यंत ठोस निर्णय झालेला नाही. परिणामी, ग्रामीण भागात मृतदेह वाहून नेण्यासाठी आणि अंत्यसंस्कारासाठी जागा मिळवणे ही लोकांची मोठी समस्या बनली आहे. देवणी तालुक्यातील काही गावांत स्मशानभूमी असूनही तिथे मूलभूत सुविधा नाहीत, जिल्हा प्रशासनाने तातडीने लक्ष देणे आवश्यक आहे. स्मशानभूमीचा प्रश्न केवळ मृतांच्या नाही, तर जिवंत समाजाच्या संवेदनशीलतेचा आहे. त्यामुळे शासनाने या गावांसाठी स्वतंत्र निधी उपलब्ध करून देऊन, जमिनीचे वाद निकाली काढून आणि आवश्यक सुविधा उभारून ही समस्या कायमस्वरूपी सोडवावी, अशी मागणी मानवी हक्क अभियान संघटनेच्या वतीने केली जात आहे.

## एनटीपीसी येथे ५१वा वर्धापनदिन साजरा




**सोलापूर : प्रतिनिधी**

दक्षिण सोलापूर तालुक्यातील एनटीपीसी फटाटेवाडी येथे ५१वा वर्धापन दिन उत्साहात साजरा करण्यात आला. या निमित्ताने सोलापूर ग्रामीण पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली एनटीपीसी परिसरात वृक्षारोपण कार्यक्रम आयोजित करण्यात आला. सदर कार्यक्रमांतर्गत परिसरात २०० फळझाडे तसेच २०० दुर्मिळ औषधी वनस्पतींची लागवड करण्यात आली. या कार्यक्रमास एनटीपीसीचे मुख्य कार्यकारी निवेदक शास्त्री, एच.आर. मॅनेजर रेड्डी, इतर अधिकारी व कर्मचारीवर्ग, तसेच वळसंग पोलीस ठाणे येथील सहाय्यक पोलीस निरीक्षक राहुल डोंगरे, पोलीस उपनिरीक्षक कांबळे, होटगी दूरशेत्राचे पोलीस अधिकारी आणि पोलीस ठाण्याचे कर्मचारी वर्ग उपस्थित होते. सदर वृक्षारोपण कार्यक्रम अत्यंत उत्साहात व यशस्वीपणे पार पडला. या उपक्रमामुळे परिसरात हरिताई वाढविण्यास हातभार लागणार असून पर्यावरण संवर्धनाचा संदेशही दिला गेला. ‘वृक्ष लावा पर्यावरण वाचावा’ या संदेशाने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

## लातूर महापालिका उपायुक्तपदी वसुधा फड यांनी पदभार स्विकारला



**लातूर : वार्ताहर**

लातूर शहर महानगरपालिकेच्या उपायुक्त म्हणून वसुधा फड रुजू झाल्या. विशेष म्हणजे यापूर्वीही सहाय्यक आयुक्त म्हणून त्यांनी लातूर येथे काम केलेले आहे. आता पदोन्नतीने त्या लातूर येथे आल्या आहेत. एक कर्तव्यदक्ष अधिकारी म्हणून ओळख असलेल्या वसुधा फड यांची २०१० मध्ये एमपीएससी मार्फत मुख्याधिकारी संवर्गातून निवड झालेली आहे. त्यांनी यापूर्वी नांदेड पालिकेत सहाय्यक आयुक्त, लातूर पालिकेत सहाय्यक आयुक्त, औसा नगरपालिकेत मुख्याधिकारी, गंगाखेड नगरपालिकेत मुख्याधिकारी आणि धाराशिव येथे मुख्याधिकारी म्हणून काम केलेले आहे. आता पदोन्नतीने त्या उपायुक्त म्हणून लातूर येथे रुजू झाल्या आहेत. गुरुवारी (दि. ६) त्यांनी पदभार स्वीकारला. यावेळी अतिरिक्त आयुक्त देविदास जाधव, उपायुक्त डॉ. पंजाबराव खानसोळे, मुख्य स्वच्छता अधिकारी कलीम शेख, सहाय्यक आयुक्त खदीर शेख, पर्यावरण अधिकारी, सन्मती मेस्त्री, स्वच्छता विभाग प्रमुख, रमाकांत पिडगे, मालमत्ता व्यवस्थापक, शुभम बावने, शिक्षणाधिकारी श्वेता नागणे यांच्यासह सर्व विभाग प्रमुखांनी त्यांचे स्वागत केले. यावेळी सत्काराला उत्तर देताना वसुधा फड यांनी पालिका आयुक्त श्रीमती मानसी मॅडम यांच्या मार्गदर्शनात उपायुक्त पदाच्या माध्यमातून लातूर शहरातील जनतेचे प्रश्न्न सोडविण्यासाठी कार्यरत राहण्याची ग्वाही दिली. लातूर शहराची माहिती असणाऱ्या अधिकारी उपायुक्त म्हणून रुजू झाल्याच्या भावना अधिकारी व विभाग प्रमुखांनी यावेळी व्यक्त केल्या.

## देवणी पंचायत समिती कार्यालयातील कर्मचारी साडे चार वाजताच गायब!




**देवणी : वार्ताहर**

देवणी पंचायत समितीला तरुण तडफदार, कर्तव्यदक्ष, शिस्तप्रिय लाभलेले गट विकास अधिकारी म्हणून सागर वरंडेकर यांची ओळख आहे. गटविकास अधिकारी हे देवणी पंचायत समिती कार्यालया व्यतिरिक्त पंचायत समिती कार्यालायाअंतर्गत चालू असलेल्या विविध विकास कामांना भेटी देणे व शासकीय मीटिंगला हजर राहणे हे त्यांचे कामकाज ते कर्तव्यपने पार पाडत असतात. हीच संधी साधून पंचायत समिती मधील दोन चार कर्मचारी जर सोडले बाकी सर्व कर्मचारी शुक्रवार रोजी साडे चार वाजताच ऑफिस मधून गायब झाले. शुक्रवार दिनांक ७ नोहेंबरचा सीसीटीव्ही तपासले तर सत्य बाहेर येईल, तसेच सकाळी पण आकरा वाजता ऑफिसला येणे, शासनाकडून प्रत्येक कर्मचाऱ्याला मुख्यालयी राहवे म्हणून घरभाडे मिळते, परंतु दोन चार कर्मचारी जर सोडले तर कोणताच कर्मचारी मुख्यालयी राहत नाही. देवणी तालुक्यात एकूण ५७ गावे व ४५ ग्राम पंचायती अस्तित्वात आहेत. वरील गावातील लोकांना विविध कामासाठी पंचायत समितीला यावे लागते तासान तास कमचाऱ्यांची वाट पाहत बसावे लागते, जो मुख्यालयी राहत नाही त्या कर्मचाऱ्याचे घरभाडे वेतनातून कपात करून शासनास जमा करावे, नियमानुसार कार्यालयीन वेळ सकाळी ९.४५ ते सायंकाळी ६.१५ असून कार्यालयीन वेळेत कर्मचारी उपस्थित राहत नसेल तर त्यादिवशी ची अपसेंटी टाकून कर्तव्यदक्ष गट विकास अधिकारी सागर वरंडेकर साहेबांनी कर्मचाऱ्यांची शिस्त लावावी अशी मागणी जनतेतून केली जात आहे.

## भिवंडी महानगरपालिकेत ‘वंदे मातरम्’चे सामूहिक गायन



**भिवंडी : वार्ताहर**

वंदे मातरम गीताच्या १५०व्या वर्धापन दिनानिमित्त भिवंडी महानगरपालिका मुखायलयात वंदे मातरम् चे सामूहिक गायन गुरुवारी संपन्न झाले. महाराष्ट्र शासन पर्यटन व सांस्कृतिक विभागाच्या आदेशाने भिवंडी महानगरपालिकेचे प्रशासक तथा आयुक्त अनमोल सागर यांचे निर्देशानुसार वंदे मातरम् गीताच्या १५०व्या वर्धापन दिनानिमित्त महापालिका मुख्यालयात तळ मजल्यावर उपायुक्त विक्रम दराडे यांच्या अध्यतेखाली अधिकारी कर्मचाऱ्यांसह सामुहिक गायन आयोजित करण्यात आले होते. यानिमित्त सर्व प्रभाग समिती कार्यालय, शाळांमध्ये देखील सामुहिक गायन कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते. या प्रसंगी उपायुक्त (कर) बाळकृष्ण क्षिरसागर, शहर अभियंता जमील पटेल, मुख्य वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ.संदीप गाडेकर, निवडणूक विभागाचे सहाय्यक आयुक्त अजित महाडि, अतिरिक्त शहर अभियंता सचिन नाईक यांसह महापालिकेचे मुख्यालयातील सर्व अधिकारी व कर्मचारी उपस्थीत होते.

## काँग्रेसचे नेते नाथसिंह देशमुख यांचा भाजपात प्रवेश



**लातूर : वार्ताहर**

लातूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे माजी उपाध्यक्ष नाथसिंह देशमुख आणि रवींद्र काळदाते यांच्यासह इतर अनेकांनी राज्याचे सांस्कृतीक कार्यमंत्री ना. आशिषजी शेलार आणि भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांच्या उपस्थितीत सोमवारी भारतीय जनता पार्टी जाहीर प्रवेश केला आहे. या प्रवेशामुळे तोंडावर येऊ घातलेल्या निवडणुकीत काँग्रेसला मोठा धक्का बसला आहे. राज्याचे सांस्कृतिक कार्यमंत्री ना. आशिष शेलार यांनी सोमवारी सायंकाळी एमआयटी परिसरातील प्रयाग या भाजप नेते आ. रमेशआप्पा कराड यांच्या निवासस्थानी सदिच्छा भेट दिली. याप्रसंगी लातूर ग्रामीण मतदार संघाच्या वतीने मंत्री महोदयांचा यथोचित सत्कार करून आ. कराड यांनी स्वागत केले. यावेळी लातूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे माजी उपाध्यक्ष नाथसिंह देशमुख आणि रवींद्र काळदाते यांच्यासह इतर अनेकांनी भारतीय जनता पार्टीत जाहीर प्रवेश केला. लातूर ग्रामीण मतदार संघातील गावागावातील वाडी वस्तीतील काँग्रेस व इतर पक्षातील अनेक जण सातत्याने आ कराड यांच्या नेतृत्वावर विश्र्वास ठेवून भारतीय जनता पार्टीत प्रवेश करत आहेत. नाथसिंह देशमुख यांच्या या भाजपा पक्ष प्रवेशामुळे स्थानिक स्वराज्य संस्थेच्या येत्या काळात होऊ घातलेल्या निवडणुक निमित्ताने काँग्रेस पक्षाला मोठा धक्का बसला आहे. ना. शेलार आणि आ. कराड आगामी स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणूक निमित्ताने तसेच लातूर ग्रामीण मतदार संघातील विविध तीर्थक्षेत्र व इतर विकास कामाच्या अनुषंगाने सविस्तर चर्चा झाली. यावेळी संत गोपाळ बुवा महाराज साखर कारखान्याचे चेअरमन राजेश कराड, भाजपाचे अजित पाटील कव्हेकर, विक्रमकाका शिंदे, सुरज शिंदे, महेंद्र गोडभरले, उद्धव काळे, प्रताप पाटील, शरद दरेकर, अनिल भिसे, पद्माकर चिंचोलकर, गणेश मद्दे, नागेश पाटील, सौदागर पवार, उमेश काळदाते, पंडित सूर्यवंशी, अभंग चव्हाण, सिद्राम शिंदे, काशिनाथ कांबळे, दशरथ सरवदे, बन्सी भिसे, साहेबराव मुळे, श्याम वाघमारे, अमर चव्हाण, गोपाळ पाटील, विजय चव्हाण, बालाजी शिंदे, लक्ष्मण यादव, चंद्रकांत वांगस्कर, संजय डोंगरे, राम भताने, भैरवनाथ पिसाळ, बाबा भिसे, महेश गाडे, रवींद्र नागरगोजे, पांडुरंग बालवाड, मारुती शिंदे, हनुमंत गव्हाणे, माधव घुले, आदिनाथ मुळे, संजय ठाकूर, सोमनाथ वाघमारे, महादेव गुरुशेट्टे, किशोर गुट्टे, ज्ञानेश्र्वर जुगल, परमसिंह देशमुख, बाबुराव कस्तुरे, निवृत्ती लहाने, किरण मुंडे, अच्युत कातळे, दत्ता सरवदे, शेख अजीम, बालाजी गवळी, श्रीमंत नागरगोजे, भुजंग काळदाते, वैजनाथ लहाने, लक्ष्मण खलंग्रे, शिवरुद्र चवंडे, नरसिंग येलगटे, संतोष राठोड, दीपक बनसोडे, पद्माकर होळकर यांच्यासह लातूर ग्रामीण विधानसभा मतदारसंघातील भाजपाचे पदाधिकारी लोकप्रतिनिधी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## श्रीक्षेत्र निर्मळ यात्रेतील जुगारावर कारवाईची मागणी

**वसई : वार्ताहर**

श्रीक्षेत्र निर्मळ येथे सुरु होणाऱ्या आद्य जगतगुरु शंकराचार्य यात्रेत चालणाऱ्या जुगारावर बंदी घालून कारवाई करावी अशी मागणी काँग्रेस नेते समीर वर्तक यांनी पोलीस प्रशासनाला दिलेल्या निवेदनाद्वारे केली आहे. श्री क्षेत्र निर्मळ येथे पुढील शनिवारी दि. १५ डिसेंबर रोजीपासून आद्य जगतगुरु श्री शंकराचार्य मंदिराच्या सुरु होणाऱ्या प्रसिद्ध यात्रेच्या निमित्ताने यात्रेच्या वेळी कायदा व सुरक्षा व्यवस्थित राहावी, कोणताही अनुचित प्रकार घडू नये म्हणून दरवर्षी प्रमाणे विशेष पोलीस बंदोबस्त देण्यात यावा. तसेच या यात्रेच्या वेळी फार मोठ्या प्रमाणात राजरोसपणे रस्त्यावरच चालणाऱ्या जुगाराच्या खेळावर बंदी आणून हा जुगार लावणाऱ्यांवर कायदेशीर कारवाई करून पुन्हा जुगार लावण्यात येणार नाही याची दखल घेण्यात यावी म्हणून महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसच्या पर्यावरण विभागाचे मा. प्रदेशप्रमुख आणि मा. जि.प. सदस्य समीर सुभाष वर्तक यांनी वसई पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक बाळकृष्ण घाडीगावकर यांची भेट घेऊन लेखी पत्राद्वारे मागणी केली. यावर त्वरित संबंधित अधिकाऱ्यांना सूचना देऊन पुन्हा जुगार लागणार नाही अशी वरिष्ठ पोलीस निरीक्षक बाळकृष्ण घाडीगावकर यांनी खात्री दिली असल्याचे वर्तक यांनी सांगितले. यासंदर्भात परिमंडळ-२ च्या पोलीस उपायुक्त आणि सहा. पोलीस आयुक्त यांनाही पत्र देण्यात आले आहे.

## पालघर जिल्हा परिषदेत ‘वंदे मातरम’चे सामूहिक गायन




**पालघर : वार्ताहर**

‘वंदे मातरम’ गीताच्या १५० व्या वर्षानिमित्त आज जिल्हा परिषद पालघरच्या जननायक बिरसा मुंडा सभागृह क्रमांक २१२ मध्ये अधिकारी व कर्मचारी यांच्या उपस्थितीत राष्ट्रीय गीत ‘वंदे मातरम’चे सामूहिक गायन करण्यात आले.राज्य शासनाच्या पर्यटन व जननायक बिरसा मुंडा सभागृहात अधिकारी व कर्मचाऱ्यांचा उत्साहपूर्ण सहभाग सांस्कृतिक कार्य विभागाच्या सूचनेनुसार वंदे मातरम गीताचा गौरव साजरा करण्यासाठी हा उपक्रम राबविण्यात आला. या प्रसंगी उपस्थित अधिकारी व कर्मचाऱ्यांनी देशभक्तीच्या भावना व्यक्त करत उत्साहपूर्ण सहभाग नोंदविला. या उपक्रमाद्वारे जिल्हा परिषदेतील अधिकारी व कर्मचारी यांच्यामार्फत राष्ट्रीय एकात्मतेचा संदेश पोचविण्यात आला.

## थोडक्यात वृत्तांत



आपल्या वंदे मातरम गिताला १५० वर्षे पूर्ण झाल्याबद्दल भारतीय जनता पक्षाच्या सातिवली येथील कार्यालयात वंदे मातरम हे समुहगान म्हणण्यात आले. ह्या प्रसंगी भाजपचे माजी जिल्हा सरचिटणिस सुनिल किणी, ओबीसी मोर्चा सरचिटणिस विश्वंभर चोपडेकर, उपाध्यक्ष उदय महांकाळ, नायकु देसाई, विजय सरदार, पंकज दास, प्रविण कांबळे, भरत कापडणे, शिवा बाबुलकर आदी पदाधिकारी व कार्यकर्ते सहभागी झाले होते.

### दिव्यांग क्षेत्रात कार्य करण्यासाठी नोंदणी अनिवार्य

लातूर : दिव्यांग कल्याण विभागाचे सचिव तुकाराम मुंढे यांचे अध्यक्षतेखाली दूरदृश्य प्रणालीद्वारे राज्यातील सर्व जिल्हाधिकारी यांची बैठक घेण्यात आली. दिव्यांग क्षेत्रात अनेक संस्था विना नोंदणी कार्य करीत असले बाबत निर्देशनास आढळून आले आहे. त्यामुळे ज्या संस्था दिव्यांग क्षेत्रात कार्य करीत आहेत, त्यांना कायदयानुसार नोंदणी करणे बंधनकारक असल्याच्या सूचना या बैठकीत देण्यात आल्या आहेत. त्यामुळे दिव्यांग क्षेत्रात कार्य करु इच्छिणाऱ्या सर्व संस्थानी ३० नोव्हेंबर २०२५ पर्यंत नोंदणी करून घ्यावी, अन्यथा त्या संस्थावर कार्यवाही करण्यात येणार आहे. दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम २०१६ नुसार दिव्यांग कल्याण आयुक्त यांना सक्षम प्राधिकारी घोषित करण्यात आले असून त्यांच्यामार्फत नोंदणी प्रमाणपत्र प्रदान करण्यात येते. दिव्यांग क्षेत्रात कार्य करण्यासाठी दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम २०१६ मधील कलम ५१ व ५२ नुसार नोदणी करणे अनिवार्य आहे. दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम २०१६ नुसार लातूर जिल्हातील ज्या संस्थेस दिव्यांग क्षेत्रात कार्य करावयाचे आहे, त्या संस्थानी ३० नोव्हेंबर २०२५ पर्यत नोंदणी करुन घेणे बंधनकारक आहे. नोंदणीचा प्रस्ताव जिल्हा दिव्यांग सक्षमीकरण अधिकारी, जिल्हा परीषद, लातूर यांच्याकडे सादर करावा. दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम २०१६ मधील कलम ९१ नुसार विना नोंदणी कार्य करणाऱ्या संस्थेवर कार्यवाही करण्यात येणार आहे.

### संघ गंगा के तीन भगीरथ नाटकाचा प्रयोग

लातूर : महाराष्ट्र राज्याच्या सांस्कृतिक संचालनालय आणि हिंदी साहित्य अकादमी द्वारे संघ गंगा के तीन भगीरथ या नाटकाचा एक प्रयोग लातूर येथील दयानंद सभागृह, दयानंद कॉलेज येथे पार पडला.हे नाटक राधिका क्रिएशन्स नागपूर, पुणे या संस्थेची निर्मिती होते. सदर नाटकात २८ कलाकारांच्या ४६ भूमिका राहिल्या. सदर नाटकाला ॲड.आशिष शेलार साहेब मान.मंत्री सांस्कृतिक कार्य, आमदार संभाजीराव पाटील निलंगेकर, आमदार अभिमन्यू पवार व हिंदी साहित्य अकादमीचे महाराष्ट्र राज्याचे सचिव सचिन निंबाळकर प्रामुख्याने उपस्थित होते. परमपूजनीय डॉक्टर हेडगेवार, गुरुजी व बाळासाहेब देवरस या संघाच्या प्रथम सरसंघचालकांच्या राष्ट्र कार्याप्रती असलेल्या ज्वलंत भावनांचा जागर व त्यांचा जीवनपट समाजासमोर आणणारे हे नाटक पार पडले आहे . हे नाटक सर्व राष्ट्रप्रेमींनी जाऊन पहावे असे आवाहन राधिका क्रिएशन्स नागपूर यांनी केले. कार्यक्रम घडवून आणण्यासाठी विशेष सहकार्य भारतीय कल्चरल सोसायटी व लातुरातील प्रयोगाच्या यशस्वितेसाठी (रिलायन्स एज्युकेशनल इन्स्टिट्यूट) प्रेरणा होनराव यांनी कार्यक्रम यशस्वीरित्या पार पाडला.

### प्रणव सनदी लेखापालची अंतिम परीक्षेत उत्तीर्ण

लातूर : लातूर येथील लालबहादुर शास्त्री कॉलनी, आर्वी येथील रहिवासी सुरेखा सुनील बेदमुथा यांचे कनिष्ठ सुपुत्र प्रणव बेदमुथा याने सप्टेंबर २०२५ मध्ये घेण्यात आलेल्या सनदी लेखापाल च्या अंतिम परीक्षेत उल्लेखनीय सुयश मिळवले आहे. बेदमुथा परिवार मूळचे निलंगा तालुक्यातील हाडोळी येथील रहिवासी असून प्रणव हा हाडोळीचा पहिला सनदी लेखापाल ठरला आहे. कठोर मेहनत आणि जिद्दीच्या बळावर त्याने ही अवघड परीक्षा यशस्वीरीत्या उत्तीर्ण केली. त्याने आपल्या या यशाचे श्रेय आई-वडील, अनिल काका, सपना काकी, आजी शारदाबाई तसेच मार्गदर्शक गुरु संतोष संचेती यांना दिले आहे. त्याच्या या उज्ज्वल कामगिरीबद्दल महावीर मल्टिस्टेट सोसायटीचे उपाध्यक्ष विनोद छाजेड, संतोष कोटेचा, लालबहादुर शास्त्री गृहनिर्माण सोसायटीचे चेअरमन राजेश डुंगरवाल, जैन संघाचे अध्यक्ष विपीन कोचेटा, डॉ. उदय देशपांडे, घेवरजी कोचेटा, तसेच लातूर जैन समाज व हाडोळी ग्रामस्थांनी त्याचे मनःपूर्वक अभिनंदन केले आहे.

### लातूर केंद्रावरील राज्य नाट्य स्पर्धा

लातूर : हौशी नाट्य कलावंत आणि नाट्य रसिकांची उत्कंठा वाढवणाऱ्या ६४ व्या महाराष्ट्र राज्य हौशी मराठी नाट्य स्पर्धा लातूर केंद्रावर दि.१७ नोव्हेंबरपासून सुरु होत आहे.या स्पर्धेत लातूर जिल्ह्यातील १३ नामवंत नाट्य संघांचा समावेश आहे. ३० नोव्हेंबरपर्यंत रंगणारी ही नाट्य स्पर्धा दर्दीनाट्य रसिकांसाठी सांस्कृतिक मेजवानी असणार आहे, राज्य शासनाच्या सांस्कृतिक कार्य संचालनालयाद्वारे आयोजित या नाट्य स्पर्धेतील दररोज एका नाटकाचा प्रयोग शहरातील मार्केट यार्डातील स्व.दगडोजीराव देशमुख स्मृती सभागृहात दररोज सायंकाळी ७ वाजता असून नाट्य कलावंत आपली विविध विषयांवरील मनोवेधक नाटकं सादर करणार आहेत, सांस्कृतिक कार्यमंत्री ॲड़ आशिष शेलार व सांस्कृतिक कार्य विभागाचे सचिव डॉ.किरण कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली राज्य नाट्य स्पर्धा पार पडणार असल्याची माहिती सांस्कृतिक कार्य संचालक बिभीषण चवरे यांनी दिली.या स्पर्धेचा नाट्य रसिकांनी उपस्थित राहून हौशी नाट्य कलावंतांचा उत्साह वाढवावा, असे आवाहन संयोजकांनी केले आहे, या स्पर्धेत, रे शुन्य म्हणा (अ.भा.म.ना.परिषद शाखा लातूर), अंतरछिद्र-द ब्लॅक होल(दर्पण मराठी पत्रकार संघ लातूर), महानिर्वाण (दयानंद शिक्षण संस्था लातूर), बेईमानी (धर्मवीर राजे प्रतिष्ठन उदगीर), रातमतरा(डॉ.संतुक लाड चॅरिटेबल ट्रस्ट लातूर), घाट (कै.ग्यानोबा शिवराम कोटंबे बहु.सेवाभावी संस्था, हिप्पळनेर), टेडी बिअर (कलारंग लातूर), इथे ओशाळला मृत्यू (माजी विद्यार्थी संघ जयक्रांती अध्यापक महाविद्यालय लातूर), आंबेडकरीझम् (सम्यक बहु.सेवाभावी ज्ञान प्रसारक मंडळ लातूर), विठ्ठला (सविर प्रतिष्ठान लातूर), दास्ताँ(सुधाकरराव कुलकर्णी स्मृति प्रतिष्ठान लातूर), उन्हातलं चांदणं (सूर्योदय बहु.सेवाभावी संस्था लातूर), संकेत मीलनाचा (उन्नती फाऊंडेशन लातूर) या नाटकांचा समावेश आहे.

10 TO 16 NOVEMER 2025 - Page 6 (CRIME SANDHYA):Layout 1 11/8/2025 8:12 PM Page 1



पान १ वरून....

## अनैतिक संबंध अखेर जीवघेणे ठरले...

बोरगाव येथील तुकाराम शंकर वाटेगावकर याच्याशी झाली. त्या दोघांत अनैतिक संबंध निर्माण झाले. गेल्या आठ वर्षापासून ते दोघांचे विवाहबाहय संबंध चालू होते. तिचा पती मल्लेश याने दुसरे लग्न करून तो कर्नाटकता राहयला गेला असल्याने रसिका हिला रान मोकळेच झाले होते. तुकाराम हा रंगिला स्वभावाचा असल्याने तो रसिकाच्या प्रेमात पुरता अडकला होता. तो ही विवाहित असून त्याला ही दोन मुले आहेत. परंतु ३५ शीतील रसिका त्याला आवडत असल्याने तो तिला मागेल ते देत होता. तिची प्रत्येक गरत तो पुर्ण करीत होता. रसिका ही त्याला चमडी देवून त्याच्याकडून दमडी मिळवित होती. त्याच्या दोघांच्या संबंधाची चर्चा ही रसिका राहत असलेल्या परिसरात होऊ लागली होती. रसिका ही नवऱ्याला सोडून राहत असल्याने तिला कोणाची कसलीच भिती नव्हती. हल्ली ती तुकाराम याच्याकडे घर घेण्यासाठी पैसे मागत होती. ती मागत असलेली रक्कम मोठी असल्याने तुकाराम तिला पैसे देण्यास टाळाटाळ करीत होता. तिला तो आज पैसे देतो उदया देतो असे सांगत होता. गेल्या सात वर्षापासून ती त्याचे हेच ऐकत होती. तो काही तिला पैसे देत नसल्याने ती त्याला टाळत होती. या कारणातून दोघांत वाद विवाद आणि भांडणे ही होत होती. तो दारू पिऊन तिच्या घराकडे आला की,दोघातील भांडणे वाढत होती. तो तिला शिवीगाळ करीत मारहाण ही करीत असायचा. त्याच्या त्रासाला ती खरे तर वैतागलेली होती. ती त्याचा नाद सोडून देवू इच्छित होती. परंतु तो तिला काही केल्या सोडायला तयार नव्हता. त्याची भांडणे पोलीस स्टेशनपर्यत गेली होती. मागे एकदा तिने त्याच्या विरोधात पोलीस स्टेशनमध्ये ही तक्रार दाखल केली होती. त्यावेळी पोलीसांनी दोघांना ही समज दिली होती. तरीही तो तिला भेटायला येत होता. खरे तर तिनेच त्याला शरीर सुखाची चटक लावून आपल्या जाळ्यात ओढले होते. परंतु हल्ली ती माझी मुले मोठी झाली आहेत मला हे संबंध नको आहेत म्हणून सांगत होती पण खरे कारण काय आहे हे त्याला माहित होते. तो तिला पैसे देत नसल्याने तिने त्याचा मोबाईल नंबर ही ब्लॉक केला होता. हल्ली ती त्याला भेटण्याचे ही टाळत होती. याचा राग त्याला येत होता.ती आपल्याशी संबंध तोडत आहे हे त्याच्या लक्षात आले होते. आता तो भांडणात तिच्या चारित्र्यावर संशय घेत माझ्या शिवाय तुझे दुसऱ्या बरोबर ही संबंध आहेत असा संशय घेत होता. तु दुसऱ्या बरोबर ही संबंध ठेवणार आणि पैसे माझ्याकडे मागणार असे तो तिला म्हणत होता. या कारणातून त्याची भांडणे होत होती. तो आपल्यावर संशय घेत आहे म्हणून ती त्याला टाळत होती मात्र त्याला ती त्या कामासाठी पाहिजे असल्याने तो तिला सोडू इच्छित नव्हता. तिच्या भरगच्च जवानीला तो भाळला असल्याने काही झाले तरी हिला सोडायचे नाही असा त्याने विचार केला होता. अधुन मधून तो तिच्याकडे शरीर सुखासाठी येत होता. तिला तो पैशाचे अमिष दाखवून तिच्याकडून पाहिजे तसे शरीरसुख ओरबडत होता. त्याचे मागचे तसे पुढे चालू होते. तो काही तिला पैशाची मदत करीत नव्हता. त्यामुळे ती त्याच्याशी भांडण काढत तु मला भेटू नकोस असे सांगत होती. भांडणात तो तिला घाण घाण शिव्या देत तु माझी रखेल आहेस तुझ्यावर माझा हक्क आहे असे सांगत होता. हल्ली तिने त्याच्याकडून कोणत्या ही परिस्थीतीत पैसे काढायचे असे ठरविले असल्याने तु माझ्याकडे पैसे घेऊन ये तरच माझ्याबरोबर झोप असे सांगितले होते. त्याच्यापुढे आता पेच निर्माण झाला होता. तिने आपल्या मागे पैशाचा तगादा लावला असल्याने तो ही तिच्यावर चिडून होता. त्या दोघांचे विवाहबाहय संबंध हे रसिकाच्या मुलांना आणि तिच्या बहिणीला ही माहित होते त्यामुळे तिच्या बहिणीने ही तिला तु तुकाराम वाटेगावे याच्याकडून पैसे काढ नाही तर त्याच्याशी असलेले संबंध तोडून टाक असे सांगितले होते. त्याला ती फक्त त्या कामासाठी पाहिजे असल्याने तो तिला पैशाचे अमिष दाखवित लाडी गोडी लावित होता. ती ही त्याच्या पैशाच्या अमिषाला बळी पडत होती. नेहमीप्रमाणे मंगळवार दि.४ नोव्हेंबर २०२५ रोजी तुकाराम हा तिच्या घरी संध्याकाळच्या सुमारास आपल्या गाडीवरून आला. घरात दोघात पैशावरून वाद सुरू झाला. भांडणात त्याने तिला चल माझ्याबरोबर माझ्या शेडकडे जावू तेथे मी तुला पैसे देतो असे सांगितले. संध्याकाळी ५.३०च्या सुमारास तो त्याच्या गाडीवरून आणि ती तिच्या दुचाकीवरून त्याच्या शेडकडे निघाले. वाटेत एका मंगल कार्यालयाजवळ त्याने त्याची दुचाकी लावली आणि तो तिच्या गाडीवर बसला. रात्री ७ वाजणेच्या दरम्यान दोघे ही तुकाराम याच्या वस्तीवरील शेडकडे आले. तेथे तुकाराम याने आपल्या घशात दारू रिचवली. नशेत तो तिच्याशी गप्पा मारू लागला.दोघे गप्पा मारत असताना त्याने तिला लाडी गोडी लावीत आपल्या अंगाखाली घेतले. तो आज आपल्याला पैशाची मदत नक्की करेल असा विश्वास तिला वाटल्याने तिने ही नेहमीप्रमाणे त्याच्या हवाली आपले शरीर दिले. आता मात्र त्याच्या मनात वेगळेच होते. त्याच्या मनातील विचार तिला ओळखता आले नाही. तिच्याकडून मस्तपैकी शरीर सुख ओरबडल्यावर तो शांत झाला. नंतर तिने त्याच्याकडे पैशाचा विषय काढला. त्यावेळी तो तिला म्हणाला, मी का तुला तुला पैसे देवू तुझे तर माझ्या शिवाय दुसऱ्या एकाबरोबर संबंध आहेत. तु त्याला ही आपल्या अंगावर घेणार आणि पैशाचा तगादा मात्र माझ्याकडे लावणार असे रागात म्हणाला. त्याने तिच्या चारित्र्यावर संशय घेतल्याने तिला ही त्याचा राग आला. भांडणात ती त्याला म्हणाली, तुला फक्त मी त्या कामासाठी पाहिजे तुला पैसे दयाचे होत नाहीत तर कशाला माझ्याकडे येतोस आणि आता मला पैसे देतो म्हणून कशाला इकडे आणलेस तुझ्याबरोबर फुकट झोपायला मी काय तुझी बायको नाही तिने असे म्हटल्यावर त्याला तिचा राग आला. तो तिला मारहाण लागला. भांडणात त्याने तिचा गळा जोरात आवळून धरला. तिला साली रंडी म्हणत माझ्याकडे पैसे मागतेस काय आता वरती जात पैसे माग म्हणत त्याने तिचा जोरात गळा आवळून धरला. ती त्याच्या तावडीतून सुटण्याचा प्रयत्न करीत होती. परंतु त्याने जोरात ताकद लावली असल्याने तिचा श्वास गुदमरून गेला. त्यातच तिचा मृत्यु झाला. तिचा आपल्या हातून खुन झाला आहे हे त्याच्या लक्षात आल्यावर तो तिच्या मृतदेहाची विल्हेवाट लावण्याचा विचार करीत होता. त्याच्या मनात तिचा मृतदेह कृष्णानदीत टाकण्याचा विचार केला. त्याने बाजुलाच पडलेले पोते उचलले आणि त्या पोत्यात त्याने तिचा मृतदेह कोंबून भरला आणि ते पोते दोरीने शिवले. रात्री १.३०वाजणेच्या सुमारास त्याने तिच्याच गाडीवर ते पोते ठेवले. ते पोत घेऊन तो ताकारी येथील कृष्णा नदीच्या घाटावर आला. त्याने बाजुलाच गाडी लावली. गाडीवरून पोते काढून रात्रीच्या अंधारात तिचा मृतदेह कृष्णानदीत टाकला आणि तेथून तो परत फिरला. रात्री उशिरापर्यंत आपली बाहेर गेलेली परत आली नाही म्हणून ओंकार आणि त्याची मावशी तिचा शोध घेत असताना कृष्णानदीच्या पुलावर रसिकाची गाडी लावलेली दिसली. गाडी बघून त्या दोघांच्या पायाखालची वाळुच सरकली.रसिका या तुकाराम वाटेगावेबरोबर संध्याकाळी गेली असल्याचे त्या दोघांना माहित होते. त्यामुळे ओंकार कदम याने ईश्वरपुर पोलीस स्टेशन गाठून रसिका कदम या बेपत्ता झाल्याची आणि त्याची दुचाकी गाडी कृष्णानदीच्या पुलावर सापडली असल्याचे सांगितले. या घटनेची माहिती मिळताच ईश्वरपुर पोलीसांनी घटनास्थळ गाठले.सांगलीतील आयुष हेल्प लाईनच्या मदतीने कृष्णानदीच्या पात्रात रसिका कदम याचा शोध घेण्यास सुरूवात केली. मात्र उशिरापर्यंत त्याचा मृतदेह सापडला नाही बुधवार ही दिवसभर मृतदेहाचा शोध घेण्याचे काम चालू होते.या दरम्यान बुधवार संध्याकाळी तुकाराम वाटेगाव हा स्व:ताहून पोलीसात हजर झाला.त्याने प्रियेसी रसिका कदम हिचा हिचा गळा आवळून मी खून केला आहे तसेच तिचा मृतदेह ताकारी येथील कृष्णा नदीच्या पुलावरून टाकला आहे अशी कबुली देत तो खुन का? आणि कोणत्या कारणासाठी केला याची माहिती पोलीसांना दिली. बुधवार दि.५ नोव्हेंबर रोजी रसिका हिचा मृतदेह ताकारी पुलापासून दीड ते दोन किमीवर साटपेवाडी बंधाऱ्यानजीक रेस्क्यु टिमला सापडला. ईश्वरपुर पोलीसांनी मयताचा पंचनामा करून तो शवविच्छेदनासाठी ईश्वरपुर येथील सरकारी रुग्णालयात पाठवून दिला. वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांनी पोलीसांना तपासाच्या योग्य त्या सुचना दिल्या. संशयीत आरोपी तुकाराम वाटेगावे हा पोलीसांच्या ताब्यात होता. त्याने आपला गुन्हा कबुल करून तो का? केला याची माहिती ही पोलीसांना दिलेली होती. ईश्वरपुर पोलिसांनी या घटनेची फिर्याद ओंकार कदम याच्याकडून घेतली. त्याने दिलेल्या फियादीनुसार रसिका मल्लेश कदम (वय ३५) हिचा खून करून पुरावा नष्ट केल्याप्रकरणी तिचा प्रियकर तुकाराम शंकर वाटेगावकर (वय ३८) याच्या विरोधात भा.दं.वी प्रमाणे वेगवेगळ्या कलमाखाली गुन्हे दाखल केले. ईश्वरपुर पोलीसांनी त्याला ईश्वरपुर येथील कोर्टासमोर उभे केले असता मा.कोर्टाने त्याला पाच दिवसाची पोलीस कोठडी सुनावली.पोलीस कोठडी दरम्यान पोलीसांनी त्याच्याकडून गुन्हयात वापरलेले पोते आणि दुचाकी गाडी जप्त केली. या घटनेचा पुढील तपास ईश्वरपुर पोलीस ठाण्याचे पोलीस करीत आहेत.

## जेवण न देणे चोराला नाही रुचले...

तो महिना दोन महिन्यांनी गावाकडे येवून आपल्या आई वडिलांची विचारपुस करीत होता. कंक याची आर्थिक परिस्थीती तशी सधनच होती. दोघे ही वयोवृध्द असल्याने शेतात कुणी काय मागायला आले की ते त्यांना रिकाम्या हातांनी परत पाठवित नव्हते. कडवी धरणाजवळ गोलविणे वसाहत असल्याने आजुबाजुला ही लांब आणि थोडया अंतरावर अनेक शेतकरी कुटूंब ही राहयला होते. आजुबाजुचे काही शेतकरी ही त्याच्या कडे कधी कधी गप्पा मारण्यासाठी येत होते. त्यामुळे वयोवृध्द कंक दाम्पत्याचा जीव रमत होता. सगळे जण त्यांना आधार देत असल्याने शेती बरोबर शेळ्या पालन करून ते दोघे ही आपला उधर निर्वाह करीत होते. परळे निनाई येथे ही गावात त्याचे घर असल्याने त्या घरात दिवाळी सणाच्या निमित्याने त्याचा मुलगा आणि सुन गावात आले होते. रविवार दि.१९ ऑक्टोंबर २०२५ त्याचा मुलगा गोलिवणे वसाहत येथे सकाळी सकाळी त्याचा मुलगा आपल्या आई वडिलांना भेटायला गेला. तेथे गेल्यावर त्याला आपल्या वडिलांचा मृतदेह कडवी धरणाच्या पाण्यात तरंगताना दिसला तर त्याच्या आईचा मृतदेह शेडपासून जवळच २०० मीटर वर पडलेला होता.सकृत दर्शनी दोघांना ही जंगली हिंस्त्र प्राण्यांनी हल्ला करून ठार मारल्याचे दिसत होते. जंगली प्राण्यांनी हल्ला केलेल्याचा खुणा त्या दोघांच्या मृतदेहावर दिसत होत्या. घटनास्थळी बघ्यांची गर्दी झाली होती.बघणारे हिंस्त्र प्राण्यांनी हल्ला केल्याचे सांगत होते. परंतु हिंस्त्र प्राण्यांनी जर त्याच्यावर हल्ला केला असता तर त्याच्या शेडमधील शेळ्या आणि इतर पाळीव जनावरे यांना कोणतीच इजा पोहचली नव्हती. त्यामुळे बघणारे ही तर्क विर्तक लावत होते. घटनास्थळी वेगवेगळी चर्चा चालू होती. कंक कुटूंबातील सुन मुलगा यांचा आक्रोश चालू होता. कुणी तरी या घटनेची माहिती शाहुवाडी पोलीसांना दिली. पोलीस ही तातडीने कडवी धरणालगत असणाऱ्या गोलविणे वसाहतीतील घटनास्थळी दाखल झाले. सुरूवातीला पोलीसांना ही या वयोवृध्द दांम्पत्यावर जंगली हिंस्त्र प्राण्यांनी हल्ला केला असल्याचे सकृत दर्शनी दिसत होते. पोलीसांनी घटनास्थळी वन अधिकाऱ्यांना बोलावून घेतले.वन अधिकाऱ्यांनी दोन्ही मृतदेहाची पडताळी करून जंगली प्राण्यांनी हल्ला केला असल्याचा दावा फेटाळला. तसेच जंगली हिंस्त्र प्राण्यांनी जर हल्ला केला असता तर दोन्ही मृतदेह शेडमधून ओढत बाहेर आणल्याच्या खुणा दिसायला हव्या होत्या. जर जंगली प्राण्यांनी हल्ला केला असता तर शेडमधील पाळीव प्राण्यांना ही इजा पोहचली असती त्यामुळे वन आधिकाऱ्यांनी दोघांचा मृत्यु ही जंगली हिंस्त्र प्राण्यांच्या हल्ल्याचा दावा फेटाळून लावला. शाहूवाडी पोलीसांनी घटनास्थळाचा पंचनामा करून दोन्ही मृतदेह शवविच्छेदनासाठी शाहूवाडी येथील सरकारी रूग्णालयात पाठवून दिला. शवविच्छेदन आहवाल पोलीसांना चार दिवसांनी मिळाला. त्या आहावालात दोन्ही मयतांच्या डोक्यावर कसल्या तरी जाड हत्याराने वार केल्याचे नमुद केले होते. त्यामुळे शाहूवाडी पोलीसांनी खूनाची शक्यता धरून तपासाला सुरूवात केली.या घटनेचा तपास शाहुवाडी पोलीसा बरोबर स्थानिक गुन्हे अन्वेषणचे पोलीस ही करीत होते. जवळ पास या घटनेला तीन आठवडे झाले तरी तपासाला गती मिळत नव्हती. शाहूवाडी पोलीस परळे निनाई आणि कडवी धरणाच्या परिसरात तळ ठोकून बसले होते. पोलीसांचा तपास चालू होता. त्यातच स्थानिक गुन्हे अन्वेषणच्या पोलीसांना जवळच्या परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तपासले असता विजय मधुकर गुरव नावाचा फिरस्ता माणुस या घटनेच्या आधी त्या परिसरात फिरत असल्याचे दिसून आले. विजय गुरव हा सराईत गुन्हेगार होता.तो शाहूवाडी तालुक्यातील गिरगाव येथे राहयला होता. तो चोरी करीत होता. त्यामुळे तो परळे निनाई गोलविणे परिसरात चोरीसाठी फिरत होता.त्याच्यावर शाहूवाडी पोलीसात अनेक गंभीर गुन्हे ही दाखल असल्याची माहिती स्थानीक गुन्हे अन्वेषणच्या पोलीसांना मिळाली.या दरम्यान विजय गुरव हा सांगली येथील एकाचा मोबाईल चोरला होता. तसेच तो सांगली पोलीसांच्या पोलीस कस्टीतून पळून गेला असल्याची माहिती पोलीसांना मिळाली.एका गंभीर गुन्हयात सांगली पोलीसांनी त्याला जेलमध्ये टाकले होते. तो पोलीसांना हुलकावणी देत त्याच्या ताब्याततून पळाला होता.तो पळून शाहूवाडी तालुक्यातील दुर्गम भागातून फिरत होता. या दरम्यानच त्याने कंक दांम्पत्याचा खून केला. कंक दांम्पत्याचा खून करून तो रत्नागिरीला पळून गेला होता. चोरीला गेलेल्या मोबाईलवरून शाहूवाडी पोलिसांनी याचा शोध घेऊन त्याला रत्नागिरी येथून ताब्यात घेतले. त्याच्याकडे या घटनेची पोलीसांनी चौकशी केली असता त्याने आपला गुन्हा कबुल करीत तो का? आणि कशासाठी केला याची माहिती पोलीसांना दिली. विजय गुरव हा निंनु कंक आणि रखुबाई कंक राहत असलेल्या शेडजवळ दि.१८ ऑक्टोंबर २०२५च्या संध्याकाळी ७ वाजणेच्या सुमारास आला. त्याने कंक याच्याकडे जेवण मागितले. तो दारू प्यायला असल्याने आणि तो चोरी करीत असल्याचे कंक यांना माहित असल्याने त्यांनी त्याला आपल्या शेडजवळून हाकलून लावले. तुला आम्ही काही देणार नाही तु इथून चालता हो... दारू पिऊन इथे कशाला आला आहेस असे निंनु कंक यांनी त्याला बजावले. तो आधीच दारूच्या नशेत असल्याने त्याला कंक याचा राग आला.आजोबा कशाला उगाच ओरडता. असे म्हणत तो तेथून रागाने निघून ही गेला. परंतु पुढे गेल्यावर त्याच्या मनात काय आले कोणास ठाऊक तो माघारी फिरला. तुम्ही मला जेवण देवू नका पण आजची रात्र मी तुमच्या शेडच्या बाहेर झोपतो असे तो त्यांना म्हणाला. तो चोरी करतो हे कंक यांना माहित असल्याने त्यांनी त्याला तु इथे झोपू ही नकोस असे त्याला सांगितले. त्यामुळे तो त्याचेवर चिडला. तो त्यांना शिव्या घालू लागला. तसे निनु कंक यांनी जवळच पडलेली काठी उचलत त्याच्या अंगावर जात तु इथून जातो का नाही असे म्हणत त्याला तेथून हाकलून देण्याचा प्रयत्न केला. त्यावेळी विजय गुरव याला राग आला. त्याने तिच काठी निंनु कंक याच्या हातातून हिसकावून घेतली आणि त्याच काठीने निंनु कंक यांना मारहाण करायला सुरूवात केली. विजय गुरव त्यांना मारहाण करीत असताना ते ओरडत असताना त्याची बायको रखुबाई या बाहेर आल्या. कुणी तरी आपल्या नवऱ्याला मारहाण करीत असल्याचे बघुन त्यांनी त्यांना सोडविण्याचा प्रयत्न करीत असताना विजय याने रखुबाई यांना ही त्याच काठीने मारहाण करायला सुरूवात केली. त्या मारहाणीत कंक दांम्पत्य गंभीर जखमी झाले. ते खाली पडले असता विजय यांने जवळच पडलेला मोठा दगड उचलला आणि दोघांच्या डोकीत घातला. त्यात त्याचा जागीच मृत्यु झाला. त्याचवेळी विजय गुरव याच्या डोक्यात वेगळेच आले. आपण त्याचा खून केला आहे. या दोघा वयोवृध्द दांम्पत्याचा मृत्यु जंगली हिंस्त्र प्राण्याच्या हल्ल्यात झाल्याचे दाखविण्याचा त्याने विचार केला. म्हणून त्याने निंनु कंक याचा मृतदेह ओढत नेत जवळच्या कडवी धरणाच्या पाण्यात टाकला. तर रखुबाई याचा मृतदेह शेडपासून जवळच २०० मीटर अंतरावर नेवून टाकला. त्यानंतर तो रात्रीच्या अंधारात तेथून पळून गेला. या घटनेची फिर्याद मयत निंनु कंक याच्या मुलाने शाहुवाडी पोलीसात दिली. त्याच्या फिर्यादीवरून पोलीसांनी निंनु यशवंत कंक (७५) त्याची पत्नी रखुबाई निंनु कंक (७०) याच्या हत्येप्रकरणी विजय मधुकर गुरव (४०) याच्या विरोधात भा.दं.वी. कलम १०१(१) प्रमाणे गुन्हा दाखल केला. शाहुवाडी पोलीसांनी त्याला दि.१ नोव्हेंबर रोजी शाहूवाडी येथील कोर्टात हजर केले. मा.कोर्टाने त्याला तीन दिवसाची पोलीस कोठडी सुनावली. पोलीस कोठडी दरम्यान पोलीसांनी त्याच्याकडून गुन्हयात वापरलेली काठी आणि दगड जप्त केली. तपास स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलीसाबरोबर शाहूवाडी पोलीसांनी करीत या गुन्हयाचा छडा लावला.

पान ८ वरून....

## पालघर जिल्ह्यातील नगरपरिषद आणि...

विभाग व जिल्हा प्रशासन उपायोजना राबवणार असल्याची माहिती जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी डॉ. इंदू राणी जाखड यांनी पत्रकारांना दिली. शहरी भागात होणाऱ्या निवडणुकीच्या ठिकाणा लगतच्या गावांमधील मतदारांना पुन्हा नव्याने जिल्हा परिषद निवडणुकीत मतदान करता येऊ नये यासाठी देखील जिल्हा प्रशासन प्रयत्नशील राहणार असल्याची माहिती त्यांनी दिली. दरम्यान या नगरपरिषद नगरपंचायत क्षेत्रांसाठी मतदान केंद्रनिहाय यादी उद्या ७ नोव्हेंबर रोजी प्रसिद्ध करण्यात येणार असल्याची माहिती पत्रकार परिषदेत देण्यात आली. राज्य निवडणूक विभागाच्या परवानगीनेच पुरवणी यादी होणार प्रसिद्ध पालघर व इतर काही शहरांमधील मतदार यादी संदर्भात काही राजकीय पक्षांनी आक्षेप नोंदवला होता. मात्र प्रारूप मतदार यादीतील आक्षेपा विषयी नेमून दिलेल्या अधिकारी यांच्या समवेत झालेल्या सुनावणी दरम्यानचा निकाल अंतिम असून हा निकाल व प्रत्यक्षात प्रसिद्ध झालेल्या अंतिम यादीत काही ठिकाणी टायपिंग व डेटाएन्ट्री चुका तसेच डेटा संकलित करताना तांत्रिक मुद्द्यांमुळे काही दोष राहिल्याच्या घटना पुढे आल्या आहेत. या संदर्भात प्रत्येक बाबींची पुनर पडताळणी करून काही ठिकाणी बदल करावयाच्या असल्यास त्यासंदर्भात राज्य निवडणूक आयोगाकडून विशेष परवानगी घेऊन पुरवणी यादीद्वारे हे बदल अमलात येतील असे जिल्हाधिकारी यांनी स्पष्ट केले. मतदार यादीत मधील माहिती व संख्या प्रमाणित असून त्यामध्ये विशेष बदल होणार नाही असे त्यांनी पत्रकारांपुढे सांगितले. जिल्ह्यातील चार शहरांमध्ये निवडणुकीची घोषणा ४ नोव्हेंबर रोजी झाल्यानंतर आचारसंहिता सुरू झाली असून प्रत्येक निवडणुकीसाठी नेमून दिलेल्या निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या अधिपत्याखाली भरारी पथक नेमून देण्यात आली आहेत त्यांच्यामार्फत कार्य सुरू झाले असून काही मतदान केंद्रांवर वेब कास्टिंग अर्थात सीसीटीव्ही द्वारे देखरेख ठेवण्यासंदर्भात राज्य निवडणूक आयोगाकडून प्राप्त सूचनांची अंमलबजावणी करण्यात येईल असेही सांगण्यात आले. सर्व सामान्य नागरिकांना पंचायत निहाय तक्रार निवारण कक्ष स्थापन करण्यात आले असून तक्रार निवारण कक्षांचे संपर्क क्रमांक जिल्हा प्रशासनाने प्रसिद्ध केले आहेत. पालघर नगरपरिषद : १८०० २३३ ००९८, डहाणू नगरपरिषद : १८०० २३३ १८१९, जव्हार नगरपरिषद : १८०० २३३ १२०१, वाडा नगरपंचायत : १८०० २३३ ११८०. तसेच चार शहरांमध्ये होणाऱ्या या निवडणुकीत ५५ प्रभागात निवडणूक होणार असून त्याकरिता १२५ मतदान केंद्र उभारण्यात येणार आहेत. ईव्हीएम होणाऱ्या मतदान प्रक्रियेत जिल्ह्याकडे पुरेशा प्रमाणात कंट्रोल युनिट बॅलेट युनिट व मेमरी कार्ड पुरेशा प्रमाणात असल्याची माहिती देण्यात आली.

## राष्ट्रवादाची ऊर्जा निर्माण करणे ...

पुढच्या पिढीपर्यंत पोहोचणे आवश्यक आहे. उद्देशही हाच आहे की आजच्या तरुणांना स्वातंत्र्य लढ्याचा आणि आपल्या पूर्वजांच्या बलिदानाचा इतिहास समजला पाहिजे बंकीमचंद्र चटोपाध्याय यांनी लिहिलेल्या 'आनंदमठ' कादंबरीतील या गीताचा ऐतिहासिक संदर्भही जिल्हाधिकारी डॉ. इंदु राणी जाखड यांनी उपस्थितांना सांगितला. त्यांनी नमूद केले की, वंदे मातरम् हे १८९६ मध्ये रवींद्रनाथ टागोर यांनी कॉंग्रेस अधिवेशनात गायले, तर १९०५ मध्ये बंगाल फाळणीविरोधी आंदोलनाचे ते प्रमुख प्रतीक बनले. मॅडम भिकाजी कामा यांनी परदेशात प्रथम तिरंगा फडकवताना 'वंदे मातरम' हेच शब्द ध्वजावर लिहिले होते. डॉ. राजेंद्र प्रसाद यांनी १९५० मध्ये संविधान सभेत निवेदन दिले आणि तत्कालीन राष्ट्रपती यांनी या गीताला राष्ट्रगीत जन गण मन प्रमाणेच दर्जा असेल आणि या गीताचा तितकाच मान व सन्मान केला जाईल असे सांगितले असल्याचे जिल्हाधिकारी डॉ. इंदु राणी जाखड यांनी सांगितले.

## निवडणुकीत बहुजन विकास आघाडीचा...

नागरिकांच्या समस्या सोडवल्या कोट्यवधींची कामे शहरात केली आहेत. मात्र आता अनेक समस्यांनी नागरिकांना घेरले आहे विकास कामांचे आश्वासन दिले जात आहे मात्र पूर्ण होत नाही आगोदर अनेक खासदार , मंत्री झाले त्यांनी या भागासाठी नेमके कोणते काम केले याचा लेखाजोगा माझ्याकडे आहे जनतेनी याचा देखील विचार करावा. माझा कार्यकर्ता हा कामाचे मुद्दे मांडण्यात सक्षम आहे. आम्ही कधी विकासकामांची जाहिरात सोशल मीडियावर केली नाही. पक्ष नाही पाहिला तर महिला सक्षमीकरणासाठी कामे केली. आपल्या येथील महिला बाल कल्याण समितीच्या योजना भारतातील एकमेव चांगले उदाहरण आहे. विद्यार्थ्यांच्या फी पासून ते विधवा महिलासाठी, मुलींसाठी योजना आणल्या या योजनेचे लोकांनी फायदे घेतले. यावेळी गुरुनानक जयंतीच्या शुभेच्छा देण्यात आल्या. तसेच भारतीय महिला क्रिकेटमध्ये महिलांनी नाव उंचावले त्यांचे अभिनंदन केले. तर माजी महापौर नारायणक मानकर यांनी गेल्या ३५ वर्षात केलेल्या विविध विकास कामांचा आढावा घेतला मुबलक पाणी, सूर्या, उसगाव, पेल्हार ३८० एमएलडी पाणी येत आहे. तसेच नव्या योजना देखील आणल्या आहेत. सुसरी, खोलसापाडा, यासह अनेक योजनांतून भविष्यासाठी तजबीज केली आहे. विद्युत पुरवठा पाठपुरावा केला. त्यामुळे भारनियमन बंद झाले वाढती मागणी लक्षात घेता चिखलडोंगरी, कामण, सोपारा, विरारमध्ये पॉवर स्टेशन होत आहे. एमएमआरडीए माध्यमातून १०८ कोटींचा नायगाव पूल झाला. अंबाडी उड्डाणपूल झाला. ७ रस्ते मंजूर केले. ज्यामध्ये वालीव – सातिवली, नायगाव पूर्व पश्चिम, विरार – अर्नाळा, नालासोपारा ते निर्मळ, भोईडपाडा ते टीवरी यासह अन्य रस्ते झाले कोणत्याही व्यापाऱ्याचे नुकसान करता रस्ते केले. रिंग रूट मंजूर झाले. मेट्रोची मागणी केली होती ती देखील मंजूर झाली. नायगाव ते विरार अशी मागणी केली होती. आरोग्य सेवेला बळकटी दिली. यासह अन्य माहिती उपस्थितांना दिली, तर आम्हाला विचारले जाते कि ३५ वर्षात काय केले. यामध्ये अनेक मोठं मोठ्या योजना, विकास प्रकल्पांचा समावेश होता ३५ वर्षात काय केले हे दुसऱ्या पक्षात गेल्यावर समजले का? अशीही कोपर खळी नारायण मानकर यांनी लावली. बहुजन विकास आघाडी कार्यकर्ता मेळाव्यात तरुणांचा उत्साह दिसून आला माजी आमदार हितेंद्र ठाकूर यांनी यावेळी उपस्थित कार्यकर्त्यांशी हितगुज साधले व अनेक जणांनी आपले विचार मांडले व सूचनांना ठाकूर यांनी समाधानकारक उत्तर दिले.

## वसई, विरार शहरातील सरसकट सर्वांची ...

शास्ती माफ करण्यात यावी अशी आग्रही मागणी बहुजन विकास आघाडीचे अध्यक्ष तथा माजी आमदार हितेंद्र ठाकूर यांनी यांनी उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्याकडे केली आहे. २५ लाख लोकसंख्या असलेल्या वसई विरार शहराला प्राथमीक सोयीसुविधा व विकास कामे करताना महापालिकेची दमछाक होत आहे. अशा परिस्थितीत ५० कोटीच्या विशेष निधी महापालिकेस मिळावा अशी मागणी अर्थमंत्री अजितदादा पवार यांच्या कडे केली. वसई तालुका कला क्रिडा महोत्सवाचे यंदा ३६वे वर्ष आहे. गतवर्षी ६५ हजार स्पर्धकांनी सहभाग घेतला होता. कलेच्या ३४ प्रकारच्या तर व क्रिडेच्या ५४ प्रकारांचा स्पर्धा घेण्यात आला. यावर्षीही विक्रमी स्पर्धक भाग घेणार आहेत असा अंदाज आहे. कला किडा महोत्सवांत राज्यस्तरीय व राष्ट्रीय स्तरावरच्या काही स्पर्धा घेतल्या जातात. या माध्यमातून अनेक किडापटू व सिने नाट्य कलावंत हे राज्य, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर आपला ठसा उमटवला आहेत. 'गिनिज बुक'मध्ये नोंद झाली आहे. अशा कला क्रिडा महोत्सवाला २ कोटी अनुदान देण्यांत यावे अशी आग्रही मागणी देखील माजी आमदार हितेंद्र ठाकूर यांनी उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्याकडे चर्चेदरम्यान केली. वरील तिन्ही विषयावर समाधानकारक चर्चा होऊन संबंधील सचिवांशी बोलून एकत्रित सभा घेऊन योग्य तो तोडगा काढण्याचे आश्वासन उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांनी शिष्टमंडळाला दिले. यावेळी शिष्टमंडळात बहुजन विकास आघाडीचे अध्यक्ष तथा माजी आमदार हितेंद्र ठाकूर, महापालिकेचे माजी महापौर नारायण मानकर, अशोक कुलास, अशोक ग्रोवर, वसई तालुका कला क्रीडा महोत्सवाचे प्रकाश वनमाळी उपस्थित होते.

## पालघर जिल्हा रुग्णालयाचे काम ...

असुन, बांधकामाच्या निविदा काढून काम जलद गतीने पूर्ण करण्याच्या सूचना दिल्या. डहाणू महिला रुग्णालयाच्या बाबतीत ही निविदा प्रक्रिया सुरू करण्याबाबत आरोग्यमंत्र्यांनी यावेळी आदेश दिले. पालघर जव्हार व डहाणूसह जिल्ह्यातील सर्व आरोग्य संस्थांनी आदिवासी प्रवण क्षेत्रात उत्तम आरोग्य सेवा दिल्या पाहिजेत. यावेळी आरोग्यमंत्र्यांनी कुपोषणाच्या स्थितीचा आढावा घेऊन आवश्यक त्या उपाययोजना करण्याच्या सूचना दिल्या. यावेळी आ. गावित यांनी आरोग्यमंत्र्यांचे आभार मानले. या निर्णयांमुळे जिल्ह्यातील आरोग्य सेवा अधिक सक्षम, गतिमान आणि जनसामान्यांना सुलभ होईल, असा विश्वास आ. राजेंद्र गावित यांनी व्यक्त केला. बैठकीला आरोग्य विभागाच्या आयुक्त कादंबरी बलकवडे, ठाणे परिमंडळाचे उपसंचालक डॉ. नांदापूरकर यांचे आरोग्य विभागाचे प्रमुख अधिकारी उपस्थित होते.

## कै. शांताराम बापूजी जाधव ...

पष्टे म्हणाले, अण्णासाहेब वर्तक सभागृह ट्रस्टच्या माध्यमातून शांताराम बापूजी जाधव यांचा कॉंग्रेस पक्षाच्या जडणघडणीत आणि कॉंग्रेस पक्ष आणि पक्षाचे विचार ग्रामीण जनतेपर्यंत पोहोचवण्यात सिंहाचा वाटा होता. ग्रामीण भागातील गोरगरीब गरजू मुलांचे शिक्षणाबाबत ते अतिशय संवेदनशील होते. त्यांचे जीवन प्रेरणादायी असून एक कार्यकर्ता म्हणून काम करताना भावी काळात ऊर्जा देणारे राहील असे ते म्हणाले. पालघर जिल्हाध्यक्ष प्रफुल्ल पाटील यांनीही त्यांच्या स्मृतींना उजाळा देऊन श्रद्धांजली वाहिली. यावेळी ट्रस्टच्या वतीने मोहन घरत, नैप डायस, डॉमनिक डिमेलो, विल्फ्रेड डिसोझा, बिना फुर्टाडो, राम पाटील, प्रविणा चौधरी, कुलदीप वर्तक इ. उपस्थित होते. प्रदेश कॉंग्रेसचे सरचिटणीस डॉ. दिनेश कांबळे यांनी त्यांच्या सोबतचे अनुभव व स्मृतींना उजाळा दिला. ते म्हणाले, पक्ष बांधणीसाठी शांताराम बापूजी यांनी परिश्रम घेतले. पूर्वीच्या काळात निवडणुकीत वसई विरार पूर्वपट्टीत कॉंग्रेस पक्षाला भरघोस मतदान व्हायचे, त्यामध्ये सुद्धा शांताराम बापूजी आघाडीवर असायचे. कॉंग्रेस पक्षाचे राज्यात सरकार असताना त्यांना, तुम्हाला काय हवं असे विचारले असता, त्यांनी पूर्वपट्टीत चांदीप येथे शाळेची मागणी केली. शिक्षणानेच ग्रामीण भागातील गरीब मुला–मुलींची सर्वप्रकारे प्रगती होऊ शकते यावर त्यांचा पूर्ण विश्वास होता. लोकनेते अण्णासाहेब वर्तक पद्मश्री भाऊसाहेब वर्तक आणि मंत्री ताराबाई वर्तक यांनी त्या काळात शिक्षणाला नेहमीच प्रथम प्राधान्य दिले होते. अलीकडे मागील ३० वर्षात वसई तालुका विकास आणि अनधीकृत बांधकामांसाठी गाजत आहे. परंतु निस्वार्थपणे सेवा केलेले शांताराम बापूजी यांचे व्यक्तिमत्व आजच्या तरुण पिढीला आदर्शमय जीवन जगण्यासाठी प्रेरणा देणारे ठरेल असे ते म्हणाले.

कै. शांताराम बापूजी जाधव यांचे जावई अंकुश पाटील यांनी त्यांच्या कुटुंबीयांच्या वतीने उपस्थित मान्यवरांकडून कृतज्ञता व्यक्त करताना म्हटले, शांताराम बापूंनी स्वतःसाठी काहीही न मागता, ग्रामीण भागातील गोरगरीब मुलांसाठी शाळेची निर्मिती करण्याची मागणी केली. कॉंग्रेस जिल्हाध्यक्ष ओनील आल्मेडा म्हणाले, त्या काळात पंचायत समिती व जिल्हा परिषदेच्या माध्यमातून शांताराम बापूजी यांनी विविध सहकारी संस्थांच्या माध्यमातून शेतकरी व सर्वसामान्य जनतेसाठी मोलाचे योगदान दिले. शिक्षण व सामाजिक क्षेत्रात सुद्धा त्यांनी उल्लेखनीय कार्य केले. वोटचोरी करून सत्ता हस्तगत करताना अलीकडचे सत्ताधारी स्वार्थासाठी राजकारणाचा वापर करताना दिसतात. अशा वेळी शांताराम बापूंनी निस्वार्थीपणे विविध सहकारी संस्था, शिक्षण संस्था, समाजातील दुर्बल घटकांसाठी आणि शेतकऱ्यांसाठी केलेले कार्य नवीन पिढीला प्रेरणादायी ठरेल असेही आल्मेडा म्हणाले.

## 'त्रिपूरी पोर्णिमे'निमित्त वसई गाव ...

तामतलाव दीपोत्सव समिती तर्फे दोन विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. जीत म्हात्रे आणि ओम अमीत म्हात्रे. राहुल भांडारकर यांनी तामतलाव दीपोत्सव समिती आणि परिसरातील लहान मुलांना छोटीशी भेटवस्तू देऊन सर्वांचा सन्मान केला. या प्रसंगी माजी परिवहन सभापती प्रितेश पाटील, जगदीश गोरक्ष, गौरज पाटील, समीर चुरमुरे, गिरीश नाईक, कल्पक गोरक्ष यांचे मोलाचे सहकार्य लाभले कार्यक्रमाच्या आयोजकांतर्फे प्रितेश पाटील यांनी सर्व ग्रामस्थांचे तसेच सचिन पाटणकर, कु. आदिती जोशी, सौ.सुगंधा जोशी, समीर चुरमुरे, सौ.वृषाली पाटील, सौ.राखी गोरक्ष, सौ. सिमा पाटील, सौ.कविता पाटणकर, सौ.सुप्रिया जोशी, सौ.सायली जोशी, सौ.जान्हवी गोरक्ष, कु.निपा क्षेत्रा, सौ. सई चुरमुरे, सौ. रश्मी कापसे, कु. सर्वम्ब चुरमुरे, कु. हर्षिका जोशी, कु.अन्वय जोशी, कु.अनवी जोशी, कु. प्रतीक लाभे, कु. करिष्मा गोरक्ष, कु. रिया गोरक्ष आणि कु. अनुष्का पाटणकर, कु.अथर्व राऊत, कु.करण हिलीम, कु. क्रिस वर्तक, कु.नेहेश राऊत, कु.मेहल राऊत, कु. ईशान कापसे, कु. स्वप्नील बागलकोट, कु. विनायक देवरे, जित गोरक्ष हा कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी घेतलेल्या विशेष परिश्रमाबद्दल आभार मानले. अथर्व दांडेकर यांनी संपूर्ण कार्यक्रमाचे मोफत छायाचित्रण केले ज्यांनी प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष रित्या या कार्यक्रमात सहभाग घेतला आणि जे सर्वजण ग्रामस्थांच्या विनंतीला मान देऊन दीपोत्सवात सहभागी झाले त्या सर्वांचे प्रितेश पाटील यांनी विशेष आभार मानले आहेत.

## खडसे यांच्या बंगल्यातील चोरी करणारे...

असलेले मोहम्मद बिलाल उर्फ बिल्ला अब्दुल करीम चौधरी, एजाज अहमद उर्फ सलीम अब्दुल चौधरी आणि बाबा (पुर्ण नाव माहीत नाही) अशा तिघांनी खडसे यांच्या बंगल्यात चौर्यकर्म केले आहे. जळगाव शहरातील मास्टर कॉलनीत राहणाऱ्या जियाउद्दीन हुस्नोददीन शेख याने तिघा चोरट्यांना आश्रय आणी त्याची दुचाकी वापरण्यास दिली होती. हे चौघे एकमेकांचे नातेवाईक आहेत.

या चोरी केल्यानंतर तिघा चोरट्यांनी त्यांच्या कब्जातील मुद्देमाल उल्हासनगर येथील चिराग इकबाल सैय्यद याच्या हवाली केला होता. चिराग सैय्यद याने तो मुद्देमाल कल्याण येथील कैलास हिराचंद खंडेलवार या सराफाला विक्री केला. पोलिसांनी मुद्देमाल घेणारा चिराग इकबाल सैय्यद आणि कैलास हिराचंद खंडेलवार या दोघांना अटक केली आहे. अशा प्रकारे आतापावेतो तिघे जण पोलिसांच्या ताब्यात आले आहेत. तिघे मुळ चोरटे फरार असून पोलिस त्यांच्या मागावर आहेत. स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक राहुल गायकवाड, रामानंद नगर पोलिस स्टेशनचे पोलिस निरीक्षक राजेंद्र गुंजाळ यांच्यासह फौजदार सचिन रणेशवरे, हे कॉ सुशिल चौधरी, सुधाकर अंभोरे, जितेंद्र राजपुत, विनोद सुर्यवंशी, पोना हेमंत कळसकर, रेवानंद साळुंखे, योगेश बारी, मनोज सुरवाडे, अतुल चौधरी, पोकॉ गोविंदा पाटील, तसेच स्थानिक गुन्हे शाखेचे फौजदार शरद बागल, शेखर डोमाळे, हे कॉ अक्रम शेख, विजय पाटील, प्रविण भालेराव, प्रितम पाटील, नितीन बाविस्कर, किशोर पाटील, मुरलीधर धनगर, पोकॉ रविंद्र कापडणे, राहुल रगडे, दिपक चौधरी, बबन पाटील, प्रदीप चौरे, महेश सोमवंशी, कुंदनसिंग बयास आदींनी या तपासकामी सहभाग घेतला. पुढील तपास रामानंद नगर पोलिस स्टेशनचे पोलिस निरीक्षक राजेंद्र गुंजाळ यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस उप निरीक्षक सचिन रणेशवरे करत आहेत.

## मैत्रेय बुद्ध विहार १३वा वर्धापन दिन...

यांचा जर का अंमल करावयाचा असेल तर प्रज्ञा, शिल आणि करूणा याशिवाय जगाला तरणोपाय नाही. असे जाहिरपणे मानवाला विश्व कल्याणाचा मार्ग दाखविणारे विश्व दिप विश्ववंदनिय महाकारूणीक तथागत भगवान गौतम बुध्द यांचे विचारांचा प्रचार व प्रसारांचे माध्यम म्हणजे मैत्रेय बुध्द विहार. आपल्या विभागामध्ये निर्माण होऊन १३ वर्ष पुर्ण झाली आहेत. त्या मैत्रेय बुध्द विहाराचा १३वा वर्धापन दिन महोत्सव साजरा करण्यात आला.

10 TO 16 NOVEMER 2025 - Page 7 (CRIME SANDHYA):Layout 1 11/8/2025 8:12 PM Page 1



# खावडा विद्युत पारेषण प्रकल्पाच्या ठाणे जिल्ह्यातील प्रकल्पग्रस्तांच्या जमिनीचे भूसंपादन रोखण्याची मागणी



**भिवंडी : वार्ताहर**

जोपर्यंत स्थानिक शेतकऱ्यांना योग्य तो मोबदला प्रकल्प उभारणाऱ्या खावडा विद्युत पारेषण प्रकल्पाने द्यावा अशी मागणी ठाणे जिल्हा विविध प्रकल्पग्रस्त हितकारी कृती समिती कडून भिवंडी उपविभागीय अधिकारी अमित सानप यांच्या दालनात झालेल्या बैठकींत केली आहे. या बैठकीस ठाणे जिल्हा विविध प्रकल्पग्रस्त हितकारी कृती समितीचे समन्वयक भगवान सांबरे, राजन गावंड, पदाधिकारी अँड दिनेश्वर पाटील, दयानंद पाटील, रघुनाथ पाटील, मनोज भोईर व अनेक शेतकरी व खावडा प्रकल्पाचे अधिकारी या बैठकीस उपस्थित होते.

शासनाकडून कोणतीही माहिती दिली जात नसताना खावडा विद्युत पारेषण प्रकल्पाच्या बाधित प्रकल्पग्रस्तांच्या शेताचा मोबदला परस्पर कंपनी ठरवत असून ते अन्यायकारक आहे. तर टॉवर व्यतिरिक्त विद्युतवाहिनी खालील शेतजमिनीचा अत्यल्प मोबदला देऊन शेतकऱ्यांचा हक्क मारला जात असल्याची तक्रार भगवान सांबरे यांनी केली. प्रकल्प अन्य पर्यायी मार्गाने वळविणे शक्य नसल्यास या प्रोजेक्ट मधील बाधित शेतकऱ्यांच्या जमिनीला सरसकट किमान १२ हजार रुपये प्रति चौरस मीटर याप्रमाणे वापर हक्काचा मोबदला द्यावा. मोबदला हा टॉवर व विद्युत वाहिनी कॉरीडॉर या संपूर्ण संपादित जमिनीकरीता समान दराने देण्यात यावा. प्रकल्पापोटी देण्यात येणारा मोबदला हा किती वर्षासाठी असणार आहे याची स्पष्ट नोंद करारनाम्यात असावी. तसेच या मोबदल्यापोटी निश्चित मुदत संपल्यानंतर वापरहक्काच्या करारनाम्याचे पुढील नूतनीकरण तत्कालीन परिस्थितीप्रमाणे करण्यात यावे अशा मागण्या भगवान सांबरे यांनी बैठकीत मांडल्या. तर प्रकल्पाच्या वापर हक्कांच्या जमिनींबाबत, जमिनी ह्या शेतकऱ्यांच्याच मालकीच्या असतात असा एक गोंडस पण काटेरी मुकुट शेतकऱ्यांना घातला जातो असा आरोप संघटनेचे समन्वयक राजन गावंड यांनी केला आहे. प्रकल्प बाधित जमिनी जरी शेतकऱ्यांच्या मालकीच्या राहत असल्या तरी त्यावर अनेक अटी व शर्तीचे ओझे लादलेले असते. जमीन प्रकल्पात वापरात असल्याने त्यावर कोणतेही बांधकाम, व्यवसाय करता येत नाही, मोठी झाडे लावता येत नाहीत अथवा राहण्यासाठी घर बांधता येत नाही यामुळे या जमिनीला बाजारमूल्य राहत नाही. केवळ विशिष्ट प्रकारच्या शेतीव्यतिरिक्त अन्य कोणत्याही प्रकारचा उपयोग या जमिनीचा राहत नाही. त्यामुळे या जमिनीवर अवलंबून असणाऱ्या कुटुंबाची गुजराण तसेच भविष्य निर्वाह धोक्यात येतो सबब या गंभीर बाबींचा विचार करून प्रकल्प कंपनीने बाधित शेतकऱ्यांच्या पुनर्वसनाकरीता काही ठोस उपाययोजना कराव्यात अशी मागणी राजन गावंड यांनी केली.या बैठकीत मागण्यांचे निवेदन वरिष्ठ कार्यालयाकडे पाठवून यावर योग्य तो निर्णय घेतला जाईल दरम्यान शेतकऱ्यांनी प्रकल्पाच्या बाधित जमिनीची मोजणी करून द्यावी अशी विनंती उपविभागीय अधिकारी अमित सानप यांनी केली.

# पालघर जिल्ह्यात नव मतदारांमध्ये ४४ टक्के वाढ तरुणांची, १९ वर्षापर्यंतच्या मतदारांची संख्या ६० हजाराच्या पुढे!

**पालघर : वार्ताहर**



पालघर लोकसभा क्षेत्रातील मतदार संख्या २४ लाखांच्या पलीकडे गेली असून विधानसभा निवडणुकीनंतर जिल्ह्यात सुमारे एक लाख १० हजार मतदारांची वाढ झाल्याचे दिसून आले आहे. यापैकी तरुणांचे प्रमाण ४४ टक्के असून १९ वर्षांपर्यंतच्या मतदारांची संख्या ६० हजारच्या पुढे पोहोचली आहे. लोकसभा व विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने सन २०२३-२४ दरम्यान नव मतदार नोंदवण्यासाठी विशेष मोहीम राबविण्यात आली होती. त्यामध्ये महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी मार्गदर्शन शिबिर तसेच त्यांच्यामार्फत मतदार नोंदणी करण्यासाठी विशेष शिबिरांचे आयोजन करण्यात आले होते. विद्यार्थ्यांमध्ये झालेल्या जागृतीमुळे त्यानंतर देखील पात्र ठरणाऱ्या नव तरुणांनी मतदार नोंदणीचा सपाटा सुरूच ठेवला असून विधानसभा निवडणुकीनंतर सुमारे १४ हजार विद्यार्थी व तरुणांनी मतदार म्हणून नोंदणी केल्याचे दिसून आले आहे. जिल्हा निवडणूक विभागाने अधिकारी, कर्मचारी व मतदान केंद्रस्तरीय अधिकारी यांच्या मार्फत मतदारांची पडताळणी व मतदार यादीचे शुद्धीकरण प्रक्रिया सुरूच ठेवली आहे. यामध्ये विशेष करून घरी मतदान करण्याच्या सुविधेस पात्र असणाऱ्या जेष्ठ नागरिक व मयत मतदारांची संख्या दुरुस्त करण्याकडे लक्ष देण्यात आले. या दरम्यान ७० ते ७९ वयोगटातील मतदार संख्या वाढली असली तरीही ८० पेक्षा अधिक वयोगटातील मतदारांची संख्या ८०० पेक्षा अधिक मतदारानी घटल्याचे दिसून आले आहे. नवीन मतदार नोंदणी मध्ये १८ ते २९ वयोगटात नोंदवण्यात आलेल्या नवीन मतदारांची संख्या सुमारे ४४ टक्के इतकी आहे. तर नव्याने नोंदवण्यात आलेल्या मतदारांमध्ये ३० ते ३९ वयोगटात २६ टक्के, ४० ते ५९ वयोगटात २९ टक्के नवमतदार समाविष्ट झाल्याचे दिसून आले आहे. विधानसभा निवडणुकीनंतर ऑक्टोबर २०२५ पर्यंत झालेल्या मतदान वाढीत नालासोपारा विधानसभा संघात सुमारे ५० हजार मतदार वाढले असून बोईसर विधानसभा क्षेत्रात २७ हजार मतदार वाढले आहेत. डहाणू विधानसभा क्षेत्रात १० हजार, वसई विधानसभा क्षेत्रात नऊ हजार तसेच विक्रमगड व पालघर मतदार संघात प्रत्येकी साडे सहा हजार मतदार वाढल्याचे दिसून आले आहे. जिल्ह्यातील तरुण वर्ग हा मतदार नोंदणी प्रक्रियेत हीरहिरीने भाग घेत असल्याचे या आकडेवारीवरून स्पष्ट झाले असून आगामी स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीसाठी या नव्याने नोंदवण्यात आलेल्या मतदारांची भूमिका महत्त्वपूर्ण ठरेल अशी शक्यता आहे. विधानसभा निवडणुकीसाठी १६ ऑक्टोबर २०२४ रोजी अंतिम झालेल्या मतदार यादीनंतर २९ ऑक्टोबर २०२५ मध्ये सुमारे वर्षभरात नवीन मतदार नोंदणीसाठी दोन लाख २५ हजार २४२ अर्ज प्राप्त झाले होते. त्यापैकी ९१ हजार ७४१ अर्ज नामंजूर केल्यानंतर मतदार यादीत एक लाख ३० हजार ३०७ नाव समाविष्ट करण्यात आली. याच बरोबरीने १६,०२८ मतदारांना वेगवेगळ्या कारणांवरून मतदार यादीतून वगळण्यात आली असून सुमारे ५८ हजार नागरिकांनी आपल्या राहण्याचा पत्ता व इतर तपशील बदल केल्याची माहिती जिल्हा निवडणूक विभागाकडून प्राप्त झाली आहे.

# शालेय विद्यार्थ्यांना सायकलीचे वाटप; यशवंतवाडी ग्रामपंचायतचा अभिनव उपक्रम

**लातूर : वार्ताहर**



गावातील शालेय विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी बाहेरगावी जावे लागते प्रवासाची कसलीही सुविधा नसल्याची अडचण लक्षात घेऊन रेणापूर तालुक्यातील मौजे यशवंतवाडी ग्रामपंचायतीच्या वतीने दहा शालेय विद्यार्थ्यांना भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांच्या हस्ते सायकलीचे वाटप करण्यात आले. विद्यार्थ्यांची गैरसोय लक्षात घेऊन सायकल वाटपाचा अभिनव उपक्रम हाती घेतल्याबद्दल यशवंतवाडी ग्रामपंचायतचे अनेकांनी कौतुक केले आहे. रेणापूर तालुक्यातील मौजे यशवंतवाडी येथे शिक्षणाची सोय नसल्याने गावातील मुला मुलींना कारेपूर येथे शाळेकरीता जावे लागत असे मात्र शालेय विद्यार्थ्यांसाठी प्रवासाची कुठलीच नियमित सोय नसल्याने पायी चालत जाऊन शिक्षण घ्यावे लागत होते. शालेय विद्यार्थ्यांची ही मोठी गैरसोय लक्षात घेऊन यशवंतवाडी ग्रामपंचायतीने पंधराव्या वित्त आयोगा अंतर्गत शालेय विद्यार्थ्यांसाठी सायकली खरेदी करण्याचा अत्यंत महत्त्वपूर्ण निर्णय घेतला. पंधराव्या वित्त आयोगा अंतर्गत खरेदी करण्यात आलेल्या १० सायकलीचे वाटप लातूर ग्रामीणचे आमदार रमेशआप्पा कराड यांच्या हस्ते बुधवारी सकाळी लातूर येथील भाजपाच्या संवाद कार्यालयात करण्यात आले. यावेळी अनुष्का चव्हाण, राधा सूर्यवंशी, जागृती सूर्यवंशी, भक्ती चव्हाण, मोहिनी सूर्यवंशी, सार्थक मोरे, माऊली जाधव, गजानन चव्हाण, जानवी चव्हाण, नक्ष चव्हाण या शालेय विद्यार्थी आणि विद्यार्थिनीच्या चेहऱ्यावर मोठा आनंद दिसून येत होता. सायकल वाटप प्रसंगी यशवंतवाडीचे सरपंच ओम चव्हाण यांच्यासह भाजपाचे महेंद्र गोडभरले, अभिषेक आकनगिरे, दशरथ सरवदे, वसंत करमुडे, विजय काळे, अमर चव्हाण, भाऊसाहेब गुळबिले, लक्ष्मण यादव, संतोष चव्हाण, श्रीकृष्ण जाधव, बाजीराव साखरे, गणपत चव्हाण, विठ्ठल चव्हाण, विष्णू चव्हाण, रामकिशन सूर्यवंशी, किशोर चव्हाण, महेश सूर्यवंशी, सुनील चव्हाण, मुकुंद चव्हाण, बालासाहेब सूर्यवंशी यांच्यासह ग्रामस्थ विद्यार्थ्यांचे पालक व इतर अनेक जण होते. यावेळी आ. रमेशअप्पा कराड यांनी शालेय विद्यार्थ्यांशी संवाद साधून शैक्षणिक प्रगतीसाठी शुभेच्छा दिल्या. यशवंतवाडी ग्रामपंचायतीने सायकली वाटपाचा अभिनव उपक्रम हाती घेतल्याबद्दल शालेय विद्यार्थ्यांच्या पालकांनी समाधान व्यक्त केले तर अनेकांनी कौतुक केले.

# बीएनएन महाविद्यालयात वंदे मातरमचे स्मरणोत्सव, सामूहिक राष्ट्रगीताचे गायन!



**भिवंडी : वार्ताहर**

वंदे मातरम् गीताच्या शतकोत्तर सुवर्ण महोत्सवी वर्षा निमित्त ठिकठिकाणी सामूहिक वंदे मातरम् गीत गायन कार्यक्रमाचे आयोजन केले गेले होते. शहरातील पद्मश्री अण्णासाहेब जाधव भारतीय समाज उन्नती मंडळ संचालित बी.एन.एन. वरिष्ठ व कनिष्ठ महाविद्यालयात गुरुवारी देशभक्तीच्या वातावरणात वंदे मातरम् राष्ट्रगीताचे सामूहिक गायन संपन्न झाले. राष्ट्रगीताच्या सुरेल निनादाने महाविद्यालय परिसर दुमदुमून गेला होता. वंदे मातरम् या राष्ट्रगीताच्या रचनेला १५० वर्ष पूर्ण झाले या निमित्ताने शासन आदेशा नुसार या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य, डॉ. शशिकांत म्हाळुंकर, उपप्राचार्य डॉ.सुधीर निकम, डॉ सुरेश बदरगे, डॉ. निनाद जाधव, डॉ. कुलदीप राठौड, रजिस्ट्रार नरेश शिरसाळे, कनिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य मनोहर महाले, पर्यवेक्षक श्रीकांत पाटील यांच्यासह प्राध्यापक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मयोगी तसेच विद्यार्थी मोठ्या उत्साहाने या कार्यक्रमात सहभागी झाले. या कार्यक्रमाचे आयोजन बीएनएन महाविद्यालयाच्या सांस्कृतिक विभागाच्या वतीने करण्यात आले होते.

# सरवली गोवा एमआयडीसीमध्ये डाईंग कंपनीस भीषण आग



**भिवंडी : वार्ताहर**

भिवंडी कल्याण रस्त्यावरील सरवली गोवा एमआयडीसी येथील मंगलमूर्ती डाईंग या कपड्यावर रंग प्रक्रिया करणाऱ्या कंपनीस शुक्रवारी सकाळी सकाळी नऊ वाजताच्या सुमारास भीषण आग लागण्याची घटना घडली आहे. तीन मजली असलेल्या या डाईंग कंपनीतील दुसरा आणि तिसरा मजल्यावर मोठ्या प्रमाणावर कच्चा व रंग प्रक्रिया केलेल्या कपड्याचा साठा ठेवलेला असल्याने या ठिकाणी आग लागल्याने आगीने उग्र रूप धारण करीत संपूर्ण आगीच्या ज्वालांनी कंपनी इमारत वेढली गेली होती.

या घटनेची माहिती मिळताच घटनास्थळी भिवंडी अग्निशामक दलाची गाडी दाखल झाली. परंतु सावधगिरी म्हणून संपूर्ण एम आय डी सी परिसराचा विद्युत पुरवठा बंद केल्याने आग विझवण्यासाठी पाण्याची कमतरता मोठ्या प्रमाणात भासली. विशेष म्हणजे स्थानिक एमआयडीसी कडील अग्निशामक यंत्रणा सुद्धा या वेळी कुचकामी ठरली असून, आगीच्या घटनावेळी विद्युत पुरवठा बंद केला जातो अशा परिस्थितीत पर्यायी जनरेटरच्या विद्युत पुरवठ्याची व्यवस्था एमआयडीसीकडून केली गेली नाही. त्यामुळे पाण्याच्या तुटवड्यामुळे आग विझवण्याता अडथळे येत होते. आगीची भयानकता पाहता भिवंडी पाठोपाठ आग विझवण्यासाठी कल्याण उल्हासनगर ठाणे अग्निशामक दलाच्या गाड्या मदतीसाठी बोलावण्यात आल्या. दरम्यान कोनगाव पोलिस ठाण्या शेजारी असलेल्या या आगीच्या दुर्घटनेनंतर पोलिसांनी खबरदारीचा उपाय म्हणून संपूर्ण रस्ता रहदारीसाठी बंद केला होता. या आगीत कोणतीही जीवितहानी झाली नसली तरी कोट्यावधी रुपयांचे नुकसान झाले आहे. पण आग नक्की कशा मुळे लागली हे तपासाअंती समोर येणार आहे.

# देवणी तालुक्यात अवैध धंदे बोकाळले

## देवणी पोलीस स्टेशनला पोलिस निरीक्षक दर्जाचा अधिकारी द्या अन्यथा सामाजिक संघटना रस्त्यावर येऊन आंदोलन करणार!

**देवणी : वार्ताहर**




गेल्या आठवड्यात निवडणूक आयोगाने महाराष्ट्रातील महानगर पालिका, नगरपरिषदा, नगर पंचायातीच्या निवडणुकाची घोषणा केली आहे. ज्या ठिकाणी नुडणुका होणार आहेत त्या ठिकाणी आचार संहिता लागू झाली आहे. या निवडणुका झाल्यावर लागलीच जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणुका होणार आहेत, परंतु देवणी हे तालुक्याचे ठिकाण असल्याने व उदगीर तालुक्यातील काही गावे हे देवणी पोलिस स्टेशनला जोडले गेल्याने येथे निवडणूक काळात कायदा सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी पोलिस निरीक्षक दर्जाचा अधिकऱ्याची नितांत गरज आहे. याकडे जिल्हा पोलिस अधीक्षक यांनी जातीने लक्ष घालून तात्काळ पोलिस निरीक्षक दर्जाचा अधिकारी द्यावे अशी मागणी सामाजिक संघटनेच्या वतीने करण्यात येत आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की सध्या देवणी तालुक्यात अवैध धंद्यांना उत आला असून गुटखा विक्री जोरात चालु आहे,गाव तिथे अवैध देशी दारू विक्रीचे प्रमाण वाढले आहे. कल्याण मुंबई नावाचा मटका,जुगारचे क्लब, ऑनलाईन लॉटरी, रेती उपसा, ताडी, गांजा तस्करी हे धंदे बिंधास्त पणें चालू असून तसेच तालुक्यात चोऱ्याचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढले आहे. विळेगाव येथील एका शेतकऱ्यांचे घर फोडून २५ तोळे सोन्याचे दागिने चोरीस गेले आहे. तसेच अंबानगर येथील एका नागरिकाचे २ तोळे सोने देवणी येथील मिनी मार्केट मध्ये दिवसा चोरीला गेले आहे. वरील दोन्ही प्रकरणात पोलिस स्टेशनला एफ आय आर दाखल असून तपास मात्र शून्य आहे. तालुक्यात गुरे ढोरे तर बऱ्याच प्रमाणात चोरी गेले आहेत. परंतु येथील अधिकारी तपासच लावत नाहीत तर तक्रार देऊन काय उपयोग म्हणून काहींनी तर तक्रार न दिलेली बर म्हणून गप्प आहेत. येथील ठानेदार च लक्ष फक्त लक्ष्मी दर्शना वर जास्त असल्याने त्यातील काही रक्कम वरिष्ठांना देऊन त्यांची मर्जी सांभाळत असल्याचे सुजाण नागरिकांतून बोलले जात आहे. कायदा सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी देवणी पोलिस स्टेशनला पोलिस निरीक्षक दर्जाचा अधिकारी द्यावे अशी मागणी सामाजिक संघटनेच्या वतीने करण्यात येत आहे.

# विरारमध्ये इमारतीच्या तिसऱ्या मजल्यावरून पडून मजुराचा दुर्दैवी मृत्यू



**विरार : वार्ताहर**

मंगळवारी विरारमध्ये निर्माणाधीन असलेल्या इमारतीच्या तिसऱ्या मजल्यावरून पडून मजुराचा मृत्यू झाल्याची घटना समोर आली आहे. उपेंद्र विश्वास कुंद (१९) असे या मयत मजुराचे नाव आहे. आठवडाभरातील ही दुसरी घटना आहे. विरार पश्चिमेच्या ग्लोबलसिटी परिसरात बचराज लिजेंड इमारतीचे बांधकाम सुरू आहे. मंगळवारी सकाळी ७.३० वाजता याच बांधकामाच्या ठिकाणी तिसर्या मजल्यावर पाणी मारण्यासाठी उपेंद्र हा गेला होता. पाणी मारण्याचे काम सुरू असतानाच त्याचा तोल गेला आणि तो खाली कोसळला. यात त्याच्या डोक्याला गंभीर दुखापत झाली. तेथील नागरिकांनी त्याला तातडीने उपचारासाठी विरार ग्रामीण रुग्णालयात नेले होते. मात्र त्यापूर्वीच त्याचा मृत्यू झाला असल्याचे डॉक्टरांनी घोषित केले. उपेंद्र हा मूळचा ओडिसा येथील राहणारा असून कामानिमित्त सध्या तो विरार येथे बांधकाम सुरू असलेल्या ठिकाणी राहत होता. या प्रकरणी बोळींज पोलीस ठाण्यात ठेकेदार व सुपरवायझर यांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असल्याची माहिती वरिष्ठ पोलीस निरीक्षक प्रकाश कावळे यांनी दिली.

# प्रतिबंधीत ऑनलाईन गेमिंगद्वारे सायबर फसवणुक करणाऱ्या १२ गुन्हेगारांना अटक

**नवी मुंबई : वार्ताहर**

प्रतिबंधित ऑनलाईन गेमिंग द्वारे फसवणूक करणारी टोळी नवी मुंबई पोलिसांनी उध्वस्त केली आहे. टोळीतील १२ जणांना अटक करण्यात आली आहे. संशयित आरोपींनी देशभरातील विविध बँकेच्या ८८६ खात्यांचा वापर केल्याचे निष्पन झाले आहे. शिवाय त्यांच्या विरोधात भारतातील एनसीसीआरपी. पोर्टलच्या एकुण ३९३ तकारी उघड झाले आहे. आरोपींनी आता पर्यंत ८३ कोटी ९७ लाख ४८ हजार २७८ रूपयांची फसवणुक झाल्याचे प्रथमदर्शी तपासात निष्पन्न झाले आहे. इसाण उस्मानी मिनहाज शेख, हितेश देवांगन, सुनिल श्रवण देवांगन, तोमेशकुमार मोहीत उईके, राहुल राजु देवांगण, अंकीत रमेश सिंग, अभिषेक संजय सिंग, हरिषकुमार मदनलाल अर्पित संतेन्द्रकुमार सोनवाणी, रजत दिलीप शर्मा, लालबाबु राजेश्वर राम कुमार, कृष्णाअंशु अमित विश्वास यांना अटक करण्यात आले आहेत. अवैध्यरित्या गेमिंग ॲप चालविणाऱ्या आरोपींना बँक खाती पुरवणारा आरोपी इसम इम्रान शेख हा सीबीडी रेल्वे स्टेशन येथे येणार असल्याची खात्रीशिर बातमी आर्थिक गुन्हे शाखेचे पोलीस हवालदार राहुल पवार यांना मिळाली होती. त्यांनी आरोपी इम्रान उस्मानी मिनहाज शेख याला सीबीडी रेल्वे स्टेशन येथुन ताब्यात घेतले. चौकशी केल्यानंतर ऑनलाईन गेमिंग फसवणूक केल्याचे कबूल केल्यावर त्याच्या विरोधात सीबीडी बेलापूर पोलीस ठाणे येथे १४ ऑक्टोबरला गुन्हा नोंद करण्यात आला. आरोपी इम्रान उरुमानी मिनहाज शेख याने शासन मान्यता असणाऱ्या ऑनलाईन गेमिंग करीता बैंक खाते उघडुन दिल्यास काही रक्कम देण्याचे अमिष नवी मुंबई परिसरातील नागरिकांना दिले होते. तसेच आरोपीने नागरीकांना बँक खाते उघडण्यास लावुन बँकेचे पासबुक, एटीएम कार्ड, बँक खात्यास लिंक मोबाईल सिम कार्ड, धनादेश पुस्तिका, इत्यादीचे किट स्वतः कडे घेतले होते. हे किट आरोपी हा रूनावल गार्डन बिल्डींग नं ४, रूम नं १३०१, डोंबीवली येथे पाठवित असल्याचे तपासात निष्पन्न झाले.

# हरवलेली ८ वर्षांची मुलगी अवघ्या ८ तासांत शोधली

**वाडा : वार्ताहर**

वाडा पोलीस ठाणे हद्दीत शासकीय आश्रमशाळेतील ८ वर्षाची मुलगी ६ नोव्हेंबर रोजी दुपारी शाळेतून कोणाला काही न सांगता हरवली होती. घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन पालघरचे पोलीस अधीक्षक यतिश देशमुख यांनी तात्काळ शोधपथके तयार करण्याच्या सूचना दिल्या. जनसंवाद अभियानाच्या माध्यमातून मुलीचा फोटो सर्व व्हॉट्सअप गटांवर प्रसारित करण्यात आला. दाट जंगल व दुर्गम परिसरात पोलिसांनी रात्रीचा शोधमोहीम राबवली. सीसीटीव्ही तपासात मुलगी वाडा रोडवर चालताना दिसली. त्यानंतर नागरिक व स्थानिक तरुणांच्या मदतीने मांडवा (बोचलपाडा) येथील एका घरातून ती सुखरूप सापडली. सदर कारवाई एसपी यतिश देशमुख, अपर एसपी विनायक नरळे, उपविभागीय पोलीस अधिकारी समीर मेहेर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक दत्तात्रय किंद्रे व वाडा पोलीस ठाण्याच्या पथकाने केली. मुलीला सुखरूप आईच्या ताब्यात देण्यात आले असून, पोलिसांच्या जलद कार्याचे सर्वत्र कौतुक होत आहे.

10 TO 16 NOVEMER 2025 - Page 8 (CRIME SANDHYA):Layout 1 11/8/2025 8:13 PM Page 1



# वंदे मातरम् गाणे भविष्यातही प्रेरणादायी राहील -ॲड.प्रबोध जयवंत



**भिवंडी : वार्ताहर**

वंदे मातरम् हे गीत काल आज आणि उद्या भविष्यातही समाजाला प्रेरणादायी राहील असे गौरव उद्गार भारत विकास अभियानाचे उपक्रमाचे निमंत्रक अँड प्रबोध जयवंत यांनी काढले. ते भादवड येथील संत कबीर औद्योगिक महाविद्यालया वतीने सामूहिक वंदे मातरम् गीत गायन प्रसंगी बोलत होते. वंदे मातरम् गीतास १५० वर्ष पूर्ण झाल्यानिमित्त छत्रपती शिवाजी महाराज मैदानावर संत कबीर औद्योगिक विद्यालय, पालिका शाळांमधील विद्यार्थ्यांसाठी सामूहिक वंदे मातरम गायनाच्या कार्यक्रमाचे आयोजन तहसीलदार अभिजित खोल यांच्या अध्यक्षतेखाली करण्यात आले होते. या प्रसंगी माजी आमदार रुपेश म्हात्रे, स्वामी स्वरूपानंद, माजी शिक्षण समिती सभापती सुंदर नाईक, नायब तहसीलदार आदेश म्हात्रे, पंचायत समिती गटशिक्षणाधिकारी संजय अस्वले, भिवंडी महापालिका समाज कल्याण विभाग प्रमुख मिलिंद पळसूले, मनपा शालेय प्रशासनाधिकारी सौदागर शिखरे, गजेंद्र गुळवी आदी मान्यवर उपस्थित होते. वंदे मातरम् या गीतामध्ये काश्मीर ते कन्याकुमारी पर्यंतचे वर्णन आले आहे. १९०५ मध्ये वंगभंग आंदोलनात वंदे मातरमचा नारा दिला गेला. तेव्हापासून आजपर्यंत देश अखंड ठेवण्यासाठी वंदे मातरम आजही महत्त्वाचे आहे. देशाच्या रक्षणाची प्रेरणा या गीतातून आपल्या सर्वांना मिळते. वंदे मातरम शब्दाची दहशत ब्रिटिशांनी त्यावेळी देखील घेतली होती. भारतासारख्या विविध भाषिक, जातीय संप्रदाय असलेल्या देशात वंदे मातरम शब्दाने आज आपण जोडले गेले आहोत. वंदे मातरम शब्द हा देश जोडणारा आहे असे शेवटी अँड प्रबोध जयवंत यांनी स्पष्ट केले. कार्यक्रमाचे अध्यक्ष तहसीलदार अभिजित खोले यांनी वंदे मातरम या गीताचे १५० वर्षे या शासकीय उपक्रमाची माहिती देताना नमूद केले की वंदे मातरम हे दोन शब्द हे देशातील विविध एकता दाखवणारे आहे आणि राष्ट्रबांधणी कामात मदत करणारा असा शब्द आहे असे सांगितले. यावेळी भादवड येथील आयटीआयच्या विद्यार्थी वर्गाने वंदे मातरम हे पथनाट्य सादर केले. या प्रसंगी महदीप सिंग, चंद्रकांत म्हात्रे, विश्वनाथ म्हात्रे, विनोद पाटील, सुनील पाटील, महेंद्र सोनवणे, कुसुम वारघडे इत्यादी मान्यवर उपस्थित होते. तर या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विश्वनाथ पाटील यांनी केले.

# पालघर जिल्ह्यातील नगरपरिषद आणि नगरपंचायत निवडणुकीसाठी प्रशासन सज्ज



**पालघर : वार्ताहर**

पालघर जिल्ह्यातील पालघर, डहाणू व जव्हार या तीन नगरपरिषद तसेच वाडा नगरपंचायतीच्या निवडणुकीसाठी २ डिसेंबर रोजी होणारे मतदान तसेच ३ डिसेंबर रोजीच्या मतमोजणीसाठी जिल्हा प्रशासन सज्ज असून निवडणूक होणाऱ्या नगरपरिषद नगरपंचायत क्षेत्रात आचारसंहिता लागू झाली आहे. आचारसंहितेच्या पालनाकडे लक्ष ठेवण्यासाठी आवश्यक भरारी पथक कार्यरत झाले असून मतदान केंद्रनिहाय याद्या प्रसिद्ध होणार आहेत. या चारही निवडणूक ठिकाणी थेट नगराध्यक्ष पदासाठी निवडणूक होणार असून पालघर येथे नागरिकांचा मागास प्रवर्ग, डहाणू येथे सर्वसाधारण उमेदवारांसाठी, जव्हार व वाडा येथे सर्वसाधारण महिला उमेदवारांसाठी आरक्षण यापूर्वी जाहीर करण्यात आले आहे. पालघर नगर परिषदेच्या ३० सदस्यांसाठी शहरात ५५७२७ मतदार संख्या निश्चित झाली असून डहाणू नगर परिषदेच्या २७ सदस्यांना निवडून देण्याकरिता ३८६९३ मतदार आपला अधिकार बजावणार आहेत. याच बरोबरीने जव्हार नगर परिषदेच्या २० सदस्यांसाठी ९३४७ मतदार तर वाडा नगरपंचायतीच्या १७ जागांसाठी होणाऱ्या निवडणुकीसाठी १२८९३ मतदार पात्र ठरले आहेत. राज्य निवडणूक आयोगाने यापूर्वी घोषणा केल्याप्रमाणे मतदार यादीत दुबार नोंदणी असणाऱ्या मतदारांसमोर दोन स्टार नोंदी करण्यात येणार असून असे मतदार फक्त एकाच ठिकाणी मतदान करू शकतील यासाठी जिल्हा निवडणूक ...पान ६ वर

# राष्ट्रवादाची ऊर्जा निर्माण करणे समाजाला एकत्रित करण्याच्या भावनासाठी 'वंदे मातरम' उपयुक्त - जिल्हाधिकारी डॉ. जाखड



**पालघर : वार्ताहर**

समाजामध्ये एकीकरण करण्यासोबत तरुण पिढीमध्ये राष्ट्रवादाची भावना पुनर्जीवित करण्यासाठी वंदे मातरम उपयुक्त असून या राष्ट्रगीताचे नियमित गायन करायला हवे असे प्रतिपादन पालघरच्या जिल्हाधिकारी डॉ. इंदू राणी जाखड यांनी केले.

'वंदे मातरम' या गीताच्या १५०व्या वर्धापन दिनानिमित्त जिल्हास्तरीय कार्यक्रमाचे आयोजन जिल्हाधिकारी डॉ. इंदू राणी जाखड यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा नियोजन समिती सभागृह, जिल्हाधिकारी कार्यालय, पालघर येथे करण्यात आले होते. यावेळी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी मनोज रानडे, पोलीस अधिक्षक यतिश देशमुख, अपर जिल्हाधिकारी भाऊसाहेब फटांगरे, अपर पोलीस अधीक्षक विनायक नरळे, निवासी उपजिल्हाधिकारी सुभाष भागडे, उपजिल्हाधिकारी रविंद्र राजपूत, उपजिल्हाधिकारी रणजीत देसाई, उप जिल्हाधिकारी (रोहयो) विजया जाधव, उपजिल्हाधिकारी तेजस चव्हाण तसेच वरिष्ठ अधिकारी, कर्मचारी आणि आयटीआय व शाळेतील विद्यार्थी उपस्थित होते. वंदे मातरम् हे एक गीत नसून भारतीय स्वातंत्र्य संग्रामाचा आत्मा आहे. या गीताच्या प्रत्येक ओळीमध्ये भारताच्या एकात्मतेचा, बलिदानाचा आणि मातृभूमीप्रेमाचा संदेश असून वंदे मातरम् हे गीत स्वातंत्र्याच्या भावनेचा शक्तिस्रोत असल्याचे प्रतिपादन जिल्हाधिकारी डॉ. इंदु राणी जाखड यांनी केले. तरुण पिढीला भारतीय स्वातंत्र्यचा इतिहास समजायला पाहिजे तसेच पूर्वजांनी दिलेल्या बलिदानाची माहिती समजायला हवी असेही त्यांनी पुढे सांगितले. हा कार्यक्रम म्हणजे केवळ स्मरण नव्हे तर देशभक्तीच्या भावनेचा पुनर्जन्म आहे. मुलांमध्ये देशप्रेम आणि एकात्मतेची भावना जागृत करण्याचा हा प्रयत्न आहे. आपण समाजाला परत काय देणे लागतो, याची जाणीव या निमित्ताने व्हावी, हाच या उपक्रमाचा हेतू असल्याचे जिल्हाधिकारी डॉ. इंदु राणी जाखड यांनी सांगितले. कार्यक्रमाच्या प्रारंभी एकलव्य औद्योगिक प्रशिक्षण संस्थेच्या विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या लघुनाटिकेने आणि वंदे मातरम् गीताच्या सामूहिक गायनाने उपस्थितांमध्ये एक विशेष देशभक्तीची ऊर्जा निर्माण झाली. तर पंकज भरवाड यांनी वंदे मातरम याविषयी पार्श्वभूमी व इतिहास सांगितला. बऱ्याचदा आपण वंदे मातरम् या गीताच्या सुरुवातीचे शब्द ओळखतो, पण पूर्ण गीताचा अर्थ, इतिहास आणि भावना आपल्या ...पान ६ वर

# निवडणुकीत बहुजन विकास आघाडीचा कार्यकर्ताच ठरवेल उमेदवार –हितेंद्र ठाकूर




**विरार : वार्ताहर**

प्रत्येक वेळी कार्यकर्ता हा जीव ओतुन काम करत असतो धडपड करतो निवडणुकीसाठी कोणता उमेदवार असावा हे मी नाही तर कार्यकर्ता ठरवणार आहे त्यामुळे उमेदवारीसाठी कार्यकर्त्यांचे मत विचारात घेतले जाणार आहे. त्यामुळे आपसूकच इच्छुकांची मदार कार्यकर्त्यांवर आहे असे सूचक विधान बविआ अध्यक्ष तथा माजी आमदार हितेंद्र ठाकूर यांनी दिली असल्याने येणाऱ्या निवडणुकीत कार्यकर्ता कोणता उमेदवार निवडणार याकडे राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे. वसई पश्चिम माणिकपूर येथील वायएमसीए सभागृहात बहुजन विकास आघाडीचा कार्यकर्ता मेळावा आयोजित करण्यात आला होता. यावेळी बविआ अध्यक्ष तथा माजी आमदार हितेंद्र ठाकूर जेष्ठ नेते व माजी महापौर नारायण मानकर माजी महापौर प्रविण शेट्टी, गुजराती समाजाचे हसमुखभाई शहा, उत्तर भारतीय नेता संतोष सिंह, वसई रोड जैन समाजाचे वसंतभाई वोरा, बसिन केरळासमाजाचे पी.व्ही. के नम्बीयार, के.ओ. देवसी, तामिळ संगमचे संकरा पांडियन, ख्रिस्ती समाजाचे जेष्ठ नागरिक मायकल लोपीस ज्येष्ठ नागरिक तर मुस्लिम समाजाचे कल्लन खान, खोजा जमात खानाचे सिराज कमाल, उत्तरांचल समाजाचे जगदिश पाठक, कर्नाटक संगमचे विश्वनाथ शेट्टी, वर्धमान स्थानकवासी संघचे मुकेश भाई, उत्तर भारतीय समाज संतोष सिंग, विश्वकर्मा समाजचे राजू विश्वकर्मा, पांडू शेट्टी यांच्यासह मोठ्या प्रमाणात युवा वर्ग, युवा विकास आघाडी, बविआ कार्यकर्ते, पदाधिकारी आजी माजी नगरसेवक, रिक्षा चालक मालक तसेच परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी पुढे माजी आमदार हितेंद्र ठाकूर कार्यकर्त्यांना संबोधित करताना म्हणाले कि, आजपर्यंत अनेक योजना आणल्या, ...पान ६ वर

# मैत्रेय बुद्ध विहार १३वा वर्धापन दिन सोहळा



**विरार : वार्ताहर**

मैत्रेय प्रतिष्ठाण (रजि.) संचालित मैत्रेय बुद्ध विहार विराट नगर विरार पश्चिम येथे बुध्दाब्द वर्षे २५६९ कार्तिक पौर्णिमा बुधवार दि. ५ नोव्हेबर २०२५ रोजी तेरावा वर्धापन दिन सोहळा उत्साहात पार पडला. सोहळ्यास परिसरातील बौद्ध उपासक व उपासिकांची उपस्थिती लाभली. पूज्य भंते प्रियोलोक सहस्त्र यांनी दीप प्रज्वलन करून उपस्थितांना मार्गदर्शन केले. सकाळी ९.३० वाजता धम्म ध्वजारोहण, १०.३० वाजता आदर्शाच्या प्रतिमांना वंदन, त्रिसरण पंचशिल, सुत्त पठण करण्यात आले. सायं. ७ वाजता भिक्खू प्रियोलोक भंते यांच्या हस्ते दिप प्रज्वलन करून त्यांनी धम्मदेसना, धम्म संस्कार व मंगल मैत्री अंतर्गत उपस्थितांना मोलाचे मार्गदर्शन केले. याप्रसंगी सद्धम्मातील श्रध्दासंपन्न बौध्द उपासक – उपासिका यांनी शुभ्रवस्त्र परिधान करून कार्यक्रमात सहभागी होऊन पुण्यलाभी व्हावे असे आवाहन मैत्रेय प्रतिष्ठान संचालित मैत्रेय बुद्ध विहार अध्यक्ष अजीव यशवंत पाटील यांनी केले होते, त्यास मोठा प्रतिसाद मिळाला. जगातील मानवाला दुःख मुक्तीचा, शांतीचा, करूणेचा आणि मैत्रिचा संदेश देऊन फक्त मानवच नव्हे, तर या पृथ्वीतळावर जे जे सजीव आहेत. सृष्टीच्या नियमानुसार त्यांनाही जगण्याचा पुर्ण अधिकार आहे. ...पान ६ वर

# वसई, विरार शहरातील सरसकट सर्वांची शास्ती माफ करावी; हितेंद्र ठाकूर यांची आग्रही मागणी



**विरार : वार्ताहर**

वसई–विरार शहर महानगरपालिकेत १० लाखाच्या वर मालमत्ताधारक असून ६५ हजाराहुन अधिक मालमत्तांना महापालिकेकडून शास्ती करण्यात येत आहे.यामध्ये औद्योगिक वसाहतीतील गाळे, स्वतःला राहाण्यासाठी असलेली घरे व चाळीचा देखील समावेश आहे वसई–विरार शहरात शास्ती रकमेचे प्रमाण मूळ करांपेक्षा जास्त असल्याने शास्ती कर भरणा करणे मालमत्ता धारकांमध्ये उदासीनता दिसून येते. त्यामुळे मालमत्ता धारक शास्तीसह मुळ कराचाही भरणा करीत नाहीत. शासन निर्णय दि मार्च २०२३ नुसार पिंपरी चिंचवड महापालिका व तदनंतर ठाणे महापालिकेने शास्ती माफ करण्यास मंजूरी दिली आहे. त्या धर्तीवर वसई विरार शहर महानगरपालीकेतील सर्व थरातील मालमत्ताधारकांना ...पान ६ वर

**आरोग्यमंत्र्यांनी घेतला पालघर जिल्ह्यातील आरोग्यवस्थेचा आढावा**

# पालघर जिल्हा रुग्णालयाचे काम युद्ध पातळीवर पूर्ण करण्याच्या सक्त सूचना



**पालघर : वार्ताहर**

पालघर जिल्हा रुग्णालयाचे बांधकाम तातडीने पूर्ण करावे अशा सूचना सार्वजनिक आरोग्य मंत्री नामदार प्रकाश आबिटकर यांनी दिल्या आहेत. पालघर जिल्ह्यातील आरोग्य व्यवस्थेचा आढावा घेण्यासाठी आरोग्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली विधान भवनात बैठक आयोजित करण्यात आली होती. पालघरचे आमदार राजेंद्र गावित यावेळी उपस्थित होते. पालघरचे जिल्हाधिकारी व मुख्य कार्यकारी अधिकारी दूरदृश्य प्रणालीद्वारे या बैठकीत सहभागी झाले होते. या बैठकीत आरोग्यमंत्र्यांनी जिल्हा रुग्णालय बांधकामांच्या प्रगतीचा आढावा घेतला. जिल्हा रुग्णालयाचे काम अत्यंत वेगाने, युद्ध पातळीवर पूर्ण करण्याच्या सक्त सूचना दिल्या आहेत. सफाळे ग्रामीण रुग्णालयासाठी जागेची उपलब्धता व निधी मंजूर झाला ...पान ६ वर

# कै. शांताराम बापूजी जाधव यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ शोकसभा



**वसई : वार्ताहर**

लोकनेते अण्णासाहेब वर्तक सभागृह ट्रस्टचे विश्वस्त तथा आगाशी विरार अर्नाळा शिक्षण संस्थेचे उपाध्यक्ष शांताराम बापूजी जाधव यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ अण्णासाहेब वर्तक सभागृह ट्रस्ट, काँग्रेस भवन, पारनाका वसई येथे काल बुधवार ५ नोव्हेंबर रोजी सायं. ५ वा. वसई विरार शहर जिल्हा काँग्रेस कमिटी व अण्णासाहेब वर्तक सभागृह ट्रस्ट यांच्या संयुक्त विद्यमाने या शोकसभेचे आयोजन केले होते. महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे मा. सरचिटणीस विजय पाटील यांच्या अध्यक्षतेखाली शांताराम बापूजी यांची शोकसभा अतिशय शांततामय वातावरणात संपन्न झाली. यावेळी कै. शांताराम बापूजी यांच्या मुली आणि जावई उपस्थित होते. विजय पाटील यांनी शांताराम बापूजीं बरोबरचे आपले अनुभव सांगून त्यांच्या कार्याचा गौरव जाणता राजा ही उपाधी देऊन केला. प्रदेश काँग्रेसचे किसान सेलचे प्रदेशप्रमुख पराग ...पान ६ वर

# 'त्रिपूरी पोर्णिमे'निमित्त वसई गाव तामतलाव येथील दीपोत्सवात नागरिकांचा उत्स्फूर्त सहभाग





**वसई : वार्ताहर**

त्रिपूरी पोर्णिमेचे औचित्य साधून दि. ५ नोव्हेंबर २०२५, बुधवारी संध्याकाळी तामतलाव परिसरातील ग्रामस्थांच्या पुढाकाराने वसईच्या विविध भागांतील नागरिकांनी दीपोत्सव साजरा केला. तामतलाव दीपोत्सव समिती गेली सहा वर्षे हा कार्यक्रम आयोजित करीत आहोत, यावर्षी हे सातवे वर्षे होते. पणत्यांची रोषणाई करण्यात आली होती. तामतलावच्या बागेच्या परिसरात सर्वांचा उत्साह ओसंडून वहात होता. सर्व वयोगटातील लोक या दीपोत्सवात सहभागी झाले. या कार्यक्रमाची संपुर्ण जबाबदारी ग्रामस्थांनी घेतली होती. आदिती जोशी हिने कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. माजी महापौर प्रवीण शेट्टी, सत्कारमूर्ती उषाताई चौधरी, श्रीमती आशा ताई म्हात्रे, श्रीमती शुभांगी वर्तक, जेष्ठ मार्गदर्शक सुभाष गोरक्ष, लक्ष्मीकांत दांडेकर यांनी या दीपोत्सवाचे उद्घाटन केले. विशेष आकर्षण असलेले तुळशीचे लग्न हे अभय जोशी आणि सुनील जोशी यांनी या लग्नाचे पौरोहित्य केलं आणि खणखणीत आवाजात मंगलाष्टके म्हंटली, वातावरण एकदम भक्तिमय झाले होते. सौ. स्नेहा सावर्डेकर, पार्थ पाध्ये आणि मंडळी यांचे 'अमृत वेल' या मराठी सुमधुर गाण्याचा कार्यक्रम संपन्न झाला....पान ६ वर

# खडसे यांच्या बंगल्यातील चोरी करणारे मुख्य चोरटे फरार, मात्र मुद्देमाल हस्तगत



**जळगाव : वार्ताहर**

माजी मंत्री एकनाथराव खडसे यांच्या जळगाव येथील मुक्ताई बंगल्यात चोरी करणारे मुख्य तिघे चोरटे फरार असून पोलिस त्यांच्या मागावर आहेत. मात्र असे असले तरी इतर तिघांना ताब्यात घेण्यात आले असून सोन्या चांदीच्या दागिन्यांचा ६ लाख २१ हजार रुपये किमतीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. रोख ३५ हजार रुपयांसह एकुण ६ लाख ७० हजार रुपये किमतीचा मुद्देमाल या घटनेत चोरी झाला होता. या चोरी प्रकरणात एकुण सहा जणांचा सहभाग निष्पन्न झाला आहे. या सहापैकी मुख्य तिन चोरटे फरार असून त्यांना आश्रय देणारा यापुर्वीच अटकेत आहे. दागिने विक्री करणारा आणि विकत घेणारा अशा दोघांना पोलिसांनी अधिक तपासात अटक केली आहे. या घटनेत उल्हासनगर येथील रहिवासी ...पान ६ वर